मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

## मराठी अर्थशास्त्र परिषद
नियतकालिक
(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर चैत्र-आषाढ शके १९४५
एप्रिल-मे-जून २०२३/खंड ४७, अंक १

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अ‍ॅड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल- मे-जून २०२३ / खंड ४७ / अंक १

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०२२-२५)**
**संतोष दास्ताने**
**मुक्ता जहागिरदार**
**के. के. पाटील**
**एस. एम. भोसले**

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. सुभाष पाटील
W20 आणि भारतीय महिलांची स्थिती ............................ ३

२. अविनाश कुलकर्णी
चिमण्यांची घरं .................................................. १४

३. सूर्यकांत पांडुरंग गायकवाड, अजय दरेकर
कृषिक्षेत्र : रोजगार आणि उद्योजकता ............................ २१

४. मृणालिनी तापस
२००० रुपयाच्या नोटवापसीमुळे होणारे
अर्थव्यवस्थेवरील परिणाम ......................................... २८

५. चंद्रकांत रा. जाधव
श्री वारणा सहकारी बँक मर्यादित, वारणानगर :
एक व्यष्टी अध्ययन .............................................. ३५

६. हरी पंढरी वंगरवार
प्रधानमंत्री मुद्रा योजना : टीकात्मक परीक्षण ...................... ४३

७. बी.एस.पाटील
पेणच्या आर्थिक विकासातील गणपती कारखान्यांचे
योगदान आणि रोजगारसंधींचा चिकित्सक अभ्यास ............... ५०

८. आण्णा काका पाटील : पुस्तक परिचय
भारतातील सहकारी कृषी पतसंस्था .............................. ५६

९. पुरुषोत्तम विष्णुपंत देशमुख : शोधनिबंध विषयक रूपरेषा
मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण ........................ ५८

१०. श्रीनिवास खांदेवाले : शोधनिबंध विषयक रूपरेषा
केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती ............ ६५

११. संतोष दास्ताने : शोधनिबंध विषयक रूपरेषा
महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र .................. ६७

१२. नवीन आजीव सभासदांची यादी ................................ ७२

१३. इमारत निधी ...................................................... ७३

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**

  **दिलीप अर्जुने (जालना)**

- **कार्याध्यक्ष**

  **अविनाश रा. निकम (शहादा)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **अजय दरेकर (बारामती)**
  **विकास सुकाळे (नांदेड)**
  **विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)**

- **सदस्य**

  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **जितेंद्र तलवारे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
  **संजय धनवटे (कारंजा)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **सुरेश घुमटकर (बीड)**
  **जयवंत इंगळे (हुपरी)**
  **बाळासाहेब पाटील (पनवेल)**
  **सुभाष सावंत (नाशिक)**

- **स्वीकृत सदस्य**

  **जनार्दन काकडे (चंद्रपूर)**
  **अनिल वावरे (सातारा)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **विशाल पावसे (सासवड)**

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना. पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक) रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# W20 आणि भारतीय महिलांची स्थिती

**सुभाष पाटील** †

**प्रास्ताविक :**

स्थानिक, प्रादेशिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महिलांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय बाबींमध्ये लिंग समानता (Gender equality) हा नेहमीचा मुख्य विषय आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये महिलांच्या समस्या दीर्घकाळपासून कायम आहेत. विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या घेऊन मुलांच्या संगोपनात आणि कौटुंबिक उत्पन्नाला पूरक अशी भूमिका बजावण्याव्यतिरिक्त राष्ट्रांच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी प्रभावीपणे योगदान देणाऱ्या महिलांना आजही प्रत्येक स्तरावर भेदभाव केला जात आहे. विविध पातळ्यांवर अनेक उपाययोजना आणि प्रयत्न केले जात असतानाही आरोग्य, पोषण, शिक्षण, रोजगार, निर्णय घेणे या क्षेत्रात लिंग असमानता दिसून येते. केवळ लिंग भेदभाव कमी करणे हा मूलभूत मानवी हक्काचा विषय नाही, तर शाश्वत विकासाला गती देणे आवश्यक आहे. आर्थिक अभिवृद्धी आणि विकास यांस गती देण्यासाठी महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला १९७५ मध्ये चालना मिळाली. मेक्सिकोमध्ये पहिल्या जागतिक महिला परिषदेत हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले होते. १९९५ मधील बिजिंग येथील चौथ्या जागतिक महिला परिषदेत यांस गती मिळाली, ज्याने जगभरातील महिला सक्षमीकरणासाठी नवीन दृष्टी देणाऱ्या एका नव्या युगाची सुरुवात झाली.

१९९७ च्या आशियाई आर्थिक संकटानंतर जागतिक अर्थव्यवस्थेची आव्हाने एकत्रितपणे पेलण्यासाठी १९९९ मध्ये जगातील २० अर्थव्यवस्थांचा G20 आंतरराष्ट्रीय मंच स्थापन करण्यात आला. G20 मध्ये B20, T20, C20, L20 आणि यासारखे स्वतंत्रपणे कार्यकारी गट कार्यरत आहेत. २०१५ मध्ये तुर्की अध्यक्षपदाच्या काळात महिला आर्थिक सक्षमीकरणाला अधिक चालना देण्याच्या उद्देशाने महिला 20 (W20) हा एक महत्त्वाचा गट स्थापन करण्यात आला आहे. महिला सक्षमीकरणाशी संबंधित प्रश्न हे महिलांच्या संबंधित देशपातळीवरील प्राधान्यक्रम आणि आकांक्षांनुसार भिन्न आहेत. G20 च्या चौकटीत लागू केलेली विविध विकास धोरणे, योजना आणि कार्यक्रम

† प्राध्यापक व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागप्रमुख, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, पुणे,
प्रभारी प्राचार्य, एस. एन. डी. टी. कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, कर्वे पथ, पुणे
आजीव सभासद क्र.११६०, भ्रमणध्वनी : ९८५०४३४५८९, ई-मेल : subhash.patil09@rediffmail.com

यांच्या प्रभावामुळे महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झालेली आहे. खरे तर असे म्हणता येईल की, W20 आणि We-Fi (Women Entrepreneur-Finance Initiative महिला उद्योजक-वित्तीय पुढाकार) हे सर्वात महत्त्वाचे उपक्रम आहेत. ज्याने महिला सक्षमीकरणासाठी सक्षम वातावरण प्रदान केले आहे. ज्यामुळे जीवनाला चांगला दर्जा प्राप्त होतो. स्थापनेपासूनच प्रत्येक G20 शिखर परिषद ही महिला आर्थिक सक्षमीकरण आणि इतर गंभीर समस्यांना तोंड देण्यासाठी प्रयत्नशील आहे. W20 ही महिला-पुरुष समानतेवर जवळून समन्वय साधण्यासाठी एक महत्त्वाची यंत्रणा आहे.

भारताने १२ डिसेंबर, २०२२ रोजी W20 अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली असून, 'महिला-नेतृत्व विकास' या माध्यमातून  समन्याय (Equity) आणि समानतेचे (Equality) जग निर्माण करण्याचा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. भारताच्या अध्यक्षतेखाली W20 ची पाच प्राधान्य क्षेत्रे आहेत. ज्यात उद्योजकतेतील महिला, तळागाळातील महिला नेतृत्व, लिंग डिजिटल विभाजन, शिक्षण आणि कौशल्य विकास आणि  हवामान बदल, कृतीतील सहभाग यांचा समावेश आहे. सदर शोधनिबंधाचे उद्दिष्ट W20 च्या अनुषंगाने भारतातील महिलांची स्थिती अभ्यासणे व महिलांच्या मुख्य समस्यांवर प्रकाश टाकणे हे आहे. अर्थात, हा अभ्यास पूर्णतः दुय्यम आधारसामग्रीवर आधारित आहे.

**महिला २०** (W20) :

G20 प्रक्रियेचा अविभाज्य भाग म्हणजे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय महिला संघटना, थिंक टँक आणि महिला उद्योजक संघटनांचे जाळे हे आहे. SDG-5 च्या संदर्भात, स्त्री-पुरुष समानता प्राप्त करण्यासाठी आणि सर्व महिला आणि मुलींना सक्षम करण्यासाठी श्रमशक्तीमध्ये महिलांचा समावेश करण्यासाठी पुरेसा वाव आहे. एकूणच दारिद्र्य आणि विषमता कमी करण्यासाठी W20 ने पगाराच्या कामाचा समान वाटा आणि बिनपगारी काळजी आणि घरगुती कामांना प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. त्याचप्रमाणे G20 ने महिलांनी पारंपरिकपणे हाताळल्या जाणाऱ्या काळजी आणि घरगुती कामाचे मूल्य ओळखण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे, W20 ने यावर भर दिला की G20 ने महिला उद्योजकतेची क्षमता ओळखली पाहिजे आणि म्हणून वित्त, पत, प्रशिक्षण आणि तांत्रिक समर्थनात प्रवेश देऊन त्यांच्या वित्तीय समावेशनावर योग्य भर दिला पाहिजे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रवेशाबाबत डिजिटल लिंगभेद दूर करून डिजिटल समावेशन अधिक सखोल करण्यासाठी विशेष उल्लेख करण्यात आला. मुलींना STEM[2] (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित) चा अभ्यास करण्यासाठी तरतूद करण्यासाठी W20 द्वारे  G20 कडे विशेष तरतुदींचा आग्रह धरला जात आहे आणि महिलांच्या मालकीच्या उद्योगांना आणि ICT क्षेत्रातील नावीन्यपूर्णतेला पाठिंबा देण्याची गरज आहे. W20 ला बळकट करून न्याय्य आणि शाश्वत विकासासाठी महिला-केंद्रित धोरणे असायला हवीत, यालाही दुजोरा देण्यात आला.

G20 च्या उद्दिष्टांच्या चौकटीत महिलांचा आर्थिक सहभाग आणि सक्षमीकरणाच्या विषयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महिला आणि सामाजिक संस्थांच्या W20 नेटवर्कची भूमिका महत्त्वाची बनली आहे. गेल्या काही वर्षांत G20 ने अर्थपूर्ण घोषणा आणि संप्रेषणे सुरू करून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ठोस प्रयत्न केले आहेत. त्या अनुषंगाने सदस्य देशांच्या अर्थप्रक्रियांचे समन्वयही केले आहे. म्हणून, प्रत्येक सदस्य देशांनी आपापल्या देशांमध्ये लिंग समानता सुनिश्चित करण्यासाठी संबंधित कृतीयोग्य योजना तयार

करणे अत्यावश्यक आहे. सामान्यत: महिला आणि अनौपचारिक व स्थलांतरित मजुरांना आरोग्य, शिक्षण, स्व-मालकीचा जमिनीचा अभाव आणि पशुधन मालकी हक्कांच्या बाबतीत अनेक प्रकारच्या वंचितांचा सामना करावा लागतो. अनेकदा या अडचणी वारशाने मिळत असल्याने पुढील पिढी देखील दारिद्र्याच्या दुष्टचक्रात ढकलली जाते. राष्ट्राच्या विकास प्रक्रियेला हातभार लावणाऱ्या आर्थिक क्रियाशीलतेत महिलांच्या समावेशास गती मिळाली पाहिजे.

**महिला आणि शिक्षण :**

मानवी संसाधन हे राष्ट्राच्या विकासाचे द्योतक मानले जाते. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील एकूण लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ४८.५३% होते. ग्रामीण भागात हे प्रमाण ४८.८०% तर नागरी भागात ४८.१६% इतके आहे. सामान्य लिंग गुणोत्तरात ९४३ पर्यंत तर बाल लिंग गुणोत्तर ९१८ इतके होते. महिला साक्षरता दर ६५.४६% होते. ग्रामीण भागात हा दर ५७.९%, तर शहरी भागात ७९.१% होता. तर महिलांचे सरासरी आयुर्मान ७०.७ वर्षे होते. २०१८ च्या राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालानुसार, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक महिला शिक्षणाचे प्रमाण अनुक्रमे १८.९%, १४.१% आणि १४.२% इतके होते, तर पदवी व त्यापुढील शिक्षणाच्या बाबतीत महिलांचे प्रमाण केवळ ८.३% एवढे होते. उच्च माध्यमिक शिक्षणानंतर महिलांचे गळतीचे प्रमाण अधिक आहे. याचे कारण म्हणजे शैक्षणिक सुविधांचा अभाव, महिलांची असुरक्षितता, ग्रामीण क्षेत्रातील उच्च शिक्षणाचा अभाव व मुलींच्या शिक्षणापेक्षा मुलांच्या शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जाते. महिलांमधील निर्णयक्षमता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी शिक्षण हा घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. कार्यक्षम मानव संसाधन विकासाच्या दृष्टीने महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

शैक्षणिक पातळीनुसार लिंगसमता सूचकांकानुसार, प्राथमिक ते उच्च शिक्षणातील १९५०-५१ ते २०१७-१८ पर्यंतचा लिंगसमता सूचकांकावरून असे दिसून येते की, प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरात महिलांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण अधिक आहे. परंतु उच्च शिक्षण पातळीला मात्र ते कमी झाले आहे. १९५०-५१ मध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण स्तरात हे सूचकांक अनुक्रमे ०.४१ व ०.२२ होता, तर २०१७-१८ मध्ये हे प्रमाण १.०२ व १.११ होते. उच्च शिक्षणाच्या बाबतीत २००५-०६ या वर्षी लिंगसमता सूचकांक ०.६९ होता. २०१७-१८ मध्ये त्यात ०.९३ एवढी वाढ झाली आहे. महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व आणि देशपातळीवर महिला शिक्षणासाठी राबविले जाणारे विविध उपक्रम यांमुळे महिला शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे; पण ही वाढ अपेक्षेपेक्षा कमी आहे.

भारतातील ३ ते ३५ वर्षे वयोगटातील कधीही शिक्षण न घेण्याच्या नोंदणी न केलेल्या महिलांचे प्रमाण १६.६% आहे. हे प्रमाण ग्रामीण भागात १९.३% तर नागरी भागात ९.६% आहे. शिक्षण न घेण्याच्या कारणानुसार, सर्वाधिक महिला ४६% इतर कारणे, १९.९% शिक्षणात रुची नाही, १३.६% वित्तीय समस्या व ११.७% घरकामात व्यस्तता ही आहेत. शिक्षण न घेणाऱ्या महिलांमध्ये ग्रामीण भागातील महिलांचे प्रमाण अधिक आहे. कारण ग्रामीण भागात आजही महिलांच्या शिक्षणाला कमी महत्त्व, लहान वयापासूनच मुलींवर घरगुती कामांची जबाबदारी या सामाजिक समस्यांमुळे महिलांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी दिसून येते. २०१८ या वर्षी भारतातील अर्धवट शिक्षण सोडलेल्या महिलांचे प्रमाण ४२.२% आहे. ग्रामीण भागाच्या (४०%) तुलनेत नागरी भागात (४७.८%) हे प्रमाण अधिक आहे. यात सर्वाधिक महिला घरगुती कामातील व्यस्ततेमुळे, आर्थिक समस्या व शिक्षणात रुची नाही इत्यादी कारणांमुळे शिक्षण अर्धवट सोडतात. उच्च

माध्यमिक शिक्षणानंतर महिलांचे गळतीचे प्रमाण अधिक आहे. याचे कारण म्हणजे शैक्षणिक सुविधांचा अभाव, महिलांची असुरक्षितता, ग्रामीण क्षेत्रातील उच्च शिक्षणाचा अभाव व मुलींच्या शिक्षणापेक्षा मुलांच्या शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जाते. महिलांमधील निर्णय क्षमता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी शिक्षण हा घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. कार्यक्षम मानव संसाधन विकासाच्या दृष्टीने महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

**महिला आणि आरोग्य :**

देशाच्या प्रगतीचा एक महत्त्वपूर्ण व आवश्यक घटक म्हणजे देशातील सर्व वयोगटातील व्यक्तींचे उत्तम आरोग्य होय. भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्येचे आरोग्य अबाधित ठेवणे म्हणजे सरकारी आरोग्य यंत्रणेसाठी मोठे आव्हान आहे. त्यात भारतातील महिलांचे आरोग्य बघता अजूनच जबाबदारी वाढते. कारण भारतातील महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने भारताची स्थिती निराशाजनक दिसून येते. महिलांचे आरोग्य हे त्यांच्या भावनिक, धार्मिक, सामाजिक आणि भौतिक कल्याणाशी संबंधित असून ते त्यांच्या जीवनातील विविध सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटकांशी निगडित असते. भारतातील महिलांचे त्यांच्या कुटुंबाच्या विकासातील योगदान अनमोल असते. मात्र श्रमशक्ती सहभाग आणि शिक्षण याबाबतीत महिलांचे स्थान आजही दुय्यम आहे. पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा असल्याने महिलांना मर्यादित स्वातंत्र्य प्राप्त होते. त्यामुळे त्यांना मानसिक आणि शारीरिक अशा दोन्ही प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागते. भारतातील महिलांच्या मुख्य आरोग्यविषयक समस्या म्हणजे त्यांचे जननक्षम आरोग्य, पोषणविषयक स्थिती, मुलगा-मुलगी मधील भेदभाव, संसर्गजन्य आजार इत्यादी आहेत. अपुरा व कमी पोषक आहारामुळे भारतातील महिलांना अनेक आजारांना बळी पडावे लागते. त्यामुळे शारीरिक विकास होत नाही आणि अर्भक मृत्युदर आणि माता मृत्युदर प्रमाण वाढते. भारतात महिलांच्या आहाराबाबत लिंगभेद केला जातो. म्हणून भारतात महिला शिक्षण जितके महत्त्वाचे तितकेच महिलांच्या आरोग्य आणि पोषक आहाराबाबत देखील समाजात जागरुकता असणे तितकेच महत्त्वाचे आहे.

आयुर्मानात झालेली वाढ ही समाजाच्या प्रगतीचे एक महत्त्वाचे लक्षण मानले जाते. आरोग्यविषयक सुविधांतील वाढ, वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती आणि अधिक पोषण युक्त आहार या कारणांनी भारतातील १९९०-९४ या कालावधीत महिलांचे आयुर्मान ६०.४ वर्षे वरून २०११-१५ या काळात ७० वर्षेपर्यंत वाढले आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र अर्भक मृत्युदरात मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा अधिक आहे. २००१ मध्ये भारतात माता मृत्यूदर ३०१ होता, तर २०१५ ते १७ या काळात तो १२२ पर्यंत कमी करण्यास यश प्राप्त झाले आहे. राज्यनिहाय माता मृत्युदर सर्वाधिक आसाम राज्यात (२२९) तर सर्वात कमी केरळ राज्यात (४२) आहे. भारतात रक्ताची कमतरता असणाऱ्या महिलांचे प्रमाण ५७.००% एवढे आहे. नागरी भागात हे प्रमाण ग्रामीण भागाच्या तुलनेत कमी आहे. राज्यनिहाय स्थिती बघता २०१९-२० यावर्षी सर्वाधिक प्रमाण पश्चिम बंगालमध्ये ७१.४ तर सर्वात कमी केरळ राज्यात ३६.६% आणि लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशात २५.८% एवढे होते. रक्ताची कमतरता असणाऱ्या महिलांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. महिलांचे आरोग्य आणि पोषण याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, तरच महिलांच्या आरोग्यविषयक स्थिती सुधारू शकते.

**महिला आणि श्रमदलातील सहभाग :**

भारतातील महिलांचे श्रमदलातील योगदान पुरुषांच्या तुलनेने खूप कमी आहे. आर्थिक विकास जलदगतीने साधण्यासाठी समाजातील सर्व घटकांचा समान सहभाग असणे आवश्यक आहे. भारतातील

महिलांची रोजगारविषयक स्थिती बघता २०१५-१६ मध्ये महिलांचा श्रमातील वाटा २३.७% इतका होता. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या अहवालानुसार, २०११-१२ मध्ये भारतातील श्रमदल सहभाग दर ५५.९% होता. २०१७-१८ मध्ये ४९.८% इतकी घसरण दिसून आली, तर महिलांच्याबाबतीत २०११-१२ मध्ये बेरोजगारी दर ८% वरून २०१७-१८ मध्ये २३.३% एवढा म्हणजे जवळपास तीन पटीने वाढ झाली आहे. ग्रामीण भागात श्रमदल सहभाग दर २०११-१२ व २०१७-१८ मध्ये अनुक्रमे ६७.७% वरून ५८.७% एवढा कमी झाला, तर नागरी भागात अनुक्रमे ४९.३% वरून ४७.६% एवढी घट झाली. ग्रामीण भागात शिक्षणाचा आणि कौशल्याचा अभाव असल्याने बेरोजगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. महिलांच्या बाबतीत कौटुंबिक जबाबदाऱ्या अधिक असल्याने कुटुंबाला प्राधान्य दिले जाते. तसेच कामाचे अधिक तास, वेतनदरातील भिन्नता, कामाच्या ठिकाणी पुरेशा सुविधांचा अभाव, महिलांच्या सुरक्षिततेचा अभाव इत्यादी कारणांमुळे महिला रोजगार प्रमाणात घट झालेली

**तक्ता क्र. १: भारतातील क्षेत्रनिहाय महिला श्रमिकांचे प्रमाण (१९८३ ते २०१७-१८)**

(आकडेवारी टक्केवारीत)

| वर्ष | प्राथमिक क्षेत्र | | | | द्वितीय क्षेत्र | | | | तृतीय क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | नागरी | | ग्रामीण | | नागरी | | ग्रामीण | | नागरी | |
| | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला |
| १९८३ | ७७.५ | ८७.५ | १०.३ | ३१.० | १०.३ | ७.७ | ३४.७ | ३१.० | १२.२ | ४.८ | ५५.० | ३८.० |
| १९८७-८८ | ७४.५ | ८४.७ | ९.१ | २९.४ | १२.१ | १०.० | ३४.० | ३१.७ | १३.३ | ५.२ | ५६.४ | ३८.५ |
| १९९३-९४ | ७४.१ | ८६.२ | ९.० | २४.७ | ११.२ | ८.३ | ३२.९ | २९.१ | १४.७ | ५.६ | ५८.० | ४६.३ |
| १९९९-०० | ७१.४ | ८५.४ | ६.६ | १७.७ | १२.६ | ९.० | ३२.८ | २९.४ | १६.१ | ५.८ | ६०.८ | ५२.९ |
| २००४-०५ | ६६.५ | ८३.३ | ६.१ | १८.१ | १५.५ | १०.२ | ३४.४ | ३२.४ | १८.० | ६.६ | ५९.५ | ४९.५ |
| २००९-१० | ६२.८ | ७९.४ | ६.० | १३.९ | १९.३ | १३.० | ३४.६ | ३३.३ | १७.८ | ७.६ | ५९.३ | ५२.८ |
| २०११-१२ | ५९.४ | ७४.९ | ५.६ | १०.९ | २१.९ | १६.८ | ३५.४ | ३४.० | १८.६ | ८.४ | ५९.१ | ५५.१ |
| २०१७-१८ | ५५.० | ७३.२ | ५.४ | ९.१ | २३.२ | १३.६ | ३६.० | ३०.१ | २२.० | १३.२ | ५८.७ | ६०.७ |

**स्त्रोत** : Report on Men and Women in India 2020,Pp.78 (www.mospi.nic.in)

दिसते.

तक्ता क्र. १ मध्ये १९८३ ते २०१७-१८ मधील भारतातील क्षेत्रनिहाय महिला श्रमिकांचे प्रमाण दर्शविले आहे. प्राथमिक क्षेत्रात महिला श्रमिकांचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण ग्रामीण व नागरी भागात अनुक्रमे ८७.५% व ३१.०% आहे. द्वितीय क्षेत्रात महिला श्रमिकांचे प्रमाण ग्रामीण भागात ७.७%, तर नागरी भागात ३१.० आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण खूप कमी दिसून येते. तसेच २०१७-१८ यावर्षी तृतीय क्षेत्र म्हणजेच सेवा क्षेत्रात कार्यरत महिला श्रमिकांचे प्रमाण ग्रामीण व नागरी भागात अनुक्रमे १३.२% व ६०.७% इतके आहे. १९८३ ते २०१७-१८ या कालावधीत महिला श्रमिकांचे प्रमाण प्राथमिक क्षेत्रात कमी होत आहे, तर द्वितीय व तृतीय क्षेत्रात वाढत आहे. प्राथमिक क्षेत्रात महिला श्रमिकांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अधिक असल्याने कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग अधिक दिसून येतो.

द्वितीय व तृतीय क्षेत्रात शिक्षण व कौशल्यांवर आधारित रोजगार अधिक असल्याने महिलांचे प्रमाण या दोन्ही क्षेत्रात तुलनेने कमी दिसून येते. ग्रामीण क्षेत्रात हे प्रमाण खूपच कमी आहे म्हणून महिला केंद्रित ग्रामीण उद्योगांना चालना देणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र. २: भारत व महाराष्ट्र तुलनात्मक श्रमदल सहभाग दर (१९९३-९४ ते २०१७-१८)**

(आकडेवारी टक्केवारीत)

| वर्ष | भारत | | | | महाराष्ट्र | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | नागरी | | ग्रामीण | | नागरी | |
| | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष |
| **१९९३-९४** | ४९.१ | ८७.६ | २३.८ | ८०.१ | ५२.६ | ५५.१ | १६.९ | ४७.७ |
| **१९९९-००** | ३६.४ | ८४.५ | १८.० | ७८.२ | ४८.८ | ५३.७ | १३.३ | ३८.० |
| **२००४-०५** | ४९.७ | ८६.४ | २४.६ | ७९.६ | ५६.० | ५६.६ | १९.० | ४७.४ |
| **२००९-१०** | ३७.८ | ८२.५ | १९.४ | ७६.२ | ५६.७ | ५९.२ | १४.२ | ४३.६ |
| **२०११-१२** | ३५.८ | ८१.३ | २०.५ | ७६.४ | ५४.९ | ५७.६ | १६.६ | ३८.८ |
| **२०१७-१८** | २४.६ | ७६.४ | २०.४ | ७४.५ | ५३.७ | ५५.७ | १४.९ | २८.९ |

**स्रोत** : Report on Men and Women in India 2020 (www.mospi.nic.in).

तक्ता क्र. २ मध्ये १९९३-९४ ते २०१७-१८ या काळातील भारत व महाराष्ट्र तुलनात्मक श्रमदल सहभाग दर दर्शविला आहे. भारतात ग्रामीण भागात पुरुषांच्या तुलनेत महिलांचा श्रमदल सहभाग दर १९९३-९४ या वर्षी १.७६ पटीने कमी होता, तर २०१७-१८ या वर्षात हा दर जवळपास तीन पटीने कमी झाला आहे. नागरी भागात हे प्रमाण १९९३-९४ मध्ये व २०१७-१८ या वर्षात अनुक्रमे ३.३ व ३.६५ पटीने कमी आहे. भारतात महिला व पुरुष श्रमदल सहभागात वर्षागणिक घट होत आहे. महाराष्ट्रात ग्रामीण भागात महिला व पुरुष सहभाग दर जवळपास समान आहे. तर नागरी भागात हा दर १९९३-९४ या वर्षात २.८८ तर २०१७-१८ यावर्षी जवळपास दुपटीने कमी आहे. राज्यात महिलांचा श्रमदल सहभाग दर ग्रामीण भागात २००४ ते २०१० या कालावधीत ५६.७ टक्क्यांपर्यंत होता. त्यानंतर मात्र यात घट झाली आहे. तर नागरी भागात हा दर २००४-०५ पर्यंत वाढला, मात्र त्यानंतर यात घट होत आहे. नागरी भागात अधिक कौशल्य व तंत्रप्रणाली आधारित रोजगार निर्मिती होत असल्याने महिलांचे प्रमाण नागरी भागात कमी दिसते, तर ग्रामीण भागातील महिला मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्रात कार्यरत असल्याने त्यांचा सहभाग ग्रामीण भागात अधिक आहे.

**महिला आणि उद्योजकता:**

महिला उद्योजकता हे महिला रोजगार निर्मितीसाठी एक उत्तम व शाश्वत माध्यम आहे. महिला त्यांच्या कौशल्यांचा पुरेपूर वापर करून उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करू शकतात. त्यामुळे महिलांनी अधिकाधिक उद्योजकतेकडे वळणे हा त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी एक उत्तम मार्ग ठरू शकतो. शासकीय पातळीवर महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविले जातात. जेणेकरून महिला अधिकाधिक स्वयंरोजगारात सामावल्या जातील आणि समाजातील इतर महिलांना देखील प्रेरणा मिळेल.

तक्ता ३ नुसार, २०१७-१८ या वर्षातील भारतातील उद्योगांच्या मालकीनुसार महिला व पुरुषांचे प्रमाण दर्शविण्यात आले आहे. महिला उद्योजकांचे एकूण प्रमाण २१.४९ असून ग्रामीण व नागरी भागात अनुक्रमे २०.७३% व ३०.३१% इतके प्रमाण आहे. महिला श्रमिकांचे प्रमाण बघता एकूण श्रमिक १८.२९% आहेत. तसेच ग्रामीण व नागरी भागात अनुक्रमे १८.८२% व २३.८१% एवढे प्रमाण आहे.

**तक्ता क्र. ३: भारतातील उद्योग व त्यात कार्यरत श्रमिकांची संख्या (वर्ष २०१४)**

| क्षेत्र | गट | कृषी उद्योग | | | कृषित्तर उद्योग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष उद्योजक | महिला उद्योजक | एकूण | पुरुष उद्योजक | महिला उद्योजक | एकूण |
| ग्रामीण | उद्योग | ९३४२६७० (७९.२७) | २४५२८१९ (२०.७३) | ११८३४२२२ (१००.०) | १६१४९८०९ (८५.३१) | २७९०२२५ (१४.६९) | १९०००१६९ (१००.००) |
| | श्रमिक | १६७०९८६३ (८२.१८) | ३६४१५३१ (१७.८२) | २०४३७३८८ (१००.०) | २८६७९८९७ (८६.१९) | ४६२३३३५ (१३.८१) | ३३४७५५८५ (१००.००) |
| नागरी | उद्योग | ७०७४३० (६९.६९) | ३०८९४८ (३०.३१) | १०१९२८६ (१००.०) | १७८७६७८३ (८७.७७) | २४९८८२७ (१२.२३) | २०४३६८४६ (१००.००) |
| | श्रमिक | १३११०८० (७६.१९) | ४११८१९ (२३.८१) | १७२९८७३ (१००.०) | ४२४३५५०३ (८९.९४) | ४७७१४९७ (१०.०६) | ४७४१७८६० (१००.००) |
| एकूण | उद्योग | १००५०१०० (७८.५१) | २७६१७६७ (२१.४९) | १२८५३५०८ (१००.०) | ३४०२६५९२ (८६.५९) | ५२८९०५२ (१३.४१) | ३९४३७०१५ (१००.००) |
| | श्रमिक | १८०२०९४३ (८१.७१) | ४०५३३५० (१८.२९) | २२१६७२६१ (१००.०) | ७११२५४०० (८८.३९) | ९३९४८३२ (११.६१) | ८०८९३४४५ (१००.००) |

**स्त्रोत:** Report on Men and Women in India 2020, Pp.94-95 (www.mospi.nic.in)
(कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते)

ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागात महिला उद्योजक आणि श्रमिकांचे प्रमाण अधिक आहे. परंतु महिला व पुरुषांची तुलना करता पुरुष उद्योजक व श्रमिक प्रमाण महिलांपेक्षा जवळपास पाच पटीने अधिक आहे. महिला उद्योजकतेत वाढ करण्यासाठी महिलांमध्ये शिक्षण, प्रशिक्षण आणि तंत्रशिक्षणाचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. तसेच महिलांसाठी शासकीय पातळीवर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांविषयी त्यांच्यात जागरुकता निर्माण करणे व त्वरित लाभ मिळणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र. ४ : रोजगाराच्या स्वरूपानुसार महिला श्रमिकांची संख्या (वर्ष २०१४)**

| क्षेत्र | कायमस्वरूपी | हंगामी | तात्पुरते | एकूण |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र** | ६१३०३८ (९२.२८) | ४४६१६ (६.७२) | ६६४६ (१.००) | ६६४३०० (१००.००) |
| **भारत** | ७१६६०१९ (८९.००) | ७२६४३५ (९.०२) | १५८३६५ (१.९८) | ८०५०८१९ (१००.००) |

**स्रोत :** Report on Men and Women in India 2020, Pp.97 (www.mospi.nic.in)

तक्ता क्र. ४ नुसार भारत व महाराष्ट्रातील महिला श्रमिकांच्या रोजगाराच्या स्वरूपानुसार वर्गीकरण केले आहे. भारतात कायमस्वरूपी काम करणाऱ्या महिला श्रमिकांचे प्रमाण सर्वाधिक ८९% इतके आहे, तर महाराष्ट्रात हे प्रमाण ९२% इतके आहे. भारताच्या तुलनेत राज्यात हे प्रमाण अधिक आहे. महिला श्रमिकांचे सर्वात कमी प्रमाण हे तात्पुरत्या स्वरुपात असून हंगामी स्वरूपात भारतात ९.०२% व राज्यात ६.७२% महिला काम करतात.

**महिला आणि आर्थिक सक्षमीकरण:**

केंद्र सरकारमार्फत भारतीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाअंतर्गत आंतराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्था, मुंबई या संस्थामार्फत राष्ट्रीय कुटुंब आणि आरोग्य याविषयीचे वेळोवेळी सर्वेक्षण केले जाते आणि त्याद्वारे भारतातील कौटुंबिक व आरोग्यविषयक माहिती संकलित केली जाते. पहिली फेरी १९९२-९३ यावर्षी सर्वेक्षण करून करण्यात आली, तर पाचवी फेरी २०१९-२० यावर्षी पूर्ण करण्यात आली. या सर्वेक्षणातून प्राप्त माहितीनुसार भारतीय महिलांची आर्थिक सक्षमीकरणाची माहिती तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ५ : भारत आणि महाराष्ट्रातील महिलांचे सक्षमीकरण**

(आकडेवारी टक्केवारीत)

| अ.क्र. | घटक | भारत | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१९-२० | २०१५-१६ | २०१९-२० |
| १ | कौटुंबिक निर्णयात महिलांचा सहभाग | ८४.० | ८८.७ | ८९.३ | ८९.८ |
| २ | पैसा आधारित कामे | २४.६ | २५.४ | २८.९ | ३४.७ |
| ३ | महिलांचे मालकीचे घर किंवा जमीन | ३८.४ | ४३.३ | ३४.३ | २२.९ |
| | स्वतंत्र आणि संयुक्तरीत्या | | | | |
| ४ | बँकेत स्वतःच्या नावाने बचत खाते | ५३.० | ७८.६ | ४५.३ | ७२.८ |
| ५ | स्वतःच्या नावावर भ्रमणध्वनी | ४५.९ | ५४.० | ४५.६ | ५४.८ |

**स्रोत:** राष्ट्रीय कुटुंब आणि आरोग्य सर्वेक्षण २०१९-२०

तक्ता क्र. ५ नुसार, २०१५-१६ व २०१९-२० या वर्षात भारतातील व महाराष्ट्रातील महिलांचे सक्षमीकरण दर्शविले आहे. कौटुंबिक निर्णयात स्वतःच्या आरोग्यविषयक निर्णय, कुटुंबातील मोठ्या वस्तू व सेवांची खरेदी व आप्तेष्ट किंवा माहेरी भेटण्यास जाण्याचा निर्णय या तीन घटकांचा समावेश आहे. २०१५-१६ च्या तुलनेत २०१९-२० मध्ये महिला सक्षमीकरणाचे प्रमाण वाढले आहे. २०१५ ते २०२० या काळात कौटुंबिक निर्णयात महिलांचे प्रमाण ४.७% नी वाढले आहे, तर जमीन व घराच्या मालकीनुसार महिलांचे प्रमाण ३८.४% वरून ४३.३% पर्यंत वाढले. तसेच बँकेत बचत खात्यात महिलांचे प्रमाण ५३.०% वरून ७८.६% एवढे झाले आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागात घर व जमिनीच्या मालकीचे प्रमाण तुलनेने कमी आहे, तर इतर बाबींमध्ये हे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रात महिलांचे कौटुंबिक निर्णयात सहभाग २०१९-२० मध्ये ८९.८% आहे. मालकीचे घर किंवा जमीन असणाऱ्या महिलांचे प्रमाण मात्र २०१५-१६ मध्ये ३४.३% होते, ते २०१९-२० मध्ये २२.९% पर्यंत कमी झाले आहे. पैसाधारित कार्य आणि मालकीचे घर व जमीन असणाऱ्या महिलांचे प्रमाण ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागात कमी आहे. उर्वरित बाबींमध्ये मात्र नागरी भागात महिलांचे प्रमाण अधिक आहे.

**महिला आणि वित्तीय साक्षरता:**

आजच्या आधुनिक आणि बोटांकीकरणाच्या (डिजिटल) युगात प्रत्येक व्यक्तीने वित्तीय साक्षर असणे आवश्यक आहे. वित्तीय साक्षरता ही विविध आर्थिक सेवा व साधनांची मागणी निर्माण करते व सामान्य जनतेला बँकेने उपलब्ध करून दिलेल्या साधनांची, सेवेच्या आवश्यकतेची व लाभांची माहिती करून देते. त्यामुळे वित्तीय समावेशकतेला गती मिळते. समाजाच्या सर्वच लोकांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आर्थिक साक्षरतेची नितांत गरज आहे. आजही महिला मोठ्या प्रमाणात आर्थिकदृष्ट्या वंचित आहेत. अशा महिलांवर लक्ष केंद्रित करून वित्तीय साक्षर करणे आवश्यक आहे. वित्तीय साक्षरतेचा साधारण अर्थ कार्यक्षमपणे वित्तविषयक निर्णय घेण्यासाठी कोणत्याही व्यक्तीकडे आवश्यक क्षमता असणे होय. वित्तीय साक्षर व्यक्ती वित्तविषयक व्यवस्थापन बौद्धिक क्षमतेच्या आधारे आणि कार्यक्षमपणे निवड करून करते. The Organization of Economic Co-operation and Development (OECD) नुसार, 'वित्तीय साक्षरता म्हणजे वित्तविषयक ध्येय आणि वित्तीय निर्णय घेण्यासाठी आवश्यक वित्तविषयक जागरुकता, ज्ञान, कौशल्य, दृष्टिकोन आणि वित्तीय वर्तणूक यांचा योग्य मेळ होय.'

वित्तीय ज्ञान, वित्तीय वर्तन आणि वित्तीय दृष्टिकोन हे तीन घटक वित्तीय साक्षरतेत महत्त्वाची भूमिका पार पाडतात. या तीन घटकांच्या आधारे प्रत्येक व्यक्तीच्या वित्तीय साक्षरतेचे मापन करता येते. सर्वाधिक वित्तीय साक्षरता असणारा देश ब्राझील (५०.२%) आहे. भारतात वित्तीय साक्षरतेचे प्रमाण ३६.८% इतके आहे. एकूण २७ देशांत भारताचा १९वा क्रमांक लागतो. The Standard and Poor's Ratings Services Financial Literacy Survey 2015 नुसार, जागतिक पातळीवर वित्तीय साक्षरतेत महिला व पुरुषांमध्ये ५ टक्क्यांनी तफावत दिसते. ३५% पुरुष तर ३०% महिला वित्तीय साक्षर होत्या. भारतात हे प्रमाण पुरुष आणि महिला अनुक्रमे २८ व २०% होते. भारतात महिलांमधील वित्तीय साक्षरता खूप कमी आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नॅशनल स्ट्रॅटर्जी फॉर फायनान्शिल एज्युकेशन २०२०-२५ या अहवालानुसार, भारतात २०१३ यावर्षी महिला व पुरुष वित्तीय साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे १६% व २३% होते. हेच प्रमाण २०१९ यावर्षी अनुक्रमे २१% व २९% इतके होते. महिला वित्तीय साक्षरतेचे प्रमाण ५% नी वाढले आहे. पुरुषांच्या तुलनेत

महिला साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. गृह व्यवस्थापन आणि सौदाशक्ती यात महिला पारंगत असल्यातरी आजही महिला आर्थिक निर्णयांसाठी पूर्णपणे कुटुंबातील पुरुषांवर अवलंबून असतात. परंतु महिलांवर प्रतिकूल परिस्थिती (जसे- विधवापण, घटस्फोट, गरिबी, निरक्षरता व कुटुंबावर आलेली आपत्ती इत्यादी) ओढवली तर आर्थिक व्यवहार करताना आणि बाहेरील जगाशी सामना करताना मात्र त्यांची कसोटी लागते. म्हणून महिलांनी कुटुंबातील आर्थिक व्यवहार समजून घेण्यासाठी त्यांना किमान वित्तीय साक्षर असणे आवश्यक आहे. जेणेकरून त्या कार्यक्षम आणि योग्य वित्तीय निर्णय घेतील. यामुळे त्यांच्या कुटुंबाला फायदा तर होईलच; तसेच त्यांच्या भावी पिढीला देखील याबद्दल लहानपणापासून ज्ञान अवगत होईल.

**सारांश :**

महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाचा संबंध बहुतेक वेळा श्रमशक्ती आणि उत्पन्नाशी संबंधित असतो. तथापि, रोजगार आणि उत्पन्नाच्या वाढीव प्रवेशामुळे महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती आणि निर्णय घेण्याच्या सामर्थ्यात सुधारणा होत नाही. सामाजिक-सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय अशा विविध घटकांना काही G20 देशांमध्ये सतत लिंग तफावतीसाठी जबाबदार असल्याचे म्हटले जाते. वास्तविक सक्षमीकरणासाठी, भक्कम सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि कायदेशीर उपायांसाठी, विविध क्षेत्रांमध्ये लिंगभाव समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी भेदभावमुक्त धोरणे आवश्यक आहेत. या संदर्भात, G20 चे दोन महत्त्वपूर्ण उपक्रम, उदा. महिला सक्षमीकरणासाठी W20 आणि We-Fi च्या स्थापनेमुळे महिलांना पुरुषांच्या जगात स्वतःला ठामपणे मांडण्यासाठी मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. G20 देशांमधील सरकारांनी महिलांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत लक्षणीय सुधारणा घडवून आणण्यासाठी सार्वजनिक, खाजगी संस्था आणि नागरी संस्था यांच्याशी घनिष्ठ भागीदारीत प्रभावीपणे कार्य केले पाहिजे. येथे हेही आवर्जून सांगावे लागेल की, आतापर्यंत मिळालेले परिणाम हे सकारात्मक उपक्रमांचे फलित आहेत. महिला सक्षमीकरण ही एक क्रमिक प्रक्रिया आहे आणि ती एका रात्रीत साध्य होऊ शकत नाही. तळाशी असलेल्यांबद्दलची एकूण धारणा बदलली पाहिजे. प्रस्तुत लेखात भारतातील महिलांची संख्या, शिक्षण, आरोग्य, रोजगार, निर्णयक्षमता, उद्योजकता, महिला सक्षमीकरण आणि वित्तीय साक्षरता या घटकांचे विश्लेषण केले आहे. भारतातील महिलांची स्थिती पाहाता आजही महिला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निर्णय क्षमतेतील प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी दिसून येते. शासकीय पातळीवर महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविले जातात. तसेच महिलांना समाजात समान दर्जा मिळवून देण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत. याविषयी महिलांमध्ये जागरुकता वाढविणे गरजेचे आहे. सामाजिक पातळीवर लिंगभाव समानता प्रस्थापित करणे आवश्यक आहे, तरच देशाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो.

**संदर्भ**

1. Beena Pandey (2020), "Moving ahead for women empowerment in G20', G20 DIGEST, April 2020.
2. Kishor and Gupta, (2004), "Women's Empowerment in India and Its States-Evidence from the NFHS', Economic and Political Weekly, Vol.39, January 2004.
3. Nelasco Shobana, (2010), "Status of Women in India', Deep and Deep Publications, New Delhi, 1st Edition.
4. Pratisha Padmasri Deka (2015), "Financial literacy and financial inclusion for women empowerment: A study', International Journal of Applied

Research 2015; Vol.1(9)
5. The Ministry for Women and Child Development (2015) High Level Committee Report on the status of Women 2015.
6. The Ministry of Health and Family Welfare (2016), National Family Health Survey (NFHS-4) 2015-16.
7. The Ministry of Statistics and Programme Implementation (2019), Central Statistical Office, Time Use in India Survey-2019.
8. The Ministry of Health and Family Welfare (2020), National Family Health Survey (NFHS-5) Maharashtra 2019-21.
9. The Ministry of Statistics and Programme Implementation (2020), Report on Men and Women 2019-20.
10. The World Economic Forum (2021), Global Gender Gap Report 2021.
11. United Nations Development Programme (UNDP) (2020), Human Development Report 2020.
12. बोरसे संगीता (२०२२), 'कौटुंबिक वित्तीय व्यवस्थापनात महिलांची भूमिका- पुणे शहराच्या संदर्भात', अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई, जून २०२२.

◆

## शोधनिबंध पाठविण्यासंबधी सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४६ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन दिनांक २,३ व ४ नोव्हेंबर २०२३ रोजी वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता.पुरंदर, जि. पुणे येथे होत आहे. शोधनिबंधासाठीची शब्दमर्यादा २००० व सोबत ३०० ते ४०० शब्दांत गोषवारा अत्यावश्यक आहे. शोधनिबंध मराठीतच असणे आवश्यक असून यापूर्वी तो इतरत्र प्रकाशित झालेला नसावा. शोधनिबंधावर आपला आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, महाविद्यालयाचे नाव व पत्ता इत्यादी तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. शोधनिबंधाची मूळ वर्ड फाईल आणि पीडीएफ फाईल maparishad1977@gmail.com या मेलवर १५ सप्टेंबर, २०२३ पूर्वी मेल करावी. मा. अध्यक्ष यांना फोन करुन मेल व्यवस्थित पोहोचल्याची खात्री करुन घेतल्यास अधिक सुलभ होईल.

**शोधनिबंधासाठी विषय**

१. मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण.

२. केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती.

३. महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

प्रा. डॉ. दिलीप सोपानराव अर्जुने, 'राही सदन' नेवासेकर नगर, मंठा रोड, जालना ४३१२०३

मो. : ९४२२२१९७२३ ई-मेल : maparishad1977@gmail.com

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# चिमण्यांची घरं

**अविनाश कुलकर्णी** †

प्रस्तुत लेख माझे दिवंगत वडील कै. श्री.दिगंबर कुलकर्णी यांना समर्पित

**प्रस्तावना -** अर्थशास्त्रीय परिभाषेत अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा सांगितल्या आहेत. त्यापैकीच एक महत्त्वाची मूलभूत गरज म्हणजे निवारा अर्थात घर. घर ही माणसाची नुसती कौटुंबिक व आर्थिक गरज आहे असे नाही, तर त्यामध्ये मानवी मनाची भावनिक जडणघडण अत्यंत महत्त्वाची आहे. चिमण्यांची घरं अर्थात मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावरील चर्चा करणारा हा लेख आहे. १९व्या शतकात मुंबईमध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळात चालू झालेल्या अनेक कापड गिरण्यांमुळे मुंबईत कामानिमित्त स्थलांतरित झालेल्या कामगारांच्या हाताला काम होते. त्यामुळे मुंबई हे पूर्वेकडील मँचेस्टर म्हटले जात होते. परंतु एका ऐतिहासिक संपाने मुंबईतील या कापड गिरण्यांच्या धडधडणाऱ्या चिमण्या थंडावल्या.

महाराष्ट्र राज्याचे नवे वस्त्रोद्योग धोरण नुकतचे म्हणजे मे, २०२३ मध्ये जाहीर करण्यात आले आहे. त्यामध्ये अत्याधुनिक यंत्रसामग्रीवर आधारित कापड गिरणी उद्योगासाठी चांगल्या संधी आहेत. परंतु १९८२ च्या ऐतिहासिक संपानंतर मुंबईत बंद पडलेला कापड गिरणी उद्योग पुन्हा तिथेच सुरू होईल असे चिन्ह नाही. मुंबईतील या कापड गिरण्यांच्या जागेत त्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांचा घरासाठीचा संघर्ष गेली अनेक दशके चालू आहे, त्यासंदर्भातील विवेचन करणारा हा लेख पुढीलप्रमाणे.

**उद्दिष्टे -** १. मुंबईतील कापड गिरण्यांच्या विकासाची पार्श्वभूमी अभ्यासणे. २. मुंबईतील कापड गिरणी कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे. ३. विशेषत: त्यांची राहाण्याची व्यवस्था अर्थात त्यांच्या घरांच्या समस्येचा अभ्यास करणे. ४. मुंबईतील कापड गिरणी कामगारांचा संघर्ष आणि त्याची फलनिष्पत्ती यांचा आढावा घेणे. इ.

**पद्धती आणि मर्यादा -** हा लेख दुय्यम स्त्रोतांद्वारे उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित आहे. यामध्ये लेखाची मांडणी करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तर हा लेख फक्त मुंबईतील कापड गिरणी कामगारांच्या घरांच्या समस्येसंदर्भात आहे, ही याची मर्यादा आहे. या लेखास मार्क्सच्या वर्गसंघर्षाची सैद्धांतिक पार्श्वभूमी आहे. तसेच मास्लो

† सिनियर फेलो, सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र (CCRT), नवी दिल्ली संशोधन केंद्र : गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे. आजीव सभासद क्र.१५२५, भ्रमणध्वनी : ९८२२२०३१८७, ई-मेल : dravikul@gmail.com

यांनी सांगितलेल्या गरजांची श्रेणी या सैद्धांतिक संकल्पनेची पार्श्वभूमीसुद्धा आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा -** भारतातील कामगार चळवळ आणि मुंबईतील कामगार चळवळ विशेषत: गिरणी कामगार चळवळ यासंदर्भात वेगवेगळ्या लेखकांनी वेळोवेळी साहित्याची निर्मिती केली आहे, त्याचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणे.

■ ज्ञानेश्वर रामचंद्र जगताप (जुलै २०१२), गिरणी कामगारांमधील सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा अभ्यास (कुर्ला, पूर्व (मुंबई) कामगार नगर, वसाहती संदर्भात), टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयातील एम्.फिल. पदवीसाठी सादर केलेला लघुशोध प्रबंध.

■ बासूदेव साहू (१९९९), Labour Movement in India, Rawat Publication, Jaipur.

■ नीरा आडारकर (२००४), One Hundred Years, One Hundred Voices: The Mill workers of Girangaon, An oral History, Seagal Books.

■ शशी भूषण उपाध्याय, Cotton Mills Workers in Bombay 1875 to 1918 – Conditions of work and life (http : www. epw.in / review-article / cotton-mill-workers-bombay-1875-1918-conditions-work-and-life.html).

■ प्रतिमा भट्टाचार्य, Untangling the knot between Mumbai and its Mills, (http:www.livemint.com / industry / PyqCrPOCAfRYBw22YquB2N).

■ हेमंत बाबू, Death of an Industrial City: Testimonies of life around Bombay Textile Strike of 1982, (http : www . india labourarchives.org / publications / Heman % 20Babu.htm)

■ नीरा आडारकर आणि मीना मेनन (१९९९), कथा मुंबईच्या गिरणगावाची, प्रस्तावना प्रा. राम बापट, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

वरील संदर्भ साहित्याचा आढावा घेताना या विविध साहित्यामध्ये भारतातील कामगार चळवळ आणि मुंबईतील गिरणी कामगारांचा संप याविषयीचे विवेचन व विश्लेषण केलेले आढळून येते. प्रस्तुत लेखामध्ये या साहित्यामधील मुंबईतील गिरणी कामगारांचा संघर्ष व त्याचे परिणाम याची पार्श्वभूमी आहे, तर विशेष म्हणजे मुंबईतील गिरणी कामगारांची राहाण्याची अत्यंत हालाकीची अवस्था आणि त्यांचा स्वत:च्या हक्काच्या घरांसाठीचा संघर्ष या मुद्द्यावर भर देण्यात आला आहे. ही या लेखातील आणि पूर्वोक्त संदर्भ साहित्य यातील तफावत तथा वेगळेपणा आहे.

**मुंबईतील कापड गिरणी उद्योगाच्या विकासाची पार्श्वभूमी -** ब्रिटिशपूर्वकाळात हिंदुस्थानात प्रामुख्याने शेती व पारंपारिक उद्योगांची भरभराट होती. त्यापैकी शेती आणि कलाकुसरीच्या वस्तूंच्या व्यापारामध्ये हिंदुस्थान अग्रेसर होता. यामध्ये हाताने विणलेले मुलायम सुती व रेशमी कापड आणि कपडे यांचा मोठा वाटा होता. भारतातून या वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यातही होत असे. त्यामुळेच तत्कालीन भारतातील लोक सुखी आणि समाधानी होते. परंतु ब्रिटिश काळात या एतद्देशीय उद्योगांचा झपाट्याने ऱ्हास होत गेला. अनेक देशी उद्योगधंदे बुडाले. हिंदुस्थानातून पक्क्या मालाऐवजी कच्च्या मालाची निर्यात होऊ लागली, तर यंत्रसामग्रीवर तयार करण्यात आलेल्या पक्क्या मालाची आयात होऊ लागली. त्यामुळे हिंदुस्थानच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठा असमतोल निर्माण झाला आणि ब्रिटिश काळात भारत दरिद्री व कंगाल बनला.

सन १८२० साली भारतामध्ये कापडाची एकूण आयात फक्त ३.५ लाख रुपये होती. परंतु हा आयातीचा खर्च १८६० पर्यंत वाढून कापडाची एकूण आयात रु.१९.३ दशलक्ष (मिलियन) इतकी झाली. तत्कालीन भारतामध्ये आधुनिक यंत्रसामग्रीवर कापड निर्मिती

उद्योगास इंग्लंडमधील कापड गिरणी मालकांचा विरोध होता. परंतु ब्रिटिश टेक्स्टाईल मशिनरी उत्पादकांच्या पाठिंब्याने सरतेशेवटी लँकेशायर गिरणी मालकांचा विरोध मोडून काढला गेला आणि मुंबईला 'बॉम्बे स्पिनिंग मिल' ही पहिली कापड गिरणी सन १८५४ मध्ये कोवसजी नानाभाई दावर यांनी सुरू केली. ही कापड गिरणी सुती कापडाची निर्मिती करून इंग्लंडला त्याची निर्यात करत असे.

त्यानंतर १८७० सालापर्यंत मुंबईत १३ कापड गिरण्या उत्पादन करू लागल्या. १८७५ पर्यंत मुंबईतील या गिरण्यांची संख्या तर ७० पर्यंत पोहोचली. २०व्या शतकाच्या सुरुवातीस १९१५ सालापर्यंत मुंबईतील कापड गिरण्यांची एकूण संख्या ८३ इतकी झाली. त्यामुळे मुंबईची ओळख ही पूर्वेकडचे मँचेस्टर म्हणून होऊ लागली. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानकडून या क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाल्याने मुंबईतील या कापड गिरण्यांची संख्या थोडी घटली आणि १९५३ साली ८३ पैकी फक्त ५३ कापड गिरण्या मुंबई शहरात कार्यरत होत्या. या कापड गिरण्या मुख्यत्वे मुंबईतील गिरगावमध्ये सुरू झाल्याने त्यास गिरणगाव म्हणून ओळखले जाऊ लागले. मुंबईमधील या कापड गिरण्यांपैकी काही प्रमुख गिरण्यांची नावे पुढीलप्रमाणे -

परळ येथील झेन्ही मिल, फिनले मिल, दादर येथील कोहिनूर मिल १ व २, इंडिया युनायटेड नं.६, वरळीतील फिनिक्स मिल, मधुसुदन मिल, सिताराम मिल, पोदार प्रोसेसिंग आणि भारत मिल, लालबाग येथील कमला मिल, जाम मिल, तसेच डॉन मिल, श्रीराम मिल, टाटा मिल, बॉम्बे स्पिनिंग मिल, दिग्विजय मिल, दि खटाव मिल, भायखळा येथील ज्युपीटर मिल, काळाचौकी येथील युनायटेड नं.४ इ. अशा तऱ्हेने मुंबईतील कापड गिरणी उद्योगासाठी मुख्यत्वे दक्षिण मुंबईतील जागा निवडली गेली होती. त्यापैकी लोअर परेल, परेल आणि भायखळा ही कापड गिरण्यांची प्रसिद्ध ठिकाणे आहेत. मुंबईतील कापड गिरण्यांच्या विकासाचा हा मुख्य भाग वरळी ते भायखळा असा आहे.

मुंबई आणि भारतातील कापड गिरण्या या मुख्यत्वे करून भारतीयांकडूनच चालविल्या जात होत्या. १९२५ साली ५३ कापड गिरण्यांपैकी फक्त १४ ब्रिटिशांच्या मालकीच्या होत्या, तर उर्वरित कापड गिरण्या या भारतीय उद्योजकांच्या मालकीच्या होत्या. १९२५ सालच्या एका नोंदीनुसार, या गिरण्यांच्या ३८६ संचालकांपैकी फक्त ४४ संचालक हे ब्रिटिश होते, तर उर्वरित सगळे संचालक हे भारतीय होते.

**मुंबईतील गिरणी कामगारांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती -** मुंबईतील या कापड गिरण्यांमध्ये काम करणारे ९०% कामगार हे गिरण्यांच्या अगदी जवळ म्हणजे पायी चालत जाण्याच्या अंतरावर राहात होते. यामध्ये बहुसंख्य कामगार हे मुंबईबाहेरून स्थलांतरित झालेले होते. त्यामध्ये मराठी बोलणाऱ्या कामगारांची संख्या खूप मोठी होती. विशेष म्हणजे बहुसंख्य कामगारांचे कुटुंबीय हे गावीच राहात होते तर घरातील फक्त पुरुष श्रमजीवी मुंबईत कामासाठी स्थलांतरित झालेला होता. परंतु मुंबईतील या कापड गिरण्यांमध्ये स्त्री आणि पुरुष दोन्ही कामगार आढळून येत होते. १८९२ साली सुमारे १ लाख कामगार या गिरणी उद्योगात कामास होते. त्यापैकी सुमारे २० हजार स्त्री कामगार होते. यातील मोठी संख्या ही कोकण, गोवा व कर्नाटकातून स्थलांतरित झालेली होती. हे कामगार त्यांच्या वयाच्या खूप लवकरच कामास सुरुवात करत असत. काही कामगार तर अवघे १६ वर्षांचे होते. फॅक्टरी ॲक्ट १८४७ अस्तित्वात येईपर्यंत हे कामगार सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत १२ तास काम करत होते. या कायद्यानंतर त्यांच्या कामाचे तास कमी करून ते १० तास करण्यात आले.

सुरुवातीस या कामगारांना एखाद्या वसतिगृहात

राहाण्याची सोय होत असे. नंतर त्यांना जागा मिळाली की, ते छोट्या छोट्या आकाराच्या खोल्या असणाऱ्या वसाहतीत ज्याला चाळ असे म्हटले जाते तेथे राहाण्यासाठी जात. १९२१ साली करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणानुसार परेलमधील २७% लोकसंख्या ही एका खोलीत ६ किंवा त्यापेक्षा अधिकजण राहात असलेली होती. या चाळी सरकार व गिरणी मालकांनी बाधलेल्या होत्या. परंतु गुणवत्तापूर्ण घरांच्या बाबतीत असणारी कोणतीही काळजी यासाठी घेतली गेलेली नव्हती. १९२९ मध्ये दादरमधील एक चाळ काळोखी असल्याचे म्हटले जात जिथे दिवसासुद्धा पुरेसा सूर्यप्रकाश नव्हता. हवा खेळती नव्हती. पावसाळ्यामध्ये गटारातील घाण पाण्याबरोबर वाहून येऊ नये म्हणून या घरांच्या खिडक्या बंदच ठेवल्या जात होत्या. त्याचबरोबर कामगारांच्या संडास व बाथरुमच्या सोयीचासुद्धा मोठा अभाव होता. त्यामुळे विशेषत: स्त्रियांची खूपच गैरसोय होत असे. लोकसंख्येची मोठी घनता, अल्प उत्पन्न आणि आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे लोकांमध्ये वेगवेगळ्या आजारांचा प्रादुर्भाव होत असे.

या गिरणगावातील हे कामगार वजा रहिवासी त्यांचा बहुसंख्य वेळ घरापेक्षा रस्त्यांवरच घालवतात. मोहरम, गणेश चतुर्थी आणि गोकुळाष्टमी या सणांमध्ये त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. स्थानिक दुकानदार आणि गिरणी मालक या सणांसाठी त्यांच्या वाट्याची वर्गणी जमा करीत. स्थानिक दारूचे दुकान आणि व्यायामशाळा हे सर्वसाधारणपणे भेटण्याचे (मीटिंगचे) ठिकाण. गिरणगावातील कामगारांना कला म्हणजे कविता, नाटक आणि तमाशा यांची भारी आवड. अनेक छोट्या-मोठ्या कार्यक्रमांमध्ये आपल्यातील सुप्त कलागुणांचे सादरीकरण या कामगारांकडून केले जात होते.

**मुंबईतील कामगार चळवळ -** भारतात कामगार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली ती नारायण मेघाजी लोखंडे यांनी. सुरुवातीच्या काळात रेल्वे व पोस्ट खात्यात नोकरी केल्यानंतर लोखंडे यांना मुंबईतील एका कापड गिरणीत स्टोअरकीपर म्हणून नोकरी मिळाली. तत्कालीन कामगारांचे हाल पाहून त्यांनी फावल्या वेळात कामगारांमध्ये काम करायला सुरुवात केली. त्यातूनच १८९० साली स्थापन केलेली बाँबे मिलहँड्स असोसिएशन ही भारतातील पहिली कामगार संघटना निर्माण झाली. मुंबईतील गिरणी कामगारांच्या तक्रारींकडे जनतेचे व सरकारचे लक्ष वेधणे आणि १८८१ सालच्या फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणा घडवून आणणे, ही या असोसिएशनची दोन प्रमुख उद्दिष्ट्ये होती. अशा प्रकारे नारायण मेघाजी लोखंडे हे भारतातील कामगार चळवळीचे जनक मानले जातात तर ना.म. जोशी हे या कामगार चळवळीचे पितामह मानले जातात.

मुंबईतील या कापड गिरणी कामगारांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही सक्रिय सहभाग होता. १९०७ साली लोकमान्य टिळकांना झालेल्या अटकेच्या विरोधातील उठावामध्ये सुमारे ७० गिरणी कामगारांना हुतात्म्य प्राप्त झाले. १९०८ मध्ये मुंबईत अनेक कामगार हे आंदोलन करत असताना मारले गेले. कामगारांच्या उठावाचा आणि बलिदानाचा इतिहास तत्कालीन राज्यकर्ते आणि उद्योगपतींनी दाबून ठेवला असल्याचे म्हटले जाते.

**मुंबईतील कापड गिरणी कामगारांचा ऐतिहासिक संप व त्याचे परिणाम -** स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई व शहराच्या आजूबाजूच्या परिसरात इतर उद्योगधंद्यांची उभारणी झाली, तर दुसऱ्या बाजूस या कापड गिरण्यांना नफा कमविणे अवघड झाले होते. यापैकी बहुसंख्य कापड गिरण्या या तोट्यात चालत होत्या. तसेच वर्षानुवर्षे मुंबईतील या कापड गिरणी कामगारांच्या हालाकीच्या जीवनामध्ये कोणतीही सुधारणा घडून आलेली नव्हती.

सन १९८१ साली श्री.दत्ता सामंत यांची मुंबईतील गिरणी कामगारांच्या एका मोठ्या गटाने मुंबई गिरणी

मालक संघ (मिल ओनर्स असोसिएशन) आणि कामगार यांच्यातील वादात नेता म्हणून निवड केली. श्री.सामंत यांनी 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' या संघटनेचे नेतृत्व केले. श्री.सामंत यांनी मुंबईतील संपूर्ण कापड गिरणी उद्योग एक वर्षापेक्षा अधिक काळ बंद राहील, अशी संपाची योजना तयार केली. मुंबईतील जवळपास २,५०,००० गिरणी कामगार संपावर गेले आणि ५० कापड गिरण्या बंद झाल्या. ऑगस्ट, १९८२ मध्ये मुंबई शहर पोलीस गिरणी कामगारांसाठी सहानुभूतीपूर्वक संपावर गेले. श्री.सामंतांचा हा प्रभाव मुंबई बंदर आणि गोदी कामगारांवर पडू नये. त्यासाठी तत्कालीन सरकारने श्री.सामंतांच्या मागण्या नाकारून ठोस पवित्रा घेतला. असंघटितपणा आणि असमाधानकारक संपावरील तोडगा यांमुळे बहुसंख्य गिरणी मालकांनी त्यांचे उद्योग मुंबई शहराबाहेर हालविले. शहरातील कापड गिरण्या बंद पडण्यामुळे हजारो कामगार बेकार झाले.

**परिणाम -** या ऐतिहासिक संपामुळे मध्य मुंबईतील बहुसंख्य ८० पेक्षा जास्त कापड गिरण्या बंद झाल्या आणि संपानंतर १,५०,००० पेक्षा जास्त कामगार बेरोजगार झाले. मुंबईत कापड गिरणी उद्योग मोठ्या प्रमाणात दिसेनासा झाला व संपानंतर कामगारांचे स्थलांतरही कमी झाले.

तद्नंतर १९९०च्या सुमारास मुंबईतील कापड गिरणींच्या पुनर्विकासास सुरुवात झाली. यामध्ये अनेक बांधकाम व्यावसायिकांनी या गिरण्यांच्या जागा खरेदी केल्या. त्या जागांवर गृहप्रकल्प आणि कार्यालये व दुकानांसाठी व्यावसायिक प्रकल्प उभारण्यात आले. परंतु मुंबईतील या कापड गिरणींमध्ये काम करणाऱ्या लाखो कामगारांची एक संघटना गिरणी कामगार समिती ही गिरणी कामगारांच्या वतीने तेथील जागा आणि काम यासाठी संघर्ष करत आहे. आजही हे कामगार १०० चौरस फुटांच्या घरामध्ये ८ ते १० जणांच्या संख्येने राहात आहे.

अनेक गिरण्यांच्या जमिनींचे दीर्घ भाडेकरार १९८४-८५ साली संपुष्टात आले होते. त्यानंतर मुंबई महापालिकेने या जमिनी परत आपल्या ताब्यात घेणे गरजेचे होते. ही कायदेशीर बाब खूप उशिराने कामगारांना समजली. त्यामुळे गिरणी मालकांनी संधी न देता गिरणीतील साचे व अन्य सामग्री रात्रीच्या अंधारात बाहेर काढण्याचा उद्योग केला. याचकाळात जमिनी नावावर करण्याचा निर्णय झाला आणि तो अमलातही आला.

विकास नियंत्रण नियमन क्र.५८, १९९१ (Development Control Regulation 1991) नुसार, जर कापड गिरणी मालक गिरणीची जागा पुनर्विकसित करू इच्छित असेल, तर त्या जागेचे तीन समान हिस्से करण्यात येतील. त्यापैकी एक हिस्सा मुंबई महापालिकेस मोकळी जागा व सुविधा विकसित करण्यासाठी, दुसरा हिस्सा म्हाडा (Maharashtra Housing and Area Development Authority - MHADA) घरांच्या विकासासाठी, या घरांपैकी १/२ घरे ही गिरणी कामगारांसाठी राखीव असतील असे वरील नियमन मध्ये २००१ मध्ये सुधारणा करून नमूद करण्यात आले. तिसरा हिस्सा गिरणी मालकांसाठी, असे त्यामध्ये नमूद केले गेले. म्हणजे मुंबईतील कापड गिरणीच्या आवारातील एकूण जागेच्या ३३% जमीन गिरणी कामगारांसाठी, ३३% जमीन मुंबई महापालिकेला आणि बाकीची ३३% जमीन गिरणी मालकांना मिळणार होती. यामध्ये मुंबई महापालिकेला आणि गिरणी कामगारांना घरासाठी अत्यंत कमी जमीन मिळाली व गिरणी मालकांचा मात्र मोठा फायदा झाला.

**चिमण्यांची घरं -** मुंबईतील गिरणी कामगारांना घरं देण्याच्या निर्णयानंतर सरकारच्या आदेशाप्रमाणे म्हाडाने २०१० मध्ये बंद पडलेल्या ५८ कापड गिरण्यांतील कामगारांसाठी सारस्वत बँकेमार्फत अर्ज स्वीकृती मोहीम राबविली. त्यामध्ये एकूण १ लाख

१० हजार ३२३ गिरणी कामगारांची माहिती जमा झाली. त्यानंतर उर्वरित कामगार आणि मृत कामगारांच्या वारसदारांना संधी देण्याची मागणी गिरणी कामगारांच्या संघटनेने केल्यामुळे पुन्हा ॲक्सिस बँकेद्वारे २०११ मध्ये माहिती संकलित करण्यात आली. त्यावेळी एकूण १ लाख ४८ हजार ८६७ अर्ज प्राप्त झाले. पहिल्या टप्प्यामध्ये १९ गिरण्यांच्या जमिनींवर ६ हजार ९२५ घरांची निर्मिती करण्यात आली. यापैकी ज्यांना घरांचे वितरण झाले त्यांना सुमारे साडेसात लाख रुपयांची किंमत भरून घराचा ताबा मिळवताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले.

**तक्ता क्र. १ : मुंबईतील काही कापड गिरण्यांची जमीन आणि घरांची उपलब्धता**

| कापड गिरणी | जमिनीचे क्षेत्रफळ चौ.मी. | अंदाजित घरांची संख्या |
|---|---|---|
| बाँबे डाईंग मिल, वडाळा | २६,५५६ | २,९५१ |
| सेंच्युरी मिल | १८,९७१ | २,११० |
| बाँबे डाईंग मिल, वरळी | ५,७७० | ६४१ |
| श्रीनिवास मिल | ४,५५५ | ५२० |
| प्रकाश कॉटन मिल | ५,०६८ | ५१२ |
| वेस्टर्न इंडिया मिल | २,९५२ | २५६ |
| भारत टेक्स्टाईल मिल | १,९३६ | २१५ |
| ज्युबिली मिल | १,४५७ | १५८ |
| न्यू ग्रेट ईस्टर्न मिल | १,२५४ | १४३ |
| वेस्टर्न इंडिया मिल | १,१७५ | १२० |

**स्त्रोत :** महाराष्ट्र टाइम्स, २९ डिसेंबर २०१४, पृष्ठ ६

दुसरा टप्पा यामध्ये वरळी येथील सेंच्युरी मिल, लोअर परळ येथील भारत (पोद्दार) मिल, प्रकाश कॉटन मिल आणि दादर येथील रुबी मिल याठिकाणी गिरणी कामगारांसाठी एकूण २ हजार ६१० घरं उपलब्ध करण्याचे धोरण होते. असे असले तरीही गिरणी कामगारांची संख्या खूप मोठी आहे. मुंबईत एवढ्या घरांच्या निर्मितीसाठी जागाच शिल्लक नाही. त्यामुळे गिरणी कामगारांच्या प्राप्त अर्जांपैकी सुमारे ९५% घरांपासून वंचितच राहाणार, असे दिसून येते.

**सारांश -** स्वातंत्र्यपूर्वकाळात रोजगारासाठी मुंबईमध्ये स्थलांतरित झालेल्या कामगारांपैकी कापड गिरणी कामगारांची संख्या खूप मोठी होती. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटकातील कामगार अधिक संख्येने होते. त्यांची मुंबईमध्ये राहाण्याची व्यवस्था अत्यंत हालाकीची होती. तिथे अगदी मूलभूत सुविधांचा देखील अभाव होता. गिरणी कामगारांच्या अनेक समस्यांसाठी १९८२ साली कामगार नेते श्री.दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील गिरणी कामगारांनी संप पुकारला. त्याचा परिणाम म्हणून मुंबईतील अनेक कापड गिरण्यांच्या चिमण्या थंडावल्या आणि त्यापैकी अनेक दुसरीकडे स्थलांतरित झाल्या. मुंबईतील लाखो गिरणी कामगार बेकार झाले. त्याच्या समस्यांमध्ये मोठ्या

प्रमाणात वाढ झाली. या समस्या सोडविण्यासाठी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटना वेळोवेळी रस्त्यांवर उतरून आंदोलन करत आहेत. त्यापैकीच महत्त्वाची मागणी म्हणजे गिरणी कामगारांसाठी घरांची निर्मिती आणि वाटप ही आहे. परंतु २१व्या शतकाच्या तिसऱ्या दशकातही मुंबईतील या लाखो गिरणी कामगारांपैकी खूप मोठी संख्या या चिमण्यांच्या घरट्यांपासून वंचित राहाणार आहे हे प्रामुख्याने निष्कर्षास येते.

**संदर्भ :**


१. आडारकर नीरा आणि मेनन मीना, (१९९९), कथा मुंबईच्या गिरणगावाची, प्रस्तावना-प्रा. राम बापट, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

२. काळे भानू, (२०११), सांस्कृतिक महाराष्ट्र, संपादक-मधु मंगेश कर्णिक, प्रकाशक - सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ क्र. २६३-२६४.

३. जगताप ज्ञानेश्वर, (जुलै २०१२), गिरणी कामगारांमधील सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा अभ्यास (कुर्ला, पूर्व (मुंबई) कामगार नगर, वसाहती संदर्भात), टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयातील एम्.फिल. पदवीसाठी सादर केलेला लघुशोध प्रबंध महाराष्ट्र टाइम्स, मुंबई.

४. http://www.mumbai77.com/pages/mumbai-mills


◆


**Announcement for Call of Articles**

**Dr. Ravindra Sabnis Memorial Prize.**

Marathi Arthshatra Parishad has considered an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the calendar year 2022 in standard accredited journals an themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for Submission of the articles (Four Copies) for this year contest is 15th September, 2023, For further details, contact the undersigned at this address.

**Dr. Avinash Ramlal Nikam**
Plot No. 49, Ganesh Nagar,
Behind Sai Bal Rugnalay,
Shahada Dist. Nandurbar 425409
Cell. 9822665141

# कृषिक्षेत्र : रोजगार आणि उद्योजकता

**सूर्यकांत पांडुरंग गायकवाड** †
**अजय दरेकर** ††

**प्रास्ताविक:**

भारत हा जगातील दूध, कडधान्य आणि तागाचा सर्वात मोठा उत्पादक आहे आणि तांदूळ, गहू, ऊस, भुईमूग, भाजीपाला, फळे आणि कापूस उत्पादक देश म्हणून दुसऱ्या क्रमांकावर आहे. सिंचन सुविधा, गोदाम आणि कोल्ड स्टोरेज यांसारख्या कृषी पायाभूत सुविधांमध्ये वाढलेल्या गुंतवणुकीमुळे भारतातील उद्योगाला येत्या काही वर्षांत चांगली गती मिळण्याची अपेक्षा आहे. २०२२ पर्यंत कृषी उत्पन्न दुप्पट करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्याचे निश्चित केले होते; परंतु कोविड महामारीमुळे ते आणखी पुढे गेले आणि हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने भारताला वाटचाल करण्यास मदत करण्यासाठी अनेक सरकारी उपक्रमांची अपेक्षा आहे.

कृषी हा त्याच्या संलग्न क्षेत्रांसह, भारतातील उपजीविकेचा सर्वात मोठा स्त्रोत आहे, जिथे ७०% ग्रामीण कुटुंबे अजूनही त्यांच्या उपजीविकेसाठी प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहेत, ८२% शेतकरी लहान आणि सीमांत आहेत. या क्षेत्राच्या स्वरूपामुळे कृषिक्षेत्रातील नोकऱ्या आणि करिअरच्या संधी असंघटित आणि अनौपचारिक आहेत.

भारतातील कृषी उद्योग १७ प्रमुख क्षेत्रांमध्ये विभागला गेला आहे. ते शेती, कृषी उपकरणे, खते, कीटकनाशके, गोदाम, कोल्ड चेन, डेअरी मार्केट, फूलशेती, मत्स्यपालन, कुक्कुटपालन आणि बरेच इतरही काही आहेत.

सदर शोधनिबंधामध्ये भारतातील कृषिक्षेत्रातील आव्हाने कोणती आहेत, कोविड -१९ चा भारतातील शेतीवर काय परिणाम झाला, कृषिक्षेत्रातील संधी कोणत्या, तंत्रज्ञानाचा शेतीवर होणारा परिणाम आणि कृषी तंत्रज्ञानाचे फायदे कोणते इत्यादी बाबींचा आढावा घेतला आहे.

**भारतातील कृषिक्षेत्रातील आव्हाने :**

भारतातील कृषिक्षेत्र गेल्या अनेक वर्षांपासून अनेक आव्हानांना तोंड देत आहे. त्यापैकी काही आहेत - लहान आणि खंडित जमीनधारणा, बियाणे, खते आणि खतांची खरेदी, सिंचन सुविधा, सामाजिक क्षरण.

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७.
आजीव सभासद क्र. : १९०३, भ्रमणध्वनी : ७२१९२५६६०३, ई-मेल : speco7000@gmail.com
†† सहयोगी प्राध्यापक, मु.सा.काकडे महाविद्यालय, सोमेश्वर नगर, ता. बारामती, जि. पुणे ४१२३०६.
आजीव सभासद क्र. : ८६५, भ्रमणध्वनी : ९४२२२०१८५७ ई-मेल : darekarajay1857@gmail.com

**१. यांत्रिकीकरणाचा अभाव :** भारतातील कृषी कार्यांचे यांत्रिकीकरण करण्याची नितांत गरज आहे, जेणेकरून श्रमशक्तीचा अपव्यय टाळता येईल आणि शेती सोयिस्कर आणि कार्यक्षम बनवली जाईल. वेळेवर आणि अचूक शेती कार्ये पार पाडण्यासाठी आणि कृषी उत्पादन प्रक्रिया किफायतशीर करण्यासाठी शेतकऱ्यांना तांत्रिकदृष्ट्या प्रगत कृषी उपकरणे स्वीकारण्यास प्रोत्साहित केले पाहिजे.

**२. अपुरी वाहतूक :** मुख्य आव्हानांपैकी एक म्हणजे वाहतुकीच्या स्वस्त आणि कार्यक्षम साधनांचा अभाव. अनेक गावे मुख्य रस्ते आणि बाजार केंद्रांशी जोडलेली नसल्यामुळे, शेतकऱ्यांना आपला माल स्थानिक बाजारपेठेत कमी किमतीत विकावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी पुरेशी व परवडणारी वाहतूक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**३. अपुरी साठवण सुविधा :** अनेक ग्रामीण भागात साठवण सुविधा पूर्णपणे अनुपस्थित किंवा अपुरी आहेत. त्यामुळे शेतकरी कापणीनंतर लगेचच शेतमाल विकतात. यामुळे त्यांचे वैध उत्पन्न हिरावले जाते. तथापि, भारतीय खाद्य निगम (F.C.I.), केंद्रीय गोदाम महामंडळ (C.W.C.) इत्यादी सरकारे आणि कॉर्पोरेशन स्टोरेज आणि वेअरहाउसिंग क्रियाकलापांमध्ये गुंतलेली आहेत आणि बफर स्टॉक तयार करत आहेत.

**४. कृषी पत :** भारतात, ग्रामीण कर्जाच्या परिस्थितीत लक्षणीय बदल झाला असला तरी, सावकार अजूनही कृषी कर्जाचे सर्वात मोठे योगदानकर्ता आहेत. आज अनेक केंद्रीय सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, व्यावसायिक बँका, सहकारी पतसंस्था आणि काही सरकारी एजन्सी शेतकऱ्यांना सुलभ अटींवर कर्ज देत आहेत.

**५. कृषी विपणन :** चांगल्या आणि शाश्वत कृषी विपणनाच्या अनुपस्थितीमुळे, सामान्यतः स्थानिक व्यापारी आणि मध्यस्थांकडून शेतकऱ्यांचे शोषण केले जाते. सरकारने नियमन केलेल्या बाजारपेठांची स्थापना केली असली तरी, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची विक्री करण्यासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मची ओळख करून देणे आवश्यक आहे.

**मान्सूनचा लहरीपणा :** भारतातील शेती ही प्रामुख्याने मान्सूनवरच आधारित असल्याचे दिसते. सिंचनावर आधारित शेतीचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे बहुतांश शेती ही मान्सूनवर आधारित आहे आणि मान्सूनच्या लहरीपणामुळे शेतीच्या उत्पादकतेवर आणि रोजगारावर तसेच शेती आधारित उद्योगांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो.

**कोविड-१९ चा भारतातील शेतीवर परिणाम :**

भारताच्या कृषिक्षेत्राने कोविड-१९ प्रेरित लॉकडाऊनच्या प्रतिकूल परिस्थितीत लवचिकता दाखवली आहे. आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०२०-२१ मध्ये कृषी आणि संबंधित क्रियाकलापांनी स्थिर किंमतीवर ३.४% वाढ नोंदवली. २०२०-२१ या आर्थिक वर्षात पहिल्या तिमाहीत सकारात्मक वाढ नोंदवलेले हे एकमेव क्षेत्र आहे.

तथापि, भारतातील कृषिक्षेत्राला कोविड-१९ दरम्यान उत्पादन, विपणन आणि वापराच्या बाबतीत काही आव्हानांचा सामना करावा लागला. कृषी उद्योगाला मजुरांच्या टंचाईचे आव्हान पेलले नसले, तरी बरेच लोक त्यांच्या मूळ गावी परतले असल्याने, पुरवठा साखळीतील व्यत्यय हे एक मोठे आव्हान होते.


हालचालींवरील निर्बंधांमुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली. कृषी क्रियाकलापांसाठी इनपुट आणि आउटपुटच्या अखंड प्रवाहात अडथळा निर्माण झाला. नाशवंत वस्तूंच्या पुरवठ्यावर अधिक परिणाम झाला, ज्यामुळे समाजातील असुरक्षित घटकांच्या अन्न आणि पोषण सुरक्षेला आव्हान मिळाले.

कोविड-१९ संकटाने भारतातील कृषी आणि अन्न बाजारातील असुरक्षिततादेखील उघड केली आहे. मागणी आणि पुरवठा दोन्ही धक्के शेतकऱ्यांना बाजारपेठांशी जोडण्यासाठी, पुरेसा मजूर पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांना अधिक लवचिक बनवण्यासाठी सुरक्षा

जाळ्या तयार करण्यासाठी सुधारणांच्या गरजेवर भर देतात.

**कोविडचा जागतिक शेतीवर झालेला परिणाम:**

अखिल भारतीय स्तरावर, ५८% नमुना जिल्हे अदानांच्या (Input) उपलब्धतेच्या बाबतीत प्रतिकूलपणे प्रभावित झाले. वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध आणि दुकाने आणि बाजारपेठा बंद करणे, कृषी निर्विष्ठांच्या किमती उदा. बियाणे (८.८%), खते (१०.०%), कीटकनाशके (९.०%), चारा (११.६%), ९ ते १२ टक्क्यांच्या श्रेणीत वाढ झाली.




स्रोत : www.civilsdaily.com

वरील नकाशामध्ये दाखवल्याप्रमाणे जागतिक शेतीवर होणारे परिणाम खाली दिले आहेत:

**१) पीक उत्पादन आणि बियाणांची उपलब्धता यावर:**

- पीक उत्पादनासाठी, बीजन प्रक्रियेचा आवश्यक भाग उपलब्ध झाला नाही.
- बियाण्यांच्या उपलब्धतेवर कोणताही परिणाम होणार नाही.
- समतुल्य परिस्थिती वर्षाअखेरीपर्यंत चालू राहिली, त्यामुळे खरंच बियाण्याची उपलब्धता ही समस्या झाली.

**२) खतांवर:**

- जागतिक व्यापाराच्या गडबडीमुळे, शेतकऱ्यांना खत आणि कीटकनाशकांसारख्या कृषी निविष्ठांच्या कमतरतेचा सामना करावा लागला.
- कमी कालावधीत, अपेक्षा करण्यासारखी थोडी कमतरता आहे.
- दीर्घकाळात, चीनमधील अनेक असेंब्ली प्लांट्स पॅकअप झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून खताची डिलिव्हरी अडथळे ठरू शकते.

**३) अन्न उत्पादन आणि वितरणावर:**

● बहुतेक देशांनी संक्रमणाचा वेग नियंत्रित करण्यासाठी घरात बंदिस्त, प्रवास बंदी आणि व्यवसाय बंद करण्यासारखे उपाय केले आहेत.

● शेती हे सहसा नाशवंत उत्पादन करते, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा न विकलेला माल त्यांच्या दीर्घ कालावधीसाठी घेऊन जाण्याची सक्ती केली जाते.

● यामुळे अन्नाच्या गुणवत्तेत सवलत आणि उत्पादन खर्चात वाढ झाली आहे.

**४) पशुधनावर:**

● पशुधन आणि मत्स्यपालन यांसारख्या विविध कृषिक्षेत्रांना साथीच्या रोगाचा मोठा फटका बसला आहे.

● भारतात, पशुखाद्याचा मर्यादित प्रवेश आणि मजुरांची कमतरता यामुळे पशुधन शेतीवर COVID-19 चा चांगला परिणाम झाला आहे.

● उदाहरणार्थ, प्रवास बंदीमुळे कुक्कुटांच्या प्रजनन स्टॉकच्या वितरणावर खूप परिणाम झाला आहे.

**५) कामगारांच्या उपलब्धतेवर:**

● कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये कृषी कामगारांना योग्य आरोग्य सेवांचा अभाव आहे आणि थोडे बचत किंवा कोणतीही बचत न केल्यामुळे सामाजिक संरक्षण.

● कृषिक्षेत्रातील अनेक अनौपचारिक कामगार कोविड-१९ साथीच्या आजारादरम्यान सेल्फ-आयसोलेशन प्रोटोकॉल असूनही त्यांच्या उदरनिर्वाहाची गणना करण्यास बांधील आहेत.

**६) अन्नाची मागणी आणि अन्नसुरक्षा यावर :**

● उत्पन्न आणि खरेदी क्षमता कमी झाल्यामुळे अन्नाच्या मागणीवर परिणाम झाला आहे.

● घाबरलेले ग्राहक खाद्यपदार्थांचा साठा करत आहेत, ज्यामुळे अन्नाची उपलब्धता आणि किमतीवर परिणाम होत आहे.

● आंतरराष्ट्रीय व्यापारातील घट, अन्न पुरवठा साखळीतील अडथळे आणि अन्न उत्पादन यामुळे अन्न असुरक्षितता निर्माण होऊ शकते.

**कृषिक्षेत्रात रोजगाराची स्थिती :**

आर्थिक वर्ष २०२१ पर्यंत भारतातील कृषी क्षेत्रामध्ये सर्वाधिक कर्मचारी होते ज्यांची रक्कम जवळपास १५२ दशलक्ष इतकी होती. कोरोना व्हायरस साथीच्या रोगाचा देशाच्या GDP वर नकारात्मक प्रभाव असूनही, हे एकमेव क्षेत्र होते ज्याने रोजगाराच्या प्रवृत्तीत वाढ केली. ४.१% वार्षिक विकास दरासह, त्या वर्षात भारतातील जवळपास ४०% रोजगार या क्षेत्राचा होता.

PLFS सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, २०२१-२२ मध्ये बेरोजगारीचा दर ४.१% नोंदवला गेला आहे, जो २०१८-१९ मध्ये ५.८% पेक्षा कमी आहे. तथापि, बिझनेस स्टँडर्डनुसार, एकूणच रोजगारामध्ये शेतीचा वाटा वाढला आहे. २०१८-१९ मध्ये ते ४२.५% होते, जे २०२१-२२.०६-मार्च-२०२३ मध्ये वाढून ४५.५% झाले.

**कृषिक्षेत्रातील एकूण कार्यरत लोकसंख्या :**

अधिकृतपणे मान्यताप्राप्त स्त्रोतांकडून संकलित केलेल्या जागतिक बँकेच्या विकास निर्देशकांच्या संकलनानुसार, २०२१ मध्ये भारतातील कृषिक्षेत्रातील रोजगार (एकूण रोजगाराच्या %) (नमुनाकृत ILO अंदाज) ४३.९६% नोंदवला गेला.

**कृषिक्षेत्रात रोजगाराच्या संधी :**

बहुतेक विकसित आणि कमी विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारताची वेगाने वाढणारी तरुण लोकसंख्या हा देशाचा एक वेगळा फायदा मानला जातो. रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे एक मोठे कार्य आहे, जे ग्राहकांच्या खर्चाला चालना देण्याव्यतिरिक्त आर्थिक वाढ आणि सामाजिक स्थिरता सुनिश्चित करते. भारतातील कर्मचारी वर्ग तीन मोठ्या क्षेत्रांमध्ये विभागलेला आहे : कृषी आणि संलग्न क्षेत्र, उद्योग आणि सेवा क्षेत्र. बहुतांश कर्मचाऱ्यांचा वाटा कृषी क्षेत्राचा आहे; परंतु देशाच्या GDP मध्ये सर्वात कमी योगदान आहे.

भारतातील कृषिक्षेत्र हे प्राथमिक क्षेत्र असल्याने, देशातील सर्वात मोठे रोजगार देणारे क्षेत्र आहे. शेती हे एक विशाल युग आहे आणि ते केवळ शेतीशी संबंधित नाही. हे इतर अनेक विभाग आणि क्षेत्रांशी संबंधित आहे ज्यामुळे ते अधिक मागणी निर्माण करणारे आहे.

इच्छुक व्यक्ती खालीलपैकी कोणत्याही क्षेत्रातून कृषी आणि संबंधित पद्धतींच्या क्षेत्रात करिअरचा पर्याय निवडू शकतात.

१) कृषी-संशोधन २) शेती-व्यवसाय

३) कृषी-उद्योग ४) कृषी-शिक्षण
५) कृषी-पत्रकारिता ६) कृषिक्षेत्रातील सेवा
७) शेती ८) कृषी-अभियांत्रिकी
९) कृषी-व्यवस्थापन

विविध सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील पगाराच्या नोकऱ्या नियमित उत्पन्न देतात, उद्योजकता चांगला नफा कमवू शकते. प्रत्येक शेतकरी हा सूक्ष्म उद्योजक आहे. कारण ते स्वतःच्या पिकाची काळजी घेतात. शेती आणि दुग्धोत्पादनात उद्योजकतेच्या संधी झपाट्याने वाढत आहेत. अनेक सरकारी योजना आहेत ज्या तुम्हाला तुमचा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज देतात. अशा अनेक खाजगी बँका आहेत ज्या कृषी उद्योजकांना आर्थिक साहाय्यदेखील देत आहेत.

कृषिक्षेत्राकडे एक उद्योग किंवा व्यवसाय म्हणून पाहाण्याचा नवा दृष्टिकोन अलीकडच्या काळात निर्माण होताना दिसत आहे. कोणत्याही उद्योग किंवा व्यवसायात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासते. हा नियम कृषिक्षेत्रालाही अपवाद नाही. कृषिक्षेत्रासाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी देशात ५३ कृषी विद्यापीठे, पाच अभिमत विद्यापीठे, एक केंद्रीय कृषी विद्यापीठ आणि चार केंद्रीय विद्यापीठे कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त काही शिक्षण, प्रशिक्षण संस्थाही या क्षेत्रात पुढे आल्याने पारंपारिक शिक्षणाची वाट सोडून अनेकांनी या क्षेत्रात करिअर करण्याकडे अनेकांचा कल वाढत आहे.

तसेच राज्य सरकारच्या कृषी विभागामध्ये विविध पदांवर काम करण्याची संधीही उपलब्ध आहे. याबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यामध्येही विविध पदांवर कृषी अधिकारी, ग्रामसेवक या पदांवर काम करण्याच्या संधी या पदवीधारकांना उपलब्ध आहेत.

शेतीचे महत्त्व पुन्हा वाढले आहे आणि या क्षेत्राची मागणी वाढेल आणि हिरवळ ही भविष्यातील एकमेव आशा आहे. कालांतराने असंख्य संधी उगवल्या आहेत, ज्यामुळे तरुणांना संधी निवडण्यासाठी भरपूर पर्याय मिळत आहेत.

**तंत्रज्ञानाचा शेतीवर होणारा परिणाम**

डिजिटल तंत्रज्ञान सर्वसाधारणपणे कृषिक्षेत्राला आणि विशेषतः शेतकऱ्यांना उत्पादन, देखरेख आणि नियोजनात मदत करत आहे. कृषिक्षेत्रातील तांत्रिक प्रगतीमुळे, शेतकरी त्यांचे उत्पादन सुधारण्यास, संसाधनांचे संरक्षण करण्यास आणि त्यांच्या शेतातील क्षेत्रे ओळखण्यास सक्षम आहेत ज्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

२०२१ मधील पाच विघटनकारी कृषी तंत्रज्ञान ट्रेंड आहेत:

१) IoT
२) भौगोलिक माहिती प्रणाली (GIS)
३) AI/ML आणि कृषी तंत्रज्ञानातील डेटा सायन्स
४) ब्लॉकचेन
५) ऑटोमेशन

AI, मशीन लर्निंग (ML) आणि IoT सेन्सर अल्गोरिदमसाठी रिअल-टाइम डेटा प्रदान करतात जे कृषी कार्यक्षमता वाढवण्यास, पीक उत्पादन सुधारण्यात आणि अन्न उत्पादन खर्च कमी करण्यात मदत करतात. AI आणि ML आधीच २०५० पर्यंत जगभरातील अतिरिक्त २ अब्ज लोकांसाठी अपेक्षित अन्न गरजांमधील अंतर कमी करण्यात मदत करण्याची क्षमता दर्शवत आहेत.

**कृषी तंत्रज्ञानाचे फायदे :**

१) उच्च पीक उत्पादकता
२) पाणी, खते, कीटकनाशकांचा कमी वापर
३) नैसर्गिक संसाधनांवर कमी परिणाम
४) अधिक कार्यक्षमता आणि कमी किमती

**कृषिक्षेत्रातील ई-कॉमर्स :**

कृषी ई-कॉमर्स कृषी मूल्य शृंखला सुव्यवस्थित

करण्याची आणि बाजारपेठेत कृषी उत्पादनांच्या वितरणातील अकार्यक्षमता कमी करण्याची संधी प्रदान करते. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर त्यांचे उत्पादन विकण्यासाठी आणि त्यांचा ग्राहक आधार वाढवण्यासाठी आणि त्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी ई-लिलाव आणि ई-पेमेंट प्लॅटफॉर्मचा वापर करण्यासाठी शेतकरी आणि इतर शेती-आधारित कर्मचारी सक्षम कृषिक्षेत्रात करिअर करण्यासाठी कौशल्य आणि प्रशिक्षण असणे आवश्यक आहे.

कृषी उद्योगात अनेक घटक आहेत. या क्षेत्रातील करिअर तंत्रज्ञान-आधारित ते व्यवस्थापन आणि मॅन्युअल मजुरीच्या विविध प्रकारांमध्ये विभागले जाऊ शकते. कृषी उद्योगाच्या प्रत्येक विभागामध्ये पुढे जाण्यासाठी आवश्यक असलेली प्रमुख कौशल्ये निश्चित केलेली असली, तरी कृषी उद्योगात तुम्ही निवडलेल्या नोकरीच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करून तुमच्याकडे काही कौशल्ये असणे आवश्यक आहे.

कृषी उद्योगात करिअर सुरू करण्यासाठी येथे काही कौशल्ये असणे आवश्यक आहे-

| | |
|---|---|
| १) अनुकूलता | २) वेळेचे व्यवस्थापन |
| ३) डिजिटल साक्षरता | ४) समस्या सोडवणे |
| ५) गंभीर विचार | ६) सर्जनशीलता |
| ७) भावनिक बुद्धिमत्ता | |

भारतात कृषी आणि त्याच्या उप-क्षेत्रांसाठी अनेक पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम तुम्हाला कृषिक्षेत्रात करिअर सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली योग्य कौशल्ये तयार करण्यात मदत करतील.

कुशल मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे, अलीकडच्या वर्षांत कर्मचाऱ्यांची भरती आणि टिकवून ठेवणे हे कृषिक्षेत्रासमोरील एक मोठे आव्हान आहे. त्यामुळे मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत कमी करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांना सतत कौशल्य प्रदान करण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत आणि विविध उपक्रम सुरू केले आहेत. कृषिकौशल्य परिषद (ASCI) हा सरकारचा असाच एक उपक्रम आहे.

**कृषिकौशल्य परिषद (ASCI) :**

विशेषतः अशा वेळी जेव्हा देशाच्या कृषिक्षेत्राची वाढ खुंटत आहे, दर्जेदार मनुष्यबळ इतर क्षेत्रांकडे स्थलांतरित होत आहे, उत्पादनाच्या मापदंडांमध्ये वाढीव परिवर्तनशीलतेसह बदलणारे हवामान आणि आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठेतील परिवर्तने, जे विशेषतः खूप जास्त आहेत अशा वेळी ते कृषिक्षेत्रातील कौशल्य विकासाद्वारे राष्ट्रउभारणीत योगदान देत आहे.

जर तुम्हाला कृषी उद्योगात करिअर घडवायचे असेल, तर तुम्ही उद्योजकता किंवा उपलब्ध नोकरीची भूमिका निवडू शकता. तथापि, असे करण्यासाठी, आपण प्रथम उद्योगात येण्यासाठी आवश्यक कौशल्य संच तयार करणे आवश्यक आहे.

**समारोप :**

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येते की, भारतातील लोकांचा उपजीविकेचा सर्वात मोठा स्त्रोत हा शेती आहे. जिथे ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यामध्ये लहान आणि सीमांत शेतकऱ्यांचे मोठे प्रमाण आढळून येते. एवढे व्यापक क्षेत्र असूनही कृषिक्षेत्रातील नोकऱ्या आणि करिअरच्या संधी असंघटित व अनौपचारिक असल्याचे दिसून येते. वास्तविक पाहाता, भारतासारख्या अल्प विकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास हा कृषिक्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे. भारतात नैसर्गिक संसाधने प्रचंड प्रमाणात उपलब्ध असली, तरी भांडवलाच्या कमतरतेमुळे अधिकरणाचा वेग अल्प आहे. परिणामी, वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम कृषिक्षेत्राने केले आहे. देशातील श्रमिकांना कृषी व कृषी आधारित उद्योगात रोजगाराची उपलब्धता होत असते. देशातील बेकारीचे प्रमाण कमी करण्यात कृषिक्षेत्राचा महत्त्वाचा

वाटा राहिला आहे. भारतामध्ये भांडवलाची कमतरता मोठ्या प्रमाणात आहे. भांडवलाच्या कमतरतेवर कृषिक्षेत्राच्या माध्यमातून मात करता येते. कारण कृषिक्षेत्रात भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी असते. त्यामुळे कमी भांडवल गुंतवून मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळवता येते.

कोविड महामारीच्या काळामध्ये रोजगारांमध्ये काही प्रमाणात घट झाली होती; परंतु सद्यस्थितीमध्ये भारतीय शेतीक्षेत्रात २०२१-२२ च्या तुलनेत मार्च २०२३ मध्ये रोजगाराची पातळी वाढल्याचे दिसून येते. असे असले तरी भारतीय कृषिक्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. एकूणच भारताचा सर्वांगीण विकास घडवून आणावयाचा असेल, तर शेतीवरील लोकांचे अवलंबित्व लक्षात घेता कृषी हे व्यापक क्षेत्र असल्याचे दिसते. म्हणून कृषीचा व कृषी आधारित उद्योगाचा विकास घडवून आणावा लागेल, त्याचबरोबरीने रोजगार निर्माण करणारी धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करावी लागेल. उदा. धरणे, कालवे इत्यादी सिंचनाच्या विविध साधनांच्या निर्मितीमुळे कृषिक्षेत्रात रोजगार निर्माण होतो. वाहतूक आणि इतर सेवा, रस्ते आणि रेल्वेच्या बांधकामामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतात. यासारखे उपक्रम राबवून व कृषी आधारित उद्योगाला प्रोत्साहन देवून त्यामध्ये वाढ करावी लागेल. अशा प्रकारचे उपक्रम राबवले, तर निश्चितच कृषिक्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल. परिणामी, उद्योग आणि रोजगारामध्ये वाढ होऊन एकूणच देशाचा विकास होईल, असे आम्हाला वाटते.

**संदर्भः**


1) Jain, K. R., Dhyani, Anuja (2020). Covid-19 Impact on the Indian Economy: A Review of Uttarakhand's Travel, Tourism and Hospitality Sector, International Journal of Trade & Commerce-IIARTC, 9 (1): 97-101
2) Ministry of agricultural official website MoA.gov.ac.in
3) Nte, Ngboawaji Daniel, Lucas, Oluka Nduka, Uzorka, Michael C., Abdulaziz, Baba Ahmadu (2020). Mainstreaming Human Rights in Emergency Management: Views from the COVID-19 Pandemic Management in Nigeria, International Journal of Trade & Commerce-IIARTC, 9 (1): 01-12
4) Rizwan, Mohd., Saqib, Mohammad (2020). Impact of COVID-19 on Defence Industry with Special Reference to India, International Journal of Trade & Commerce-IIARTC, 9 (1): 35-42
5) https://agricoop.nic.in/Documents/annual-report-2020-21.pdf
6) https://www.consultanc.asia/news/3364/covid-19s-impact-on-indias-agricultural-sector#:
7) https://www.icrisat.org/containing-covid19-impacts-on-indian-agriculture/
8) https://www.ifpri.org/blog/addressing-covid-19-impacts-agriculture-food-security-and-livelihoods-india
9) https://www.researchgate.net/publication/294086381 Popul Ation Trend And Agricultural Employment Growthin India
10) https://www-statista-com/statistics/1284035/india-em{loyment-in-agriculture-sector/
11) www.civilsdaily.com


◆

सर्व पैसे विश्वास आहेत.

**- ॲडम स्मिथ**

# २००० रुपयाच्या नोटवापसीमुळे होणारे अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**मृणालिनी तापस** †

**प्रस्तावना :**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा कायदा १९३४ च्या कलम २४ (१) अंतर्गत नोव्हेंबर २०१६ मध्ये २००० रुपये मूल्याची नोट प्रामुख्याने सर्व ५०० आणि १००० रुपयाच्या नोटेची कायदेशीर वैधता काढून घेतल्यावर अर्थव्यवस्थेच्या चलनाची गरज जलदगतीने पूर्ण करण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आली होती. विमुद्रीकरणाची पूर्तता झाल्यावर इतर मूल्यांमध्ये पुरेशा प्रमाणात बँक नोटांची उपलब्धता झाल्यावर २०१८-१९ मध्ये २००० रुपयांच्या नोटांची छपाई थांबविण्यात आली. बहुसंख्य २००० रुपयांच्या मूल्याच्या नोटा मार्च २०१७ पर्यंत जारी केल्या गेल्या होत्या. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्वच्छ नोट धोरणाच्या अनुषंगाने २००० मूल्याच्या नोटा चलनातून काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**नोटबंदी व नोटवापसी यातील फरक :**

केंद्र सरकारने २०१६ मध्ये केलेली नोटबंदी आणि २०२३ मध्ये केलेली २००० रुपयांची नोटवापसी या दोन्ही बाबींमध्ये मोठे अंतर आहे. २०१६ मध्ये ५०० व १००० रुपयाच्या नोटा रद्द केल्या तशा २००० ची नोट रद्द केली नाही. २०१६ च्या नोटबंदीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर ५०० व १००० रुपयाच्या नोटा ताबडतोब चलनातून काढून घेतल्या होत्या. २००० रुपयाची नोट अजूनही चलनात चालू आहे. ५०० व १००० रुपयाच्या नोटा रद्द झाल्या, तेव्हा २००० रुपयाच्या नोट काढणे अतार्किक निर्णय होता. रिझर्व्ह बँकेने सांगितले की, दोन्ही नोटा काढून घेतल्यामुळे समस्या उत्पन्न होतील. सबब चलनामध्ये काही ना काही नोटा ठेवाव्या लागतील. म्हणून २००० रुपयाची नोट अस्तित्वात आणली होती. त्यावेळी या नोटांचा अस्तित्वकाळ पाच वर्षांचा राहील, असे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने स्पष्ट केले होते. त्यामुळे या नोटा जास्त काळ चालणार नाहीत, हे सर्वश्रुत होते. २००० रुपयाची नोट खूप जास्त व्यवहारात नव्हती. बँकेत गेल्यानंतर आपल्याला २००० रुपयाची नोट मिळत नसे. पूर्वी एटीएममधून १०,००० रुपये काढल्यानंतर २००० रुपयाची १ नोट मिळत असे. दीड वर्षांपासून ही नोट देणे बंद केले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा शुक्रवारी दिनांक १९ मे, २०२३ ला २००० रुपयाचे चलन बाजारातून परत घेण्याची घोषणा केली. पुढील दिवसात

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज, नागपूर
आजीव सभासद क्र. १०२८, भ्रमणध्वनी : ९९२१०२११८०, ई-मेल : mrunalinitapas@gmail.com

या नोटाची छपाई होणार नसून, देशभरातील कोणतीही बँक आपल्या ग्राहकांना ही नोट वितरीत करणार नाही. या घोषणेचा संबंध २०१६ मधील नोटबंदीसोबत जोडण्यात येत आहे. परंतु हे चुकीचे आहे. नोटवापसीचे साध्य व २०१६ च्या नोटबंदीचे साध्य याबाबत राजकीय सामाजिक व आार्थिक बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

**राजकीय बाब :**

नोटवापसीचे कारण देताना दहशतवादाला आळा घालणे, भ्रष्टाचार कमी करणे, हे मुद्दे सांगितले गेले. नोटबदलीमागे क्लीन नोट पॉलिसी म्हटले आहे. होलोग्रामला अडचण येऊ नये यासाठी घेतलेला निर्णय असा होऊ शकतो. राजकीय विचार करायचा झाला तर अलीकडे लागलेले निवडणूक निकाल केंद्रात सत्तारूढ सरकारसाठी वा आपल्या राज्यातील सत्तारूढ सरकारसाठी फारसे अनुकूल नाहीत. महाराष्ट्रात येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा अशा निवडणुका येऊ घातल्या आहेत. असे असताना नोटवापसीचा निर्णय रिझर्व्ह बँकेने घेतला असून, ती संपूर्ण देशभरासाठी काम करत असली तरी अत्यंत महत्त्वाच्या पृष्ठभूमीवर हा निर्णय जाहीर केला आहे.

**आर्थिक बाब :**

२०१६च्या तुलनेत नाकारता न येणारा एक महत्त्वाचा फरक म्हणजे एखादी नोट अस्तित्वात आणणे आणि काही काळानंतर ती बाहेर काढणे असे प्रकार भारताच्या इतिहासात फारसे झालेले नाहीत. असा निर्णय मोरारजी देसाईंच्या सरकारनेही घेतला होता. १९७७-७८ मध्ये एच. एम. पटेल अर्थमंत्री असताना १०,००० रुपयाच्या नोटा रद्द झाल्या होत्या. त्यावेळी काही पर्याय दिला गेला नव्हता. परंतु २०१६ मध्ये २००० नोट अस्तित्वात येणे व नंतर बंद होणे ही अभूतपूर्व आर्थिक बाब आहे. नोटबदलीचा परिणाम रोखीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर कमी झालेले आहेत. आता नागरिक सरसकट १० रुपयापासून ९९,९९९ रुपयापर्यंतची रक्कम गुगल-पे, फोन-पे इत्यादी ने देत आहेत. ती व्यवस्थेची मर्यादा नाही. हे देखील समजून घ्यावे लागेल. त्यातही २०१६ च्या नोटबंदीने जे साधले नाही ते अडीच वर्षाच्या कोरोना काळाने करून दाखवले आहे. या काळात आपण वयनिरपेक्ष, लिंगनिरपेक्ष, उत्पन्ननिरपेक्ष स्थल-काल निरपेक्ष व्यवस्था इलेक्ट्रॉनिक पेमेंटद्वारे सक्षम केल्या. त्यामुळे कागदी चलनाची संख्या वा त्यावरील अवलंबित्व कमी होणे, हे एका आर्थिक प्रगल्भतेचे लक्षण आहे, असेही म्हणता येईल. याची दुसरी सांगड अशी की, लवकरच आपण डिजिटल रुपया अस्तित्वात आणत आहोत. साहाजिकच कालौघात त्याची व्याप्ती वाढेल. भारत हा जगातील पहिला आणि एकमेव असा देश आहे, ज्याचे अधिकृत चलन डिजीटल तसेच पेपरमध्ये आहे. आपल्याकडे इलेक्ट्रॉनिक पेमेंट वाढत आहे. अधिकृत चलन डिजीटल रुपयामध्ये आणले जात आहे. जगातील १९ देश आपला डिजिटल रुपया मान्य करण्यास तयार आहे. अशावेळी पेपरनोट चलनातून जाणे खऱ्या अर्थाने आपण आर्थिक पारदर्शकतेकडे जात असल्याचे लक्षण म्हणावे लागेल. मुख्य म्हणजे नोटवापसीचा हा निर्णय आपण कोणत्याही वा कोणाच्याही दबावाखाली घेतलेला नाही.

२००० रुपयाची नोट मागे घेणे म्हणजे नोटबंदी नव्हे. हे एक वैधानिक पाऊल आहे, असा युक्तिवाद भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिल्ली उच्च न्यायालयात केला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा १९ मे रोजीची अधिसूचना रद्द करण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेत नोटा बदलून घेण्यासाठी येणाऱ्या लोकांना नुकसानभरपाई म्हणून ५०० रुपये अधिक देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ अंतर्गत कोणत्याही मूल्याच्या बँक नोटांचे विमुद्रीकरण करण्याचा कोणताही स्वतंत्र अधिकार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला नाही. हा अधिकार फक्त या

कायद्याच्या २४ (२) अंतर्गत केंद्र सरकारला आहे.

**२०१६ च्या नोटबंदीची पार्श्वभूमी :**

दिल्लीतील नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड पॉलिसी नॅशनल कौन्सिल ऑफ एप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च आणि फरिदाबादमधील नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ फायनान्शिअल मॅनेजमेंट या तीन वित्तीय संस्थांनी संशोधन केले आणि त्यांनी असे नमूद केले की, देशाबाहेर पडून असलेल्या काळ्या पैशापेक्षा भारतातला काळा पैसा खूपच जास्त आहे. एकूण काळ्या पैशाच्या ९७ टक्क्यापर्यंत काळा पैसा भारतात आहे. आणि त्यामुळे नोटबंदीसारखे निर्णय घ्यायला हवे. काळा पैशाचा सामना करण्यासाठी नोटबंदी हे पाऊल उचलणे अनिवार्य आहे.

८ नोव्हेंबर, २०१६ ला नोटबंदी झाली. त्यात ५०० व १००० रुपयांच्या नोटांवर बंदी घालण्यात आली. हा निर्णय घेताना बरीच गुप्तता पाळली होती. देशात बरेच वादळ निर्माण झाले होते. तो निर्णय देशात बोकाळलेल्या काळ्या पैसारूपी राक्षसावर व त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या धोक्यांवर एकप्रकारे सर्जिकल स्ट्राईक होता. त्या निर्णयाच्या अनुषंगाने सामान्य जनतेला होणारा त्रास कमी करण्यावर मर्यादा आल्या होत्या. जनतेने हा निर्णय व त्यासाठी भोगावा लागणारा त्रास सहर्ष स्वीकारला. नोटबंदीची झळ सामान्य जनतेला कमीत कमी भोगावी लागावी म्हणून भारतीय बँकातील कर्मचाऱ्यांनी जिवाचे रान केले. विरोधी पक्षांनी केलेला विरोध मोडीत काढून जनतेने राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन या निर्णयाचे समर्थन केले. त्याचवेळी नोटा चलनात आल्यानंतर २००० रुपयाची नोट परत घेण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले होते.

२०१६ च्या नोटबंदीच्यावेळी भ्रष्टाचाऱ्यांच्या घरातील गाद्या व उशांमध्ये दडवलेला किमान ३-४ लाख कोटी रुपयांचा काळा पैसा बाहेर येईल, अशी केंद्र सरकारची अपेक्षा होती. या संपूर्ण प्रक्रियेत केवळ १.३ लाख कोटी रुपयांचा काळा पैसा बाहेर आला. पण आज नोटबंदीच्यावेळी जारी करण्यात आलेल्या २००० च्या नव्या नोटांमधून ९.२१ लाख कोटी रुपये गायब झाले आहेत.

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे स्वच्छ नोट धोरण :**

जनतेला चांगल्या नोटाच्या दर्जाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अवलंबिलेले हे धोरण आहे. या धोरणात फक्त खराब झालेल्या खोट्या किंवा दुषित नोटा परत घेतल्या जातात, चांगल्या नोटा परत घेतल्या जात नाहीत, असे सांगितले जाते. या धोरणांतर्गत प्रत्येक नोटेची कायदेशीर वैधता कायम राहील. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत लोकांना व्यवहारासाठी २००० रुपयाची नोट बँकेत जमा करण्यासाठी आणि बदलण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. ही नोट कोणत्याही बँकेत बदलता येईल. सर्वसामान्य जनता एकाचवेळी २०,००० रुपये मर्यादेपर्यंत २००० रुपयांच्या नोटा बदलू शकतात. ३१ मार्च, २०१८ रोजी २००० रुपयाच्या नोटेचे प्रमाण ६.७३ लाख कोटीच्या शिखरावरून ३१ मार्च, २०२३ रोजी प्रचलित नोटांच्या १०.८ टक्के म्हणजे ३.६२ लाख कोटीवर घसरले आहे. २०१९ पासून २००० च्या नोटांची छपाई बंद केली. याचा अर्थ असा की, इतर मूल्याच्या नोटांचा साठा जनतेच्या चलनाची गरज पूर्ण करण्यासाठी पुरेसा असल्यामुळे सध्या ह्या २००० रुपयाच्या नोटा वापरल्या जात नाहीत. सर्व सामान्य जनतेला काहीही त्रास होणार नाही. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्णयानंतर बाजारातील प्रत्येकाने एकमेकांकडून २००० रुपयाच्या नोटा स्वीकारणे बंद केले आहे. यामुळे देशातील नागरिकांना विशेषत: बँकेपासून दूर असलेल्या ग्रामीण भागात राहणाऱ्या महिला/पुरुषांसाठी थोडे कठीण जात आहे. ज्यांनी बेहिशोबी मालमत्तेच्या रूपात साठवून ठेवल्या असतील त्यांना संबंधित अधिकाऱ्यांना समर्पक उत्तरे द्यावी लागतील.

**तक्ता क्रमांक १**

| नोट छपाई | | | नोट नष्ट | | |
|---|---|---|---|---|---|
| **वर्ष** | **२०००** | **५००** | **वर्ष** | **२०००** | **५००** |
| २०१६-१७ | ३५० कोटी | ७२६ कोटी | २०१६-१७ | ०० | ०० |
| २०१७-१८ | १५.१० कोटी | ९६९कोटी | २०१७-१८ | ०० | ०० |
| २०१८-१९ | ४.७० कोटी | ११४७ कोटी | २०१८-१९ | १० लाख | १.५० कोटी |
| २०१९-२० | ०० | १२०० कोटी | २०१९-२० | १७.६८ लाख | १६.४५ कोटी |
| २०२०-२१ | ०० | ११५७ कोटी | २०२०-२१ | ४५.४८ कोटी | ५९.०९ कोटी |
| २०२१-२२ | ०० | १२८० कोटी | २०२१-२२ | ३८.४७ कोटी | २२१ कोटी |
| **एकूण** | **३७० कोटी** | **६४७९ कोटी** | **एकूण** | **१०२ कोटी** | **२९८ कोटी** |

**स्त्रोत :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे वार्षिक अहवाल

**स्पष्टीकरण :**

तक्ता क्र. १ वरून असे दिसते की, २०१६ ते २०२१-२२ पर्यंत ५०० व २००० च्या ६८४९ कोटी नोटा छापण्यात आल्या व ४०० कोटी नोटा नष्ट करण्यात आल्या. भारतीय रिझर्व्ह बँकेचे २०१६-१७ ते २०२१-२२ पर्यंतच्या वार्षिक अहवालात दर्शविले आहे की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २०१६ पासून ५०० आणि २०००च्या एकूण ६८४९ कोटी चलनी नोटा छापल्या. त्यापैकी १६८० कोटीहून अधिक चलनी नोटा गायब आहेत. ह्या गहाळ नोटांची किंमत ९.२१ लाख कोटी रुपये आहे. या हरविलेल्या नोटांमध्ये त्या नोटांचा समावेश नाही. ज्या खराब झाल्यानंतर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नष्ट केल्या होत्या.

**नोट वापसीची कारणे :**

**१. २००० च्या नोटेचे वितरण बंद :**

केंद्र सरकारने २०१६ मध्ये केलेली ५०० व १००० रुपयाच्या जुन्या नोटा अवैध म्हणून जाहीर केल्या होत्या. ही एक नोटबंदीची प्रक्रिया होती. परंतु रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा निर्णय २००० ची नोटवापसी घेऊन वितरण बंद करण्याचा विचार केला आहे.

**२. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा निर्णय :**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी अशी प्रतिक्रिया दिली आहे की, दोन हजारांच्या नोटा चलनात आणण्याचे उद्दिष्ट आता पूर्ण झाले आहे. या नोटा चलनात आणणे हा चलनव्यवस्थेचा एक भाग होता. या निर्णयामुळे देशातील कोणताही सामान्य नागरिक अडचणीत आला नसून, भीती वा घाबरण्याचे कारण नाही. विविध बँकांच्या शाखांमध्ये प्रत्येक ग्राहकाला २००० च्या नोटा आपल्या खात्यात जमा करता येणार आहे.

**३. छपाई बंद :**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २०१८-१९ पासून २००० च्या नोटांची छपाई बंद केलेली आहे. त्यामुळे लोकांजवळ २००० च्या नोटा अतिशय अल्प प्रमाणात आहेत. विशेष म्हणजे २०००ची नोट परत मागण्याचा निर्णय घेण्यात येईल, अशी अपेक्षा देशात कुणालाही नव्हती. लोकांच्या मनात भीतीचे कारण म्हणजे २०१६ मधील नोटबंदीमुळे लागलेल्या लांब लांब रांगा अद्यापही आठवणीत आहेत. कारण २०२३ पर्यंतच्या व्यवहारात २०००च्या नोटा कमी प्रमाणात म्हणजे १०.८ टक्के आहेत. या निर्णयाचा परिणाम सामान्यांना बसला नाही.

**४. उपभोग प्रवृत्तीत वाढ :**

२००० रुपयाच्या नोटवापसीच्या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात उपभोग वाढला. बाजारातील खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढले. लोकांना आपल्या जवळच्या सर्व २००० रुपयांच्या नोटा संपविणे हे महत्त्वाचे वाटू लागले. त्यासाठी लोक बँकांमध्ये जाऊन नोटा बदलण्यापेक्षा सराफा प्रतिष्ठानाकडे जाऊन या स्थितीचा गैरफायदा घेत वाढीव दराने नोटा बदलून सोन्याचे बिस्कीट, लगडी, कॅडबरी स्वरूपातील सोन्याची खरेदी करीत असल्याचे दिसून येत आहे. सराफ व्यावसायिकांनादेखील यात जोखीम असल्यामुळे त्यांनी सोन्याचे दर वाढविले आहे. भारतात सोने दर १० जून, २०२३ अखेर ५९,६२५ रुपयापर्यंत वाढला आहे. तसेच मोठ्या प्रमाणात जमिनीचे व सदनिका खरेदीचे व्यवहार होत असल्याचे दिसून येत आहे. किरकोळ पेट्रोल भरण्यासाठी २००० च्या नोटेचा वापर केला जात आहे.

**५. विनिमय दर स्थिर :**

युक्रेन व रशिया यांच्यातील युद्ध तसेच पाश्चिमात्त्य देशातील अनेक बँका बंद पडूनही आपला विनिमय दर स्थिर राहिला आहे. त्यामुळे २००० रुपयाच्या नोटा चलनातून बाद करण्याच्या निर्णयाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर विशेष परिणाम होणार नाही. या नोटा सर्वसामान्य लोकांकडे दिसून येत नाहीत. या नोटा व्यापारी, उद्योजक, मोठ्या व्यावसायिकांकडेच आहेत.

**६. भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम :**

भारतीय आर्थिक सर्वेक्षणानुसार, या नोटवापसीचा परिणाम सकारात्मकतेने दिसून येईल. जीडीपीचे प्रमाण स्थिर असल्याचे आढळून येईल. हे समतोल स्थितीत परत येण्याची सूचना आहे. नोटवापसीचा परिणाम आयात-निर्यातीवर झालेला नसून, निर्यात वाढेल व आयातीत घट होईल, असा अंदाज वर्तविला जात आहे. नोटवापसी आणि जीएसटीचा परिणाम कमी होईल. आर्थिक करसंकलन मोठ्या प्रमाणात होईल.

**७. काळ्या पैशात २००० च्या नोटा सर्वाधिक :**

काळा पैसा म्हणजे कायद्यानुसार ज्या रकमेवर कर भरला नाही त्याला काळा पैसा समजला जातो. या ९.२१ लाख कोटी रुपयांमध्ये लोकांच्या घरात जमा झालेल्या बचतीचाही समावेश आहे. उत्तरप्रदेश निवडणुकी दरम्यान परफ्यूम व्यापारावर टाकलेल्या छाप्यापासून ते पश्चिम बंगालचे मंत्री पार्थ चॅटर्जी यांच्या निकटवर्तीयांवर नुकत्याच झालेल्या छाप्यापर्यंत जप्त करण्यात आलेला ९५ टक्क्यांपेक्षा जास्त, काळ्या पैशात २००० रुपयाच्या नोटांचा सर्वाधिक समावेश होता. काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी आणि एकाच ठिकाणी पैसे जमा होऊ नयेत यासाठी सरकारने यात एक चिपही बसवली आहे, असे अनेक दावे या नोटेबाबत त्यावेळी केले जात होते. पण कालांतराने त्यात चिपही नाही. ती बँकेच्या सामान्य नोटेसारखी नोट आहे, हे स्पष्ट झाले.

**८. नक्षलांना अटक :**

२००० रुपयाच्या नोटा जमा करण्यासाठी आलेल्या दोन नक्षलांना पोलिसांनी अटक केली. रिझर्व्ह बँकेने दोन हजार रुपयाच्या नोटा चलनातून मागे घेतल्याने माओवाद्यांची पंचाईत झाली आहे. छत्तीसगडच्या बिजापूर पोलीस आणि जिल्हा राखीव रक्षक पथकाच्या नाकाबंदी दरम्यान काही कारवाई करण्यात आली. अटकेतील नक्षल्यात मूलवासी बचाव नेत्यांचा समावेश होता. पोलिसांनी दोघांनाही अटक करून २००० च्या नोटा असलेले ६ लाखांचे चलन जप्त केले आहे. ११ बँक पासबुक सरकारविरोधी नक्षल पत्रकासह एक दुचाकी जप्त करण्यात आली. नक्षलांच्या कमांडरने २००० रुपयांच्या नोटा घेऊन बँकेत ८ लाख रुपये जमा करण्यासाठी दोन नक्षलवादी आले होते. पोलिसांनी केलेल्या चौकशीत गजेन्द्र मडावीने सारे काही कबूल केले. २००० च्या नोटवापसीमुळे नक्षलवादी सरकारच्या हाती लागले. अशाप्रकारे भारतात वेगवेगळे फायदे झाले.

**२००० रुपयाच्या नोटवापसीचे फायदे :**

१) २००० च्या नोटवापसीमुळे देशातील आतंकवादी नक्षलवादी सरकारच्या हातात सापडले.

२) काळा पैसा साठविताना २००० च्या रुपयांचा जास्ती प्रमाणात उपयोग केला गेला. तो सर्व बाहेर काढता येईल.

३) नोटवापसीमुळे अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम झाला नाही. अर्थव्यवस्था स्थिर आहे.

४) या निर्णयामुळे करसंकलनाला मदत होईल. आयकर भरण्याच्या प्रमाणात वाढ होईल.

५) सीमेपलीकडून आणल्या जाणाऱ्या नोटांची समस्या नष्ट होईल.

६) दहशतवादी कारवायांवर नियंत्रण येईल.

७) रिअल इस्टेट बांधकाम क्षेत्रात अधिक पारदर्शकता येईल.

**२००० रुपयाच्या नोटवापसीचे तोटे :**

१) चलनात तात्पुरती घट होईल.

२) २००० रुपयाच्या नोटवापसीमुळे चलनात असलेल्या अन्य नोटांची मागणी वाढेल.

३) सोन्याच्या किंमतीत वाढ झाली तशीच महागाई वाढण्याची शक्यता आहे.

४) नोटवापसीमुळे प्रत्येकाला बँकेतील खात्यात २०,००० रुपयेच टाकता येतील.

**निष्कर्ष :**

मुख्य म्हणजे नोटवापसीचा हा निर्णय शासनाने कोणत्याही वा कोणाच्याही दबावाखाली घेतलेला नाही. कोणत्याही परकीय संस्था वा राष्ट्रांनी सांगितल्यामुळे हे केलेले नाही. १९९१ च्या आर्थिक सुधारणा हा जागतिक दबावाच्या अपरिहार्य स्थितीचा परिणाम होता. तशी ही नोटवापसी आर्थिक अपरिहार्यतेतून झालेली नाही. त्यामुळेच ही सकारात्मक बाजू लक्षात घ्यावी लागेल. या निर्णयामुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर, क्रयशक्तीवरही बरा-वाईट असा कोणताही परिणाम होणार नाही. नोटवापसीमुळे भारताच्या आर्थिक विकासाला अनुकूलता दर्शविली आहे. भारताला भ्रष्टाचारमुक्त होण्यासाठी असे निर्णय घेणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची :**


१) तरुण भारत, २० मे, २०२३, दोन हजारांची नोट बंद होणार.

२) तरुण भारत, २१ मे, २०२३, नोटबंदी आणि नोटा मागे घेण्यात मोठे अंतर.

३) तरुण भारत, २२ मे, २०२३, काळ्या पैशाचा सर्वात मोठा दलाल कलानगरमध्ये.

४) तरुण भारत, २३ मे, २०२३, दोन हजारांच्या नोटांचे उद्दिष्ट पूर्ण झाले.

५) तरुण भारत, २३ मे, २०२३, आजपासून बँकेत नोटा बदलविण्यास सुरुवात.

६) तरुण भारत, २४ मे, २०२३, मोदी सरकारचा उत्तम निर्णय, दोन हजाराला पोस्टाचा नकार बँकांमध्ये गर्दी वाढणार.

७) तरुण भारत, आपलं नागपूर, २४ मे, २०२३, नोटांच्या बदली सोने ७४ हजारांवर बँकाऐवजी सराफाकडे कल.

८) तरुण भारत, संपादकीय लेख, २४ मे, २०२३, दोन हजारांची नोट मागे घेणे म्हणजे नोटबंदी नाही.

९) तरुण भारत, मागोवा, २५ मे, २०२३, २००० च्या नोटा माघारी घेण्याच्या निर्णयाची आव्हाने.

१०) तरुण भारत, आपलं नागपूर, २६ मे, २०२३, नोटा बदलण्यासाठी रांगा नाहीत.

११) तरुण भारत, २८ मे, २०२३, नोटबंदी नव्हे नोटबदली.

१२) तरुण भारत, २८ मे, २०२३, नोटा बदलण्यासाठी आलेल्या दोन नक्षल्यांना अटक.

13) Maharashtratimes.com

14) https://www.zeebiz.com

15) https://m.economictimes.com>policy

16) timesofindia.indiatimes.com
17) https://news.abplive.com>business
18) https://zeenews.india.com>economy
19) https://currentaffairs.adda247.com
20) https://www.rbiorg.in>Scripts>B
21) https://www.dnaindia.com>explainer
22) https://en.m.wikipedia.org>wiki
23) https://www.lokmattimes.com>wha
24) https://licindia.in>history
25) https://www.sarkarnama.in>what-e
26) https://mr.quora.com>uksVcanh
27) https://m.youtube.com>watch
28) www.bbc.com
29) https://divyamarathi.bhaskar.com>..
30) https://www.uttar.co>question


◆


## ‘अर्थसंवाद’ या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/‘संगाई’, घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | मारोती वि. तेगमपुरे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ‘संगाई’, घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ‘सर’ निवास, री. स. नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी मारोती वि. तेगमपुरे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**मारोती वि. तेगमपुरे**
मुद्रक व प्रकाशक

# श्री वारणा सहकारी बँक मर्यादित, वारणानगर : एक व्यष्टी अध्ययन

**चंद्रकांत रा. जाधव** †

**प्रस्तावना :**

सर्वसामान्य लोकांना आपलीशी व जवळची वाटणारी बँक म्हणजे सहकारी बँक होय. महाराष्ट्राने सहकार क्षेत्रात केलेली प्रगती भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आणि महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रात सहकार रुजविण्यासाठी व वाढविण्यासाठी ज्या महान अशा सहकार महर्षींनी आपले आयुष्य वेचले त्यामध्ये स्वर्गीय सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे यांचे नाव आदराने घेतले जाते. वारणा काठच्या शेतकऱ्यांमध्ये कृषी उद्योजकतेचा विश्वास निर्माण करत स्वर्गीय तात्यासाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वारणा परिसरातील शेतकऱ्याला त्याच्या घामाच्या, कष्टाच्या पैशाचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करता यावे यासाठी श्री वारणा सहकारी बँक मर्यादित, वारणानगर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर या बँकेची स्थापना दि.२८/०२/१९६६ रोजी केली. रुपये १,२८,८००/- इतके भांडवल उभारून सहकारा अंतर्गत सहकाऱ्यासाठी आणि वारणा खोऱ्याच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू केलेली श्री वारणा सहकारी बँक सध्या हिरक महोत्सवाकडे वाटचाल करीत आहे. आदरणीय स्वर्गीय तात्यासाहेब कोरे यांच्या दूरदृष्टीतून आणि त्यांच्या सहकाराच्या विचाराने भारावलेल्या तत्कालीन प्रामाणिक निष्ठावान सहकाऱ्यांच्या साथीने रोवलेल्या या रोपाचा आज वटवृक्ष झाला आहे. वारणा बँक आज कित्येकाच्या जीवनाचा आधार झाली आहे. शेतकऱ्यापासून नोकरदारांपर्यंत आणि व्यावसायिकांपासून उद्योजकांपर्यंत तसेच समाजातील सर्वच घटकांना बँकिंग सुविधा देण्यात वारणा बँकेची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण ठरली आहे. वारणा परिसराबरोबरच राज्याच्या ग्रामीण आणि शहरी भागात बँकिंग व्यवसाय विस्तारला आहे. नव्या बदलांचा स्वीकार करत सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक या सर्वांना आपुलकीने सेवा देण्याची परंपरा बँकेने कायम ठेवली आहे. बँकिंग क्षेत्रातील नवे बदल स्वीकारून त्याची प्रभावी अंमलबजावणी करतानाच एका वित्तीय संस्थेला गरजेच्या असलेल्या विश्वासार्हता जपत बँक वाटचाल करीत आहे. सदरच्या शोधनिबंधात आपण वारणा बँकेच्या प्रगतीचा आढावा घेणार आहोत.

**शोधनिबंधाचा उद्देश :**

सदरच्या शोधनिबंधाचा अभ्यास करताना मागील ५५ वर्षांच्या आकडेवारीचा विचार करण्यात आला आहे.

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.
आजीव सभासद क्र.१७०९, भ्रमणध्वनी : ९५४५८८८५२०, ई-मेल : jadhavcryc@gmail.com

सदर शोधनिबंधाचे प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. बँकेच्या सभासदांची संख्यात्मक प्रगती अभ्यासणे.
२. भाग भांडवल, गंगाजळी आणि इतर निधींची स्थिती अभ्यासणे.
३. ठेवी, कर्जे व गुंतवणूक यामध्ये कशी वाढ झाली ती पाहाणे.
४. एकूण प्राप्ती, एकूण खर्च आणि निव्वळ नफा यांची स्थिती तपासणे.

**शोधनिबंधाची कार्यप्रणाली:**

सदरचा शोधनिबंध हा गुणात्मक आणि संख्यात्मक पद्धतीवर आधारलेला आहे. सदरच्या शोधनिबंधात श्री वारणा सहकारी बँक मर्या. वारणानगर या बँकेचे वार्षिक अहवाल आणि संकेतस्थळ यावरील सांख्यिकी आणि गुणात्मक माहितीवर आधारलेला आहे. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी कोष्टक, तक्ते, आलेख आणि आकृत्यांचा वापर केला आहे. तसेच मागील पाच दशकातील आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास केला आहे आणि निष्कर्ष काढले आहेत.

**शोधनिबंधाच्या मर्यादा :**

सदरचा शोधनिबंध हा फक्त वारणा बँकेचे आर्थिक अहवाल (सन १९६६ ते सन २०२३) आणि संकेतस्थळावरील माहिती यावर आधारलेला आहे. तसेच मागील ५५ वर्षांच्या फक्त वारणा बँकेच्या आकडेवारीचा विचार आर्थिक विश्लेषणासाठी केला गेला आहे.

**माहितीचे विश्लेषण:**

गेल्या ५५ वर्षांत श्री वारणा सहकारी बँकेने केलेली आर्थिक प्रगती पुढीलप्रमाणे पाहाता येईल.

**१. सभासद सांख्या:**

सभासद हा सहकारी संस्थेचा आत्मा असतो. श्री वारणा सहकारी बँकेच्या स्थापनेपासून 'अ' वर्ग सभासद संख्या सतत वाढत गेली आहे. साधारणपणे मागील ५५ वर्षांत 'अ' वर्ग सभासदांमधील वाढ ही ३०.१६ पटीपेक्षाही जास्त आहे. हीच बाब वारणा सहकारी बँकेच्या प्रगतीचे प्रतीक असलेली दिसून येते. डॉ. मनमोहन सिंग यांच्या सर्वसमावेशक बँकिंगची संकल्पना वारणा सहकारी बँकेने उत्कृष्ट पद्धतीने पार पाडत आहे, ही बाब सभासदांच्या संख्येतील वाढीवरून स्पष्ट होते. तक्ता व आलेख एकवरून सभासदांची झालेली वाढ समजून येते.


**तक्ता क्र.०१ : श्री वारणा सहकारी बँकेची 'अ' वर्ग सभासद संख्या**

| अ.क्र. | वर्षे | 'अ' वर्ग सभासद संख्या | दशकातील वाढ (%) |
|---|---|---|---|
| १. | ३०.०६.१९६६ | ८५९ | - |
| २. | ३०.०६.१९७६ | १४१६ | १.६४ |
| ३. | ३०.०६.१९८६ | ५९३५ | ४.१९ |
| ४. | ३१.०३.१९९६ | १४६२५ | २.४६ |
| ५. | ३१.०३.२००६ | १६६८८ | १.१६ |
| ६. | ३१.०३.२०१६ | २३७३१ | १.४२ |
| ७. | ३१.०३.२०२२ | २५९०८ | १.०९ |

**स्रोत :** श्री वारणा सहकारी बँकेचे विविध अहवाल. (सन १९६६ ते सन २०२३).

**आलेख क्र. ०१**


**श्री वारणा सहकारी बँकेची ‘अ’ वर्ग सभासद संख्या**




तक्ता क्रमांक १ वरून असे दिसून येते की, मागील ५५ वर्षात ‘अ’ वर्ग सभासद संख्या सातत्याने वाढत आहे. ३०.०६.१९७६ ते ३०.०६.१९८६ या दशकात सभासद संख्या ४.१९ पटीने वाढली. ३०.०६.१९८६ ते ३१.०३.१९९६ या कालावधीत सभासद संख्या २.४६ पटीने वाढली. इतर दशकांत मात्र वाढ २ टक्क्यांपेक्षा कमीच होती. एकंदरीतच सभासदांच्या दशकातील वाढीचा दर ३०.०६.१९७६ ते ३०.०६.१९८६ या दशकानंतर घटताना दिसत आहे.

**आलेख क्र. ०२**

**श्री वारणा सहकारी बँकेच्या ‘अ’ वर्ग सभासदांच्या दशकातील वाढीचा दर**



## २. भाग भांडवल, गंगाजळी आणि इतर निधी:

सभासदांना भागांची विक्री करून जमा केलेली रक्कम म्हणजे भाग भांडवल होय. बँकेला झालेल्या नफ्यातून निर्माण केलेला राखीव निधी म्हणजेच ती बँकेची गंगाजळी होय, तर बँकेने ताफ्यातील काही रक्कम विशिष्ट हेतूने वेगळी काढली असेल, तर त्याला इतर फंड किंवा निधी असे संबोधले जाते. कोणत्याही व्यवसायाची सक्षमता ही त्या व्यवसायातील भाग भांडवल आणि स्वनिधी यावरून ठरविली जाते. भाग भांडवल व स्वनिधी हे बँकिंग व्यवसायाचा पाया असून, त्यावरूनच व्यवसायाचे आर्थिक स्थैर्य समजून येते. बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.३४% इतके असून रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार किमान ९.००% इतके असणे आवश्यक आहे. श्री वारणा सहकारी बँकेचे हे प्रमाण चांगले असल्याने बँकेचा आर्थिक पाया भक्कम आहे. रेखा आलेख क्र. २ वरून याची सविस्तर कल्पना आपणास येते.

**तक्ता क्र.०२**

**श्री वारणा सहकारी बँकेचे भाग भांडवल, गंगाजळी आणि इतर निधी**


| अ.क्र. | वर्षे | भाग भांडवल | गंगाजळी | इतर निधी |
|---|---|---|---|---|
| १. | ३०.०६.१९६६ | १.४३ | ०.०४ | ०.०० |
| २. | ३०.०६.१९७६ | ४.८० | ३.७० | ५.१४ |
| ३. | ३०.०६.१९८६ | २२.२५ | ३०.०५ | ६४.१२ |
| ४. | ३१.०३.१९९६ | १३५.९३ | १३२.३८ | २८७.५१ |
| ५. | ३१.०३.२००६ | ६१०.०९ | ३५३.१५ | ८८०.४९ |
| ६. | ३१.०३.२०१६ | २१५८.३१ | ९८७.७८ | ४२५०.७८ |
| ७. | ३१.०३.२०२२ | ३५८८.६९ | ७७८८.२९ | उ.ना. |

**स्त्रोत-** श्री वारणा सहकारी बँकेचे विविध अहवाल. (सन १९६६ ते सन २०२३).

टीप- उ.ना. म्हणजे उपलब्ध नाही.

**आलेख क्र. ०३**

**श्री वारणा सहकारी बँकेचे भाग भांडवल, गंगाजळी आणि इतर निधी**



आलेख क्र. ३ वरून असे दिसून येते की, ३०.०६.१९६६ पासून ३०.०६.१९८६ पर्यंत बँकेच्या भाग भांडवल, गंगाजळी आणि इतर निधीतील प्रगतीचा आलेख संथ होता. परंतु सन १९९१ नंतर भारतात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण याला सुरुवात झाली आणि श्री वारणा सहकारी बँकेची प्रगती अतिशय वेगाने झालेली दिसून येते. ३१.०३.२०१६ ते ३१.०३.२०२२ याकाळात भाग भांडवलात वेगाने वाढ झालेली दिसून येते. इतर निधी प्रत्येक वेळी जास्त असलेला दिसून येतो. ३१.०३.२०१६ ते ३१.०३.२०२२ याकाळात गंगाजळीतसुद्धा अतिशय वेगाने वाढ झालेली दिसून येते.

**३. ठेवी, कर्जे व गुंतवणूक:**

श्री वारणा सहकारी बँकेच्या ठेवी, कर्जे व गुंतवणूक सन १९६६ ते २०२२ या ५५ वर्षांच्या काळातील पुढीलप्रमाणे आहेत.

**तक्ता क्र.०३**

**श्री वारणा सहकारी बँकेच्या ठेवी, कर्जे व गुंतवणूक (आकडे लक्ष रुपये)**

| अ.क्र. | वर्षे | ठेवी | कर्जे | गुंतवणूक |
|---|---|---|---|---|
| १. | ३०.०६.१९६६ | ०.९६ | ०.४९ | - |
| २. | ३०.०६.१९७६ | ८९.१५ | ५०.९६ | ४५.३४ |
| ३. | ३०.०६.१९८६ | १०५४.८६ | ६७०.४१ | २६८.८७ |
| ४. | ३१.०३.१९९६ | ४१५३.८५ | ३४६४.८४ | ७६२.९२ |
| ५. | ३१.०३.२००६ | २६६७१.०८ | १६६८९.६६ | १०१३७.३३ |
| ६. | ३१.०३.२०१६ | ६८२५९.४९ | ४३५९५.४५ | १९९१९.२४ |
| ७. | ३१.०३.२०२२ | ९८९१२.३४ | ६२८०५.२९ | ३७१०४.९८ |

**स्त्रोत-** श्री वारणा सहकारी बँकेचे विविध अहवाल. (सन १९६६ ते सन २०२३)

ग्रामीण भागातील मध्यम व तळागाळातील लोकांचा कल नागरी सहकारी बँकेकडून बँकिंग सेवा घेण्याकडे आहे. सध्या बँकिंग क्षेत्रातील स्पर्धात्मक परिस्थितीत सर्वसामान्यांचा विश्वास कायम ठेवून गेल्या ५५ वर्षांत वारणा सहकारी बँकेने ठेवीतील वाढीमध्ये सातत्य राखले आहे. ३०.०६.१९६६ रोजी ०.९६ लाख रुपये इतक्या ठेवी होत्या. ५५ वर्षांच्या काळात बँकेने ठेवीत गरूडझेप घेतली आहे. सन ३१.०३.२०२२ रोजी त्यात ९८९१२.३४ लाख रुपये इतकी वाढ झाली. ठेवीमधील वाढीवरून बँकेचे सर्वसामान्य लोकांशी असणारे जिव्हाळ्याचे संबंध, त्यांचा विश्वास यात वाढच होत असलेली दिसते, हे बँकेच्या यशाचे मोठे श्रेय मानावे लागेल.

चांगला कर्जदार मिळणे हे बँकेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. बँकेने आधुनिक बँकिंग पद्धतीचा वापर करून, जाहिरात करून, नियोजनबद्ध पद्धतीने कर्जे वितरीत केली आहेत. बँकिंग क्षेत्रातील बदलती परिस्थिती, इतर बँकांचे कर्जविषयक धोरण, व्याजदर इत्यादींचा सूक्ष्म अभ्यास करून सणासुदीचे औचित्य साधून गेल्या ५५ वर्षांत बँकेने मोठ्या प्रमाणात कर्जे वितरीत केली आहेत. सन ३०.०६.१९६६ मध्ये ०.४९ लाख रुपये कर्ज वाटप केली होती. त्यात ५५ वर्षांनंतर ६२८०५.२९ लक्ष रुपये इतकी वाढ झाली. कर्ज वितरण

बरोबरच कर्जवसुलीचे प्रमाण चांगले असल्यामुळे बँक निव्वळ अनुत्पादक कर्जाचे (एन.पी.ए.) एकूण कर्जाशी असणारे प्रमाण नेहमीच ३ टक्क्यांपेक्षा कमी राहिले आहे. रिझर्व्ह बँकेने ठरविलेल्या निकषांपेक्षा अनुत्पादक कर्जाचे प्रमाण कमी राहिले आहे, हेच कर्जदार आणि बँक यांच्यातील जिव्हाळ्याचे संबंध व कर्मचारी यांचे उत्कृष्ट काम याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल.

### ४. एकूण प्राप्ती, एकूण खर्च आणि निव्वळ नफा:

श्री वारणा सहकारी बँकेची एकूण प्राप्ती, एकूण खर्च आणि निव्वळ नफा ३०.०६.१९६६ ते ३१.०३.२०२२ पर्यंत तक्ता क्रमांक ०४ मध्ये दिला आहे.

**तक्ता क्र.०४**

**श्री वारणा सहकारी बँकेची एकूण प्राप्ती, एकूण खर्च आणि निव्वळ नफा** (आकडे लक्ष रुपये)

| अ.क्र. | वर्षे | एकूण प्राप्ती | एकूण खर्च | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १. | ३०.०६.१९६६ | ०.०२ | ०.०४ | -०.०२ |
| २. | ३०.०६.१९७६ | १०.६९ | ८.९५ | १.७४ |
| ३. | ३०.०६.१९८६ | १३१.६६ | १२२.१४ | ९.२५ |
| ४. | ३१.०३.१९९६ | ६२६.९४ | ५७५.५२ | ५१.४२ |
| ५. | ३१.०३.२००६ | २६७५.५४ | २५८४.३० | ९१.२४ |
| ६. | ३१.०३.२०१६ | ८१४१.२७ | ७८१८.६५ | ३२२.६२ |
| ७. | ३१.०३.२०२२ | ९४३८.२९ | ८९६२.१५ | ४७६.१४ |

**स्त्रोत-** श्री वारणा सहकारी बँकेचे विविध अहवाल. (सन १९६६ ते सन २०२३)

तक्ता क्र.०४ वरून असे दिसून येते की, ३०.०६.१९६६ ते ३१.०३.२०२२ पर्यंत एकूण प्राप्ती आणि एकूण खर्च वाढत आहे. परंतु एकूण खर्चापेक्षा प्राप्ती जास्त वाढत आहे. त्यामुळे ३०.०६.१९७६ पासून बँकेला सतत नफा मिळत आहे. नफ्यात सातत्याने वाढ होताना दिसून येते आहे. बँकेचा वाढता नफा हा बँकेच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाची प्रचिती देतो.

तक्ता क्र. ०४ वरून असे दिसून येते की, सन १९९६ पासून बँकेला अधिक नफा होताना दिसून येत आहे. ३१.०३.२०१६ पासून नफा अत्यंत वेगाने वाढला आहे. प्रतिकर्मचारी ३१.०३.२०२२ या कालावधीत १.३८ लाख रुपये इतका नफा झाला.

### ५. खेळते भांडवल:

बँकिंग प्रणालीमध्ये व्यवसायातील स्वनिधी व खेळते भांडवल यावरून बँकेची सक्षमता व स्थैर्याची कल्पना येते. बँकिंग व्यवसायात खेळत्या भांडवलाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ३०.०६.१९६६ रोजी खेळते भांडवल २.४६ लाख रुपये इतके होते त्यात ३१.०३.१९९१ रोजी २७ कोटी २ लाख रुपयापर्यंत वाढले. ३१.०३.२०१६ पर्यंत खेळते भांडवल ७७८८९.२४ लाख रुपयापर्यंत गेले. ३१.०३.२०२२ मध्ये ११२२७१.१५ लाख रुपयापर्यंत वाढले.

**निष्कर्ष:**

मागील विश्लेषणावरून खालील प्रमुख निष्कर्ष निघतात.

**१.** 'अ' वर्ग सभासद संख्या सातत्याने वाढत आहे. ३०.०६.१९७६ ते ३०.०६.१९८६ या दशकांत सभासद संख्या ४.१९ पटीने वाढली. तर ३०.०६.१९८६ ते ३१.०३.१९९६ या कालावधीत सभासद संख्या २.४६ पटीने वाढली. इतर दशकांत मात्र सभासदांची वाढ २ टक्क्यांपेक्षा कमीच आहे.

**२.** ३०.०६.१९६६ पासून ३०.०६.१९८६ पर्यंत बँकेच्या भाग भांडवल, गंगाजळी आणि इतर निधीतील प्रगती संथ होती. परंतु सन १९९१ नंतर अतिशय वेगाने झालेली दिसून येते.

**३.** बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.३४% इतके असून रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार किमान ९.००% इतके असणे आवश्यक आहे. श्री वारणा सहकारी बँकेचे हे प्रमाण चांगले असल्याने बँकेचा आर्थिक पाया भक्कम आहे.

**४.** ३०.०६.१९६६ रोजी ०.९६ लाख रुपये इतक्या ठेवी होत्या. ५५ वर्षांच्या काळात बँकेने ठेवीत गरूडझेप घेतली आहे. सन ३१.०३.२०२२ रोजी त्यात ९८९१२.३४ लाख रुपये इतकी वाढ झाली. ठेवीमधील वाढीवरून बँकेचे सर्वसामान्य लोकांशी असणारे जिव्हाळ्याचे संबंध, त्यांचा विश्वास यात वाढच होत असलेली दिसते.

**५.** सन ३०.०६.१९६६ मध्ये ०.४९ लाख रुपये कर्ज वाटप केले होते. त्यात ५५ वर्षांनंतर ६२८०५.२९ लक्ष रुपये इतकी वाढ झाली.

**६.** कर्ज वितरणा बरोबरच कर्जवसुलीचे प्रमाणसुद्धा चांगले असल्यामुळे बँकेचे निव्वळ अनुत्पादक कर्जाचे (एन.पी.ए.) एकूण कर्जाशी असणारे प्रमाण नेहमीच ३ टक्क्यांपेक्षा कमी राहिले आहे.

**७.** रिझर्व्ह बँकेने ठरविलेल्या निकषांपेक्षा वारणा सहकारी बँकेचे अनुत्पादक कर्जाचे प्रमाण कमी राहिले आहे. हेच कर्जदार आणि बँक यांच्यातील जिव्हाळ्याचे संबंध अधोरेखित करते तर यालाच कर्मचारी यांचे उत्कृष्ट कामकाज म्हणता येईल.

**८.** सन २००६ नंतर मात्र बँकेच्या ठेवी, कर्जे आणि गुंतवणुकीत अतिशय वेगाने वाढ झाली आहे.

**९.** ३०.०६.१९६६ ते ३१.०३.२०२२ पर्यंत एकूण प्राप्ती आणि एकूण खर्च वाढत आहे. परंतु एकूण खर्चापेक्षा प्राप्ती जास्त वाढत आहे.

**१०.** सन १९९६ पासून बँकेला अधिक नफा होताना दिसून येत आहे. ३१.०३.२०१६ पासून नफा अत्यंत वेगाने वाढला आहे.

**११.** प्रतिकर्मचारी ३१.०३.२०२२ या कालावधीत १.३८ लाख रुपये इतका नफा झाला आहे.

**१२.** बँकेचा वाढता नफा हा बँकेच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाची प्रचिती देतो आहे.

**१३.** ३०.०६.१९६६ रोजी खेळते भांडवल २.४६ लाख रुपये इतके होते. त्यात ३१.०३.२०२२ पर्यंत ११२२७१.१५ लाख रुपयापर्यंत वाढ झाली.

**१४.** ग्रामीण भागातील मध्यम व तळागाळातील लोकांचा कल नागरी सहकारी बँकेकडून बँकिंग सेवा घेण्याकडे आहे.

**शिफारशी:**

श्री वारणा सहकारी बँकेच्या पुढील वाटचालीसाठी शिफारसी पुढीलप्रमाणे :

१. सभासद नोंदणीमध्ये महिला सभासदांचे प्रमाण वाढवावे.

२. ठेवी जमा करण्याचा अधिक विस्तार करणे शक्य आहे ते वाढविणे गरजेचे आहे.

३. ज्येष्ठ नागरिकांसाठी जादा व्याजदर द्यावा.

४. महिला ठेवीदारांसाठी अधिक व्याजदर असावा.

५. महिला उद्योजकांना कर्जपुरवठा करून नियमित कर्जवसुली होण्यासाठी व्याज सवलत योजना

राबवावी.

६. ऑनलाईन बँकिंग सेवा जसे भीम ॲप सेवा सुरू करणे आवश्यक आहे.

७. फोन पे सेवा सुरू आहे; परंतु त्यामध्ये अनेक अडथळे येत आहेत, त्याचा दर्जा सुधारणे अत्यंत गरजेचे आहे.

८. बँकेने स्वतःचे ॲप तयार करून बँकिंग सेवेचा विस्तार केला आहे; परंतु सर्वर एररमुळे अनेक अडथळे येतात. ते कमी करणे अत्यंत गरजेचे आहे.

९. बँकेने जमा केलेल्या ठेवींमधून कर्जपुरवठा विस्तारणे गरजेचे आहे.

१०. फास्टॅग सेवा सुरू करणे गरजेचे आहे.

**सारांश:**

वारणा खोऱ्याच्या सर्वांगीण विकासाच्या संकल्पनेने प्रेरित होऊन सहकाराची मशाल हाती घेऊन निघालेल्या स्वर्गीय सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह वारणा सहकारी बँकरूपी बीजाचे रोप लाविले. या रोपाने सहकारामधून समृद्धी वाढून उन्नतीच्या अंकुराचा वटवृक्ष करून आपली आर्थिक उन्नती वैभवशाली शिखरावर पोहचवली. काळानुसार आलेले बदल स्वीकारत अनेकांच्या जीवनाचा बँक आधार बनली. ठेवीदारांचा अतूट व अभूतपूर्व विश्वास लाभलेल्या आणि उत्कृष्ट नेतृत्व व कुशल व्यवस्थापन असलेल्या वारणा सहकारी बँकेने आपली प्रगती वारणा खोऱ्याच्याबाहेर महाराष्ट्रभर नेली आहे, म्हणूनच वारणा बँकेची प्रेरणा इतर बँकांनी घेण्यासारखे आहे. वारणा सहकार प्रतिमानातील वारणा सहकारी बँक हा एक महत्त्वाचा घटक आहे. समाजातील शेवटच्या घटकाच्या उद्धाराचे, सहकाराचे तत्त्व जपत श्री वारणा सहकारी बँक आपली आकांक्षांच्या क्षितिजाला अर्थ देण्याचे ब्रीद सार्थ ठरवत आहे.

**संदर्भ सूची:**


१. उशीर, दातार, जावळे-पाटील आणि इतर (२०१५), बँक व्यवसाय व वित्तपुरवठा भारतातील बँकविषयक कायदे आणि कार्यपद्धती, निराली प्रकाशन, पुणे.

२. श्री वारणा सहकरी बँक लि. वारणानगरचे वार्षिक अहवाल. (सन १९६६ ते २०२३)

३. https://w.w.w.waranabank.com.


◆

ज्या कार्यापासून महत्तम सामाजिक हित साध्य होते
तीच सार्वजनिक आयव्ययाची सर्वोत्कृष्ट पद्धत होय.

- डॉ. डाल्टन

# प्रधानमंत्री मुद्रा योजना : टीकात्मक परीक्षण

**हरी पंढरी वंगरवार** †

**प्रस्तावना :**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाची (एमएसएमई) देशाच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका आहे. त्याचप्रमाणे रोजगार निर्मिती, प्रादेशिक समतोल प्रस्थापित करणे, संपत्तीचे न्याय वितरण यामध्ये देखील मोलाची भूमिका बजावली आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणच्या ७३व्या फेरीनुसार, २०१५-१६ या वर्षात ६३३.८८ लाख असंघटित बिगर कृषी एमएसएमई भारतात विविध आर्थिक उत्पादन प्रक्रियेत गुंतलेले होते. त्यापैकी ९९% उद्योग हे सूक्ष्म होते. शिवाय ५०% पेक्षा अधिक उद्योग ग्रामीण भागात स्थापन झालेले आहेत. अंदाजे ११.१ कोटी लोकांना रोजगार पुरविण्याचे काम एमएसएमई करतात. देशाच्या राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) मधील वाटा ३०% पेक्षा जास्त आहे. कृषिक्षेत्रानंतर एमएसएमई हे सर्वाधिक रोजगार निर्मितीचे साधन म्हणून ओळखले जाते. सूक्ष्म उद्योग एकूण उद्योगांच्या ९०% पेक्षा जास्त असून एकूण कृषी बेरोजगारांच्या ९०% बेरोजगारांना रोजगार पुरविते.

तथापि, औपचारिक वित्तीय संस्थाकडून भारतातील एमएसएमई क्षेत्राला होणारा कर्जपुरवठा पुरेसा नाही. तसेच बँक आणि वित्तीय संस्थांचे नियम आणि कायदे त्यांना आर्थिक सहाय्य प्राप्त करण्यात मोठा अडथळा ठरतात. आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाच्या अंदाजानुसार, एमएसएमईची एकूण कर्ज मागणी रुपये ६९.३ ट्रिलियन आहे. त्यातील ८४% मागणी अनौपचारिक क्षेत्राकडून पूर्ण केली जाते. वित्तीय संस्थांद्वारे अलीकडील काळात भरून काढाव्या लागणाऱ्या व्यवहार्य कर्जातील तफावतीच्या ९५% वाटा सूक्ष्म आणि लघु उद्योगांचा आहे.

**साहित्याचे पुनरावलोकन :**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांकडे (एमएसएमई) स्वतःची मर्यादित संसाधने असतात. तसेच वित्तीय संस्थांच्या नियमावलीमुळे त्यांना कर्ज घेताना अडचणी येतात. अनेक अभ्यासकांनी असा निष्कर्ष काढला की, वित्तीय अडचणींमुळे लघु उद्योगांच्या विकासावर मर्यादा येतात. लहान उद्योजकांना कर्जाचा अभाव ही मुख्य व्यावसायिक अडचण असून उदयोन्मुख लहान उद्योजकांना या अडचणीला मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते (१,२). आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळानुसार (२०११), लघु व मध्यम उद्योगांना अपुरा कर्जपुरवठा हा कायमचा प्रश्न आहे. विकसनशील देशातील अंदाजे ५५ ते ६८% लघु व मध्यम उद्योगांना औपचारिक

† सहयोगी प्राध्यापक, बी. वाय. के. कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक - ०५,
आजीव सदस्य क्र. १४८९, भ्रमणध्वनी : ९४०४७८१८६५, ई-मेल : haripinkey@gmail.com

वित्तीय सेवा मिळाल्या नाहीत. तसेच वित्त संस्थांचा विकास आणि आर्थिक वृद्धी यांच्यातील सहसंबंध अनेक शोधनिबंधात स्पष्ट केले आहेत. बांग्लादेशात ग्रामीण बँकेच्या माध्यमातून सूक्ष्म उद्योगांना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करून अगणित कुटुंबांना गरिबी रेषेच्यावर आले आहे.

**प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) परिचय:**

मुद्रा लिमिटेड ही भारत सरकारची प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) या शीर्षकाखाली चालविली जाणारी प्रमुख योजना आहे. देशातील सूक्ष्म उद्योगांना वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांना निधी सहाय्य प्रदान करण्यासाठी पुनर्वित्त संस्था म्हणून ही योजना सुरू करण्यात आली होती. ही योजना ८ एप्रिल, २०१५ रोजी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. ही भारतीय बँकिंग क्षेत्रात मुद्रा कर्ज योजना म्हणून ओळखली जाते. या योजनेचा मुख्य उद्देश सूक्ष्म उपक्रमांसाठी निधीची तफावत भरून काढणे, त्यांना चालना देणे, पहिल्या पिढीतील उद्योजकांचा आत्मविश्वास वाढवणे आणि विद्यमान लहान व्यवसायांना त्यांचा विस्तार करण्यास मदत करणे हा आहे. लहान उत्पादन पेढी, सेवाक्षेत्रातील उपक्रम, भागीदारी संस्था, फळे आणि भाजीपाला विक्री, अन्नसेवा चालवणे, दुरुस्ती आणि देखभाल, यंत्रे, अन्नप्रक्रिया, हस्तकला इ. प्रकारच्या व्यवसायात काम करणाऱ्या ग्रामीण आणि शहरी भागातील उद्योजकांना कर्ज पुरविण्याची तरतूद या योजनेत आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून या योजनेअंतर्गत शेतीशी निगडित उपक्रम देखील कर्ज घेण्यास पात्र आहेत.

या योजनेअंतर्गत उत्पादन, व्यापार आणि सेवाक्षेत्रातील सूक्ष्म उद्योगांच्या माध्यमातून उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्तींना १० लाखांपर्यंत मुद्रा कर्ज देण्याची तरतूद आहे. यात मुद्रा कर्जाची तीन श्रेणींमध्ये विभागणी केली आहे.

१. शिशू: रु. ५०,००० पर्यंत कर्ज

२. किशोर: रु. ५०००१ ते रु. ५००००० पर्यंत कर्ज

३. तरुण: रु. ५००००१ ते रु. १०००००० पर्यंत कर्ज

याशिवाय, रु. ५,००० ची ओव्हरड्राफ्ट रक्कम मुद्रा कर्ज म्हणून प्रधानमंत्री जन-धन योजने (PMJDY) अंतर्गत मंजूर केलेले आहेत. मुद्रा योजनेत ३१ मार्च, २०१७ अखेर एकूण नोंदणीकृत भागीदार संस्थांची संख्या १९३ असून, ज्यात २७ सार्वजनिक क्षेत्रातील बँका, १८ खाजगी क्षेत्रातील बँका, ३१ प्रादेशिक ग्रामीण बँका (RRB), १३ राज्य/शहरी सहकारी बँका, ७३ सूक्ष्म वित्त संस्था (MFI) आणि ३१ गैर बँकिंग वित्तीय संस्था (NBFC) आहेत.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

१. मुद्रा योजनेच्या प्रगतीचा आढावा घेणे.
२. मुद्रा योजनेअंतर्गत बँक खाती उघडण्याचा वृद्धिदर आणि विविध श्रेणीमधील कर्जमंजुरीचा वृद्धिदर अभ्यासणे.
३. मुद्रा योजनेअंतर्गत शिशु, किशोर आणि तरुण या प्रकारच्या योजनात झालेल्या कर्ज वितरणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना:**

१. बँक खाती उघडण्याचा वृद्धिदर आणि विविध मुद्रा योजनांमधील कर्ज वितरण यात धनात्मक संबंध दिसतो.
२. शिशु या प्रकारात सर्वाधिक बँक खाती उघडण्यात आली असून, कर्ज वितरण देखील झाले आहे.
३. मुद्रा योजनेअंतर्गत कर्जमंजुरी करताना मागास वर्गाच्या तुलनेत सामान्य वर्गास अधिक प्राधान्य देण्यात आले.

मुद्रा योजनेच्या माध्यमातून सूक्ष्म उद्योगांना अर्थिक पाठबळ देणे हा सरकारचा एक यशस्वी उपक्रम आहे. बँक खाती उघडण्याचा वृद्धिदर आणि विविध मुद्रा योजनांमधील कर्ज वितरण यात धनात्मक संबंध दिसतो.

या योजनेचा विस्तार मोठा असून नवीन उद्योजक आणि उपेक्षित, महिला उद्योजकांना या योजनेचा मोठा फायदा झाला आहे. या योजनेअंतर्गत सर्वाधिक बँक खाती 'शिशू' या गटात उघडण्यात आली आहेत. तसेच खाजगी बँका आणि सूक्ष्म वित्त संस्थांनी यात अनन्यसाधारण भूमिका वर्तविली आहे.

**संशोधन पद्धती :**

हा शोधनिबंध पूर्णत: दुय्यम माहिती साधनाच्या माध्यमातून तयार केला आहे. मुद्रा योजनेशी संबंधित माहिती मुख्यतः MUDRA च्या वार्षिक अहवालांमधून प्राप्त केला आहे. तसेच मुद्रा योजना संकेतस्थळ, विविध जर्नल, मासिके आणि नियतकालिक इत्यादींमधून माहिती देखील घेतलेली आहे. या शोधनिबंधात मुद्रा योजनेअंतर्गत येणाऱ्या विविध कर्ज योजना आणि त्यांच्या कामगिरीचे विश्लेषण केले आहे. या योजनेत सहभागी विविध वित्तीय संस्था, एकूण बँक खात्यांची संख्या, कर्ज वितरण यांची तुलना केली आहे. आकडेवारीच्या विश्लेषणासाठी सरासरी, टक्केवारी आणि ANOVA अशी सांख्यिकीय साधने वापरली आहेत.

**मुद्रा योजनेअंतर्गत बँक खातेदाराची संख्या व कर्जमंजुरीची प्रगती :**

मुद्रा योजना देशातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाला आर्थिक मदत पुरवून भारताचा औद्योगिक विकास करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या बँक खात्याची संख्या योजनेच्या यशाची कल्पना देते. सन २०१५-२०२१ या कालावधीत एकूण २९.५४ कोटी बँक खाती या योजनेचा लाभ घेण्यासाठी उघडण्यात आली. त्यापैकी ८७% खाती शिशु, ११% खाती किशोर आणि २% खाती तरुण या वर्गात उघडण्यात आली.

बँक खाती उघडण्याचा सरासरी वार्षिक वृद्धिदर काढला असता असे दिसून आले की, २०१५-२०१९ या कालावधीत हा वृद्धिदर वाढता होता. परंतु तो २०१९-२० आणि २०२०-२१ या आर्थिक वर्षात हा वृद्धिदर जलद गतीने घसरला. एकूण बँक खाती उघडण्याचा सरासरी वार्षिक वृद्धिदर मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ साली १४% होता आणि २०१८-१९ मध्ये सर्वाधिक २४.४% होता. परंतु २०१९-२० या वर्षात केवळ ४% आणि २०२०-२१ या कोरोना महामारीच्या काळात ऋण १८.५% झाला. सरासरी वार्षिक वृद्धिदरातील ही घट शिशु आणि तरुण या गटातील ऋणात्मक वृद्धिदरामुळे झाली. शिशु गटातील बँक खाती उघडण्याचा हा वृद्धिदर २०२०-२१ या वर्षी ऋणात्मक २६% आणि तरुण गटासाठी ऋण १६% होता. असे असले तरी मुद्रा योजनेअंतर्गत बँक खाती उघडणाऱ्यांची संख्या लक्षणीय मोठी आहे.

मुद्रा योजनेअंतर्गत कर्जमंजुरीची स्थिती विचारात घेतली असता असे दिसून येते की, अस्तित्वातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना आणि नवीन उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या व्यावसायिकांना आर्थिक वर्ष २०१५-२०२१ या कालावधीत १५.५२ लाख कोटी रुपये कर्ज मंजूर करण्यात आले. त्यातील ४३% शिशु गटातील कर्जधारकांचे, ३३.२% किशोर गटातील आणि उर्वरित तरुण गटातील कर्जधारकांचे कर्ज मंजूर करण्यात आले. मुद्रा योजनेत सरासरी रु. ५२५४५ कर्ज मंजूर करण्यात आले. ही सरासरी कर्जमंजुरी शिशु गटासाठी रु.२५९९०, किशोर गटासाठी रु.१६१४४० आणि तरुण गटासाठी रु.६२५४३० कर्ज मंजूर करण्यात आले. सद्यस्थितीतील महागाईच्या काळात ही कर्ज रक्कम स्वयंरोजगार उभा करण्यासाठी आणि व्यवसाय सुरू करण्याच्या दृष्टीने खूपच तोकडी आहे.

त्याचप्रमाणे विविध गटांतील एकूण कर्जमंजुरीचा सरासरी वार्षिक वृद्धिदर काढला असता असे दिसते की, २०१५-१६ ते २०१८-१९ या काळातील कर्ज मंजुरीचा सरासरी वार्षिक वृद्धिदर हा उल्लेखनीय होता. २०१६-१७ साली हा दर ३१.३% होता तो

**तक्ता क्र. १: मुद्रा योजनेअंतर्गत बँक खातेदाराची संख्या आणि कर्जमंजुरी:**

| वित्तीय वर्ष | बँक खात्याची संख्या (लाख) | | | | कर्जमंजुरी (कोटी रुपये) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिशू | किशोर | तरुण | एकूण | शिशू | किशोर | तरुण | एकूण |
| २०१५-१६ | ३२४ | २०.६ | ४.१ | ३४८ | ६२८९५ | ४३०५३ | ३१५०२ | १३७४४९ |
| २०१६-१७ | ३६४ | २६.६ | ५.३ | ३९७ | ८५१०१ | ४३०५३ | ४१८८३ | १८०५२९ |
| २०१७-१८ | ४२६ | ४६.५ | ८ | ४८१ | १०६००२ | ८६७३२ | ६०९४३ | २५३६७७ |
| २०१८-१९ | ५१५ | ६६ | १७.५ | ५९८ | १४२३४५ | १०४३८६ | ७४९११ | ३२१७२२ |
| २०१९-२० | ५४४ | ६४.७ | १२.८ | ६२२ | १६३५५९ | ९५५७८ | ७८३५८ | ३३७४९५ |
| २०२०-२१ | ४०१ | ९४.८ | १०.६ | ५०७ | १०९९५३ | १३२५१६ | ७९२९० | ३२१७५९ |

**स्रोत :** वार्षिक अहवाल २०१५-१६ ते २०२०-२१, mudra.org.in

२०१७-१८ या वर्षात ४०.५% झाला. परंतु तो घटून २०१८-१९ या वर्षात २६.८%, २०१९-२० या वर्षात ४.९% आणि २०२०-२१ या वर्षात ऋण ४.७% झाला. गटनिहाय कर्जमंजुरीचा सरासरी वार्षिक वृद्धिदर विचारात घेतला असता असे दिसते की, २०१७-१८ या वर्षात तो शिशु गटासाठी सर्वाधिक ४१.९% होता. २०१९-२० साली १५% आणि २०२०-२१ साली ऋण ३२.८% झाला.

**मुद्रा योजनेअंतर्गत विविध बँक संस्थानिहाय कामगिरी:**

मुद्रा योजनेअंतर्गत विविध बँका आणि वित्तीय संस्थांकडून कर्जवाटप करण्यात आले आहे. त्यात सार्वजनिक बँका, खाजगी बँका, लघु वित्त बँक व सूक्ष्म वित्त संस्था आणि बिगर बँकिंग वित्तीय संस्था यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते की, मुद्रा योजनेअंतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी सुरुवातीच्या काळात (सन २०१५-१६) साली एकूण मुद्रा कर्जा पैकी ५२% कर्ज मंजूर केले होते. परंतु त्यानंतरच्या काळात सार्वजनिक बँकांचा कर्जमंजुरीचा वाटा सतत घटून तो २०१९-२० वर्षात ३४% इतका कमी झाला. याउलट खाजगी बँकांचा वाटा २०१५-१६ साली १५% होता तो वाढून २०१९-२० या वर्षात २७% झाला. तसेच बिगर बँकिंग वित्तीय संस्थांचा वाटा २०१६-१७ या वर्षात केवळ १% वरून २०१९-२० साली १२% इतका झाला.

**मुद्रा योजनेअंतर्गत विविध सामाजिक प्रवर्गातील कर्जमंजुरीची प्रगती :**

मुद्रा योजनेअंतर्गत विविध बँका आणि वित्तीय संस्थांकडून उघडण्यात आलेल्या बँक खात्याचे आणि कर्ज वितरणाचे सामाजिक वर्गीकरण तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

मुद्रा योजनेअंतर्गत विविध बँका आणि वित्तीय संस्थांकडून उघडण्यात आलेल्या बँक खात्याचे आणि कर्ज वितरणाचे सामाजिक वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, २०२०-२१ या वर्षात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास वर्ग याचे मुद्रा योजनेअंतर्गत उघडण्यात आलेल्या बँक खात्याची टक्केवारी ४९ असून कर्ज वितरणातील प्रमाण ३३% एवढे अल्प आहे. याउलट, सामान्य वर्गातील लोकांची ५१% बँक खाती आहेत; परंतु कर्जमंजुरीतील वाटा ६७% आहे (आलेख १ आणि २ पाहा). थोडक्यात,

**तक्ता क्र. २: मुद्रा योजनेअंतर्गत विविध बँक आणि वित्त संस्थांनी मंजूर केलेले कर्ज (कोटी रु.)**

| वित्तीय वर्ष | पीएसबी व आरआरबी | खाजगी बँक | एसएफबी व एमएफओ | एनबीएफसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | ७०९९८.७५ | २०४४५.७४ | ४६००४.७८ | ------ | १३७४४९.२७ |
| २०१६-१७ | ८३९६३.१९ | ३९०४२.६ | ५५६५७.०१ | १८६५.७४ | १८०५२८.५४ |
| २०१७-१८ | १०७९४७.१९ | ४९५४५.११ | ६९१६६.६४ | २७०१८.१६ | २५३६७७.१ |
| २०१८-१९ | ११७२८१.८५ | ६४०३७.२५ | ९३२६५.३४ | ४७१३६.७५ | ३२१७२२.७९ |
| २०१९-२० | ११७७२९ | ९१७८० | ८७४६८ | ४०५१८ | ३३७४९५ |
| २०२०-२१ | १२९९१५ | ९३६१३.२ | ६६२४८.०८ | ३१९८३.१७ | ३२१७५९ |


**स्त्रोत :** वार्षिक अहवाल २०१५-१६ ते २०२०-२१, mudra.org.in.

**तक्ता क्र. ३: मुद्रा योजनेअंतर्गत विविध सामाजिक प्रवर्गातील बँक खाती आणि कर्जमंजुरी (२०२०-२१)**

| बँक खात्याची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **सामाजिक प्रवर्ग** | **शिशू** | | **किशोर** | | **तरुण** | | **एकूण** |
| | **बँक खाती** | **टक्केवारी** | **बँक खाती** | **टक्केवारी** | **बँक खाती** | **टक्केवारी** | **बँक खाती** |
| सामान्य वर्ग | १९११९२७१ | ४८ | ५८३३६६९ | ६१ | ९२१७५९ | ८६ | २५८६४६९९ |
| अनुसूचित जाती | ७३३४८२८ | १८ | १०३८९४७ | ११ | २४६४२ | २ | ८३९८४१७ |
| अनुसूचित जमाती | २६६२७२७ | ७ | ४४३५९८ | ५ | १६९५७ | २ | ३१२३२८२ |
| इतर मागास वर्ग | ११०७३२८९ | २८ | २१६९९४६ | २३ | १०५४१३ | १० | १३३४८६४८ |
| **एकूण** | **४०१८०११५** | **१००** | **९४८६१६०** | **१००** | **१०६८७७१** | **१००** | **५०७३५०४६** |

| कर्जमंजुरी (कोटी रुपये) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **सामाजिक प्रवर्ग** | **शिशु** | | **किशोर** | | **तरुण** | | **एकूण** |
| | **कर्जमंजुरी** | **टक्केवारी** | **कर्जमंजुरी** | **टक्केवारी** | **कर्जमंजुरी** | **टक्केवारी** | **कर्जमंजुरी** |
| सामान्य वर्ग | ५२१६४ | ४७.४ | ९४४२६ | ७१.३ | ६९३५३ | ८७.५ | २१५९४२ |
| अनुसूचित जाती | १९७१४ | १७.९ | ९४३० | ७.१ | १६८० | २.१ | ३०८२४ |
| अनुसूचित जमाती | ७२१८ | ६.६ | ४३४४ | ३.३ | ११६८ | १.५ | १२७३० |
| इतर मागास वर्ग | ३०८५७ | २८.१ | २४३१७ | १८.४ | ७०८९ | ८.९ | ६२२६३ |
| **एकूण** | **१०९९५३** | **१००** | **१३२५१६** | **१००** | **७९२९०** | **१००** | **७९२९०** |

**स्त्रोत :** वार्षिक अहवाल २०२०-२१, mudra.org.in




**स्त्रोत :** वार्षिक अहवाल २०१५-१६ ते २०२०-२१, mudra.org.in

कर्जमंजूर करताना सामान्य वर्गातील लोकांना मागास वर्गाच्या तुलनेत अधिक झुकते माप दिल्याचे दिसून येते.

मुद्रा योजनेअंतर्गत श्रेणीनिहाय आणि सामाजिक प्रवर्गानुसार २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बँक खात्याची संख्या आणि मंजूर कर्ज याची माहिती तक्ता क्र. ३ मध्ये देण्यात आली आहे. तक्ता क्र. ३ मधील आकडेवारीवरून असे दिसून येते की, शिशु या श्रेणीमध्ये बँक खात्याची संख्या आणि कर्जमंजुरी यांच्यात सामाजिक प्रवर्गानुसार समतोल साधण्यात आला आहे. या श्रेणीत सामान्य प्रवर्गासाठीची ४८% बँक खाती उघडण्यात आली असून, कर्जमंजुरीचे प्रमाण ४७.४% आणि मागास प्रवर्गासाठी ५२% खाती उघडण्यात आली असून, कर्जमंजुरीचे प्रमाण ५२.६% आहे. परंतु किशोर आणि तरुण श्रेणीत बँक खात्याची संख्या आणि कर्जमंजुरी करताना मागास प्रवर्गाच्या तुलनेत सामान्य प्रवर्गाला अधिक प्राधान्य दिल्याचे दिसून येते. किशोर श्रेणीतील बँक खात्याच्या ६१% खाती आणि कर्जमंजुरीच्या ७१.३% कर्ज सामान्य प्रवर्गाचे आहेत. तसेच तरुण श्रेणीतील बँक खात्याच्या ८६% खाती आणि कर्जमंजुरीच्या ८७.५% कर्ज सामान्य प्रवर्गाचे आहेत. याचाच अर्थ, बँकांनी मुद्रा योजनेअंतर्गत खाती उघडताना आणि कर्ज मंजूर करताना सामान्य प्रवर्गास अधिक प्राधान्य दिले आहे.

**सारांश:**

भारतासारख्या भौगोलिक आणि लोकसंख्येच्या दृष्टीने विशाल असणाऱ्या देशात रोजगार संधीत वाढ करणे हे शासनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. संघटित क्षेत्रातील मोठ्या आणि मध्यम उद्योगाकडून रोजगार निर्मितीत होणारी वाढ भांडवली गुंतवणुकीच्या तुलनेत खूपच अल्प आहे. परंतु लघु, कुटीर, घरगुती उद्योगाची रोजगार निर्मिती आणि राष्ट्रीय उत्पादनात महत्त्वाची भूमिका आहे. असे असले तरी बँका आणि वित्त संस्थांनी या उद्योगांना आवश्यक तेवढा कर्जपुरवठा केलेला विविध अभ्यासातून दिसून येते. असंघटित क्षेत्रातील उद्योगांचा विकास करावयाचा झाल्यास त्यांना बँक आणि वित्त संस्थांकडून पुरेसा कर्जपुरवठा होणे गरजेचे आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजना ही अशा उद्योगांच्या माध्यमातून देशाचा जलद आर्थिक विकास साधण्याबरोबरच रोजगार निर्मितीत वाढ करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत २०१६-२०२१ या सहा वर्षांच्या काळात अंदाजे ३० कोटी बँक खाती विविध बँका

आणि वित्त संस्थांकडे उघडण्यात आली. तसेच १५ लाख कोटींपेक्षा अधिक कर्ज मंजूर करण्यात आली आहे. परंतु मुद्रा बँक खाती आणि कर्जमंजुरी याचा सापेक्षतेने विचार केला असता असे दिसून येते की, या योजनेअंतर्गत सरासरी केवळ रु. ५२,५०० एवढे अल्प कर्ज मंजूर करण्यात आले असून, जो स्वयंरोजगार निर्मिती करण्यात अपुरा ठरतो. यातील शिशु गटासाठी मंजूर कर्जाची सरासरी रु. २५,९१० इतकी अल्प आहे. त्यामुळे या योजनेचे अपेक्षित परिणाम अर्थव्यवस्थेत दिसून येत नाहीत. अशावेळी सरकारने योजनेच्या विस्ताराऐवजी त्याच्या यशावर लक्ष्य केंद्रित करून कर्ज मर्यादा वाढवल्यास त्याचे दीर्घकालीन आणि शाश्वत लाभ दिसून येतील असे वाटते.

**संदर्भसूची:**


1. Agrawal & Dwivedi, (2017), “Pradhan Mantri Yoajna: A Critical Review”, Parikalpana - KIIT Journal of Management, December 2017, PP. 97-106 at https://ksom.ac.in/wp-content/uploads/2018/01/97-106-PRADHAN-MANTRI-MUDRA-YOJNA.pdf on 30/06/2022.
2. Annual Report 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20 & 2021-22 at https://www.mudra.org.in/PMMYReport pdf on 10 July 2022.
3. C. Skinner, (2005), “Constraints to growth and employment in Durban: evidence from the normal economy”, School of Development Studies, University of KwaZulu-Natal, Durban, Research Report No. 65. 2005.
4. GOI, (2022), “Annual Report 2020-21, 2021-22”, Ministry of Micro, small and Medium Enterprises, New Delhi.
5. Ibrahim, (2018), “An empirical study on the role of MUDRA Yojana in financing micro enterprises”, Indian Journal of Economics and Development, Vol 6 (10), October 2018.
6. IFC, (2018), “Financing India’s MSMEs- Estimation of Debt requirement of MSMEs in India”, International Finance Corporation, World Bank Group, November 2018.
7. J. Morduch, (1999), “The microfinance promise. Journal of Economic Literature.” , Journal of Economic Literature Vol. XXXVII, Decmber 1999, pp. 1569–161.
8. Mahajan Y., (2019), “A Study and Review of Pradhan Mantri Mudra Yojana (PMMY) in the State of Maharashtra” International Journal of Advance and Innovative Research, Volume 6, Issue 2 (XVII): April - June, 2019.


◆

निधीच्या नावाखाली वंशजांनी दिलेला पैसा खर्च करण्याचे तत्व मात्र मोठ्या प्रमाणावर फसवणूक करणारे आहे.

**- थॉमस जेफरसन**

# पेणच्या आर्थिक विकासातील गणपती कारखान्यांचे योगदान आणि रोजगारसंधींचा चिकित्सक अभ्यास

**बी.एस.पाटील**[†]

**प्रस्तावना :**

भारतातील महाराष्ट्र राज्य हे गणपती पूजक मानले जाते. याशिवाय कोणत्याही कार्यक्रमाचा प्रारंभ बहुतांश वेळेला गणेश पूजनाने केला जातो. गुजरात आणि मथुरेला कृष्ण भक्त आहेत. उत्तराखंड आणि काशी येथे शिवभक्त आहेत. साऊथला तिरुपती बालाजींची उपासना करतात. आपण वेदकाळापासून गणपतीची उपासना करतो. वेदकाळापासून लोक स्वतःच्याच अंगणातील माती घेऊन, त्या मातीपासून तळहाताएवढा गणपती बनवायचे आणि पुजायचे, एक दीड दिवसानंतर त्या गणपतीचे विसर्जन करायचे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी लोकमान्य टिळकांनी गणपती उत्सवाला प्राधान्य दिले. पुणे येथे कसबा पेठ, हलवाई पेठ विविध मानाचे गणपती त्यानंतर धुळे, मुंबई, औरंगाबाद, लालबागचा गणपती स्थापनेची परंपरा चालू झाली. सार्वजनिक गणेशोत्सव सर्वांना आवडला. व्यापार वाढला, परिणामी जास्त कारखाने सुरू झाले. पेणचे महत्त्व असे की, मुंबई आणि पुणे या दोन मोठ्या बाजारपेठा जवळ असल्यामुळे उद्योगाला चालना मिळाली.

पेणच्या गणपती कारखान्याचे आद्य कारखानदार कै. भिकाजीराव बांदिवडेकर होते. १८९० सालापासून पेणमध्ये गणेशमूर्ती तयार करण्याचा व्यवसाय सुरू केला. १९०० मध्ये 'मुंबई' येथे एक कारखाना सुरू करून व्यवसायाची व्याप्ती वाढवली. त्यानंतर १९०१ साली कै. बाळू चितारी उर्फ बाळू काका मोडक यांनी त्यांचा छोटासा मूर्तीचा कारखाना पेणमध्ये स्थापन केला. या दोन्ही कारखान्यांनी छोट्या-मोठ्या मूर्ती तयार करण्यास सुरुवात केली आणि पेण येथे गणेशनगरचा पाया घातला गेला. १८५२ साली कै. गजानन बांदिवडेकर यांनी एअर इंडियाच्या महाराजांचे मॉडेल बनविले आणि पेणची मूर्तिकला जगभर पसरली. १९२७ पासून सतत ६० ते ६५ वर्षे गणपतीचा व्यवसाय केला. पेणची मूर्तिकला देशाविदेशात देवधर बंधूंच्या कारखान्यामुळेच पोहोचली. पेणमधील गणपती मूर्ती बनवून त्याच्या विक्रीचा व्यवसाय सुमारे १२५ वर्षांपूर्वी कै. भिकाजी कृष्णा देवधर यांनी सुरू केला होता. श्रीकांत देवधर हे त्यांच्या घराण्यातील होते ते सध्या कल्पना कलामंदिरचे कारखानदार आहेत. तसेच गणेश मूर्तिकार आणि

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख आणि कला विद्या शाखा प्रमुख, चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान, स्वायत्त महाविद्यालय, नवीन पनवेल - रायगड
आजीव सदस्य क्र. ११७८ , भ्रमणध्वनी : ९२२१५७९७८१, ई-मेल : bspatil1977@gmail.com

व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष आहेत. कै. बंडोपंत जाधव हे अल्पावधीत लोकप्रिय झालेले कारखानदार होते. त्यांनी मूर्तिकला ही फक्त बघूनच आत्मसात केली होती.

**माहिती संकलनाचे स्त्रोत :**

पेण येथील १० गणपती कारखान्यांना स्वतः भेट देऊन कारखाना मालक आणि कामगारांशी केलेल्या चर्चेतून अनुसूचीच्या साहाय्याने माहिती प्राथमिक तथ्यांच्या साहाय्याने संकलित केली आहे. या विषयाची माहिती संकलित करण्यासाठी वर्तमानपत्रे, पुस्तके, वेब साईड्स इ. चा द्वितीय तथ्य संकलन स्त्रोत म्हणून वापर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. पेणमधील गणपती कारखान्यांमुळे निर्माण झालेल्या रोजगारनिर्मितीचा अभ्यास करणे.
२. गणपती कारखाना उद्योगातील कामगारांच्या राहाणीमानाच्या दर्जाचे निरीक्षण करणे.
३. गणपती कारखान्यातील मूर्तिकार आणि कलाकार / कामगार यांच्या वाढत्या संख्येचा आढावा घेणे.
४. पेणच्या आर्थिक विकासातील गणपती कारखान्यांचे योगदान अभ्यासणे.
५. परंपरागत गणपती उद्योगांची सद्यस्थिती अभ्यासणे.

**गणपती कारखान्यांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती:**


खालील तक्ता क्र. १ मध्ये, १० गणपती कारखान्यांच्या साहाय्याने २०१८ - १९ आणि २०१९ - २० या दोन वर्षातील कामगारांना प्राप्त झालेल्या रोजगार संधीचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर मिळालेल्या माहितीच्या आधारे कायमस्वरूपी आणि अस्थिर कामगार यांची दोन्ही वर्षातील आकडेवारी दिलेली आहे. त्याचबरोबर मिळालेल्या माहितीच्या साहाय्याने जोड स्तंभालेख काढला आहे.

**तक्ता क्र. १ : गणपती कारखान्यांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती (२०१८-१९ व २०१९-२०)**

| अ.क्र. | गणपती कारखान्याचे नाव | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१८ - १९ | | २०१९ - २० | |
| | | कायमस्वरूपी कामगार | अस्थिर कामगार | कायमस्वरूपी कामगार | अस्थिर कामगार |
| १ | भूमी कला केंद्र | ०७ | ०० | १० | ०० |
| २ | नवरंग कॉलेज इंडस्ट्रीज | १२ | ०० | १६ | ०० |
| ३ | गणेश मूर्ती चित्रशाळा | १७ | ०० | २० | ०० |
| ४ | त्रिमूर्ती कला केंद्र | १४ | ०६ | १६ | ०६ |
| ५ | गणेश मूर्ती कला केंद्र | १८ | ०० | १७ | ०२ |
| ६ | संध्या कला केंद्र | १३ | ०० | १४ | ०२ |
| ७ | ओमकार कला केंद्र | ०७ | ०१ | ०७ | ०१ |
| ८ | मंगलमूर्ती कला केंद्र | ०५ | ०१ | ०६ | ०२ |
| ९ | गणेश आयडॉल फक्टरी | ०९ | ०० | १० | ०० |
| १० | त्रिमूर्ती कला केंद्र | ३५ | ०० | ४० | ०० |
| | **एकूण** | **१३७** | **०८** | **१५६** | **१३** |

**स्त्रोत :** लेखकाचे गणन

**आकृती क्र. १ : गणपती कारखान्यातील कायम स्वरुपी व अस्थिर कामगार**





स्तंभालेखामधील आडव्या अक्षावर १,२,३...१० हे प्रामुख्याने तक्ता क्र. १ मधील गणपती कारखान्यांची नावे असून, उभ्या अक्षावर कायमस्वरूपी व अस्थिर कामगारांची संख्या विचारात घेतली आहे. स्तंभालेखावरून असे निदर्शनास येते की, २०१८-१९ मध्ये कायमस्वरूपी कामगार संख्या १३७ तर अस्थिर कामगारांची संख्या ८ इतकी असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर २०१९-२० मध्ये यामध्ये वाढ होऊन ती, कायमस्वरूपी कामगार संख्या १५६ तर अस्थिर कामगारांची संख्या १३ इतकी झाली. म्हणजेच थोडक्यात गणपती कारखान्यांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले. याशिवाय गणपती कारखान्यांचे मालक कायमस्वरूपी कामगारांना कामावर ठेवण्यास अधिकाधिक भर देत असल्याचे निदर्शनास आले. अस्थिर कामगारांना रोजंदारीवर कामावर घेऊन त्यांची गणपती कारखान्यात ये-जा चालू राहाते.

**तक्ता क्र. २ : कामगारांना दिले जाणारे २०१९ - २० मधील मासिक वेतन (००० रु.)**

| वेतन (००० रुपये) | कामगारांची संख्या |
|---|---|
| १०,००० पेक्षा कमी | २४ |
| १०,००० - २०,००० | ५९ |
| २०,००० पेक्षा जास्त | ८६ |
| **एकूण (कायमस्वरूपी + अस्थिर कामगार)** | **१६९** |

**स्त्रोत :** लेखकाचे गणन




वरील वर्तुळामध्ये २०१९-२० सालच्या गणपती कारखान्यांमधील कामगारांना दिले जाणारे मासिक वेतन दर्शविलेले आहे. यामध्ये १४.२०% वर्तुळाचा दर्शविलेला भाग २०१९ - २० मधील २४ कामगारांना साधारणपणे १०००० रु. पेक्षा कमी वेतन देऊन कामावर घेतले जाते हे दाखवितो. यामध्ये प्रामुख्याने अस्थिर कामगारांचा समावेश होतो, तर ३४.९१% वर्तुळाचा भाग रु. १०००० - २०००० च्या दरम्यान मासिक वेतन मिळणाऱ्यांची संख्या ५९ इतकी आहे हे दाखवितो. तर ५०.८८% वर्तुळाचा भाग रु.२०००० पेक्षा अधिक उत्पन्न मिळणाऱ्या कामगारांची संख्या ८६ आहे हे दाखवितो. यावरून अधिक उत्पन्न देणाऱ्या कामगारांची संख्या अधिक असल्याचे निदर्शनास आले. पण कामगारांशी वैयक्तिकपणे चर्चा केली असता कामगार मासिक वेतनाबाबत समाधानी नसल्याचे निदर्शनास आले. त्याचबरोबर बहुतांश कामगारांनी अधिक वेतनाची अपेक्षादेखील व्यक्त केली.

तक्ता क्र. ३ मध्ये १० गणपती कारखान्यांनी मूर्तीचे उत्पादन चांगल्या पद्धतीने केले. दरवर्षी प्रत्येक कारखाना उत्पन्नाचे प्रमाण वाढवितो, त्याचबरोबर खर्च जसा वाढतो, तशी मूर्तीची किंमत देखील वाढते, त्यामुळे गणपती कारखाना मालकांच्या उत्पन्नात देखील वाढ होऊन, नफ्याचे प्रमाण देखील वाढत असल्याचे सर्वेक्षणावेळी निदर्शनास आले. पण मात्र कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे काही गणपती मूर्ती विक्री न झाल्याचे निदर्शनास आले. पेणमधील गणेशमूर्तीला मोठ्या प्रमाणावर विदेशातून विशेषतः दुबई, सिंगापूर, मॉरिशस, अमेरिका इत्यादी देशांतून देखील चांगली मागणी असल्याचे गणपती कारखाना मालकांनी सांगितले. मात्र विदेशातील व्यवहार हे प्रामुख्याने दलालांमार्फत केले जातात असे कारखाना मालकांनी सांगितले.

**गणपती कारखान्यांना भेडसावणाऱ्या समस्या :**

१. भूमीची कमतरता.

२. भांडवलाचा अभाव.

३. कुशल कामगारांचा अभाव.

४. गणपती कारखान्यांमधील वाढती स्पर्धात्मकता.

**शिफारशी आणि उपाययोजना :**

१. गणपती कारखानदारांनी उत्पादन खर्च कमी करावा, तसेच उत्पादन खर्चात अशा पद्धतीने काटकसर करावी की, जेणेकरून गणपती मूर्तीची पातळी आणि दर्जात घसरण होणार नाही; तसेच आवश्यक त्या ठिकाणी खर्चात काटकसर गणपती कारखानदारांनी करावी.

**तक्ता क्र. ३ : २०१९-२० मधील १० गणपती कारखान्यातील उत्पन्न - खर्च**

| अ.क्र | गणपती कारखान्याचे नाव | उत्पादित गणपती मूर्ती संख्या (हजार) | एकूण उत्पन्न (लाख रु.) | एकूण खर्च (लाख रु.) | नफा (लाख रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | भूमी कला केंद्र | १०,००० | १४,००,००० | १२,००,००० | २,००,००० |
| २ | नवरंग कॉलेज इंडस्ट्रीज | १५,००० | २१,००,००० | १५,००,००० | ६,००,००० |
| ३ | गणेश मूर्ती चित्रशाळा | २०,००० | २४,००,००० | २,००,००,००० | ४,००,००० |
| ४ | त्रिमूर्ती कला केंद्र | २०,००० | २६,००,००० | २२,००,००० | ४,००,००० |
| ५ | गणेश मूर्ती कला केंद्र | १८,००० | २०,००,००० | १८,००,००० | २,००,००० |
| ६ | संध्या कला केंद्र | १६,००० | १९,००,००० | १७,००,००० | २,००,००० |
| ७ | ओमकार कला केंद्र | ९,००० | १२,००,००० | ९,००,००० | ३,००,००० |
| ८ | मंगलमूर्ती कला केंद्र | ६,००० | १०,००,००० | ६,००,००० | ४,००,००० |
| ९ | गणेश आयडॉल फक्टरी | १०,५०० | १३,००,००० | १०,००,००० | ३,००,००० |
| १० | त्रिमूर्ती कला केंद्र | ४०,००० | ४८,००,००० | ४०,००,००० | ८,००,००० |

**स्रोत :** लेखकाचे गणन

२. मागील वर्षी एकूण किती गणपती मूर्तींची विक्री झाली होती, याचा विचार करून चालू वर्षात उत्पादन करावे. विक्रीसापेक्ष उत्पादन घेतल्यास गणपती मूर्ती कारखान्यात उत्पादनाचा साठा शिल्लक राहाणार नाही आणि उत्पादनाचा खर्च हा कमी होईल.

३. विशेषतः पेणच्या गणेशमूर्ती विकण्यासाठी जाहिरातीची आवश्यकता नाही, पण कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे विक्री अत्यंत अल्प झाली. त्यामुळे सध्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी कमीत कमी खर्चात पत्रके छापून वाटणे, त्याचबरोबर दूरदर्शनच्या विविध चॅनेलवर जाहिरात प्रदर्शित करणे, पेणचा गणपती आपला गणपती अशी जाणीव ग्राहकापर्यंत पोहचविणे. गणपती खरेदीसाठी त्याद्वारे ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नवनवीन कल्पकता अमलात आणणे.

४. दिवसेंदिवस वाढत्या तंत्रज्ञानाचा वापर करून, ऑनलाईन विक्री करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

१. पेणमधील गणपती मूर्ती कारखान्यांमुळे दरवर्षी रोजगारनिर्मितीत वाढ होत आहे.

२. गणपती मूर्ती कारखाना उद्योगांतील कामगारांची उत्पन्न पातळी वाढत असल्याने राहाणीमानात देखील सुधारणा होत आहे.

३. गणपती मूर्ती उद्योगातील मूर्तिकार आणि कलाकार यांच्या संख्येत वाढ होत आहे.

४. पेणच्या आर्थिक विकासात वाढ करण्यासाठी गणपती कारखान्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

५. परंपरागत चालत आलेल्या गणपती कारखान्यांची व्याप्ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे.

**सारांश :**

पेणच्या आर्थिक विकासातील गणपती कारखान्यांचे योगदान आणि रोजगारसंधीचा चिकित्सक अभ्यास करताना असे लक्षात आले की, पेणमध्ये जवळपास ५०० गणपती मूर्ती बनविण्याचे कारखाने असल्याचे

सांगण्यात आले. संशोधकाने ज्या १० कारखान्यांचा अनुसूचीच्या साहाय्याने अभ्यास केला त्यामध्ये २०१८ - १९ मध्ये कायमस्वरूपी आणि अस्थिर कामगारांची संख्या १४५, तर २०१९ - २० मध्ये कायमस्वरूपी आणि अस्थिर कामगारांची संख्या १६९ अशी होती. ५०० कारखान्यांचा विचार केल्यास कितीतरी कामगारांना /कलाकारांना अर्थप्राप्ती होत असेल. आपण गणेश उत्सव आनंदाने साजरा करतो, पण मात्र या उत्सवाच्या माध्यमातून कितीतरी लोकांना रोजगार मिळतो. पेणमधील कितीतरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे साधन गणेशमूर्तींचे उत्पादन हेच आहे. पण मात्र आज पनवेल, नवी मुंबईचा तुलनात्मक विचार करता पेणचा आर्थिक विकास झपाट्याने झालेला नाही; पण मात्र त्यांच्या तुलनेत मंदगतीने का होईना पेणचा आर्थिक विकास होतोय. पेणमध्ये कितीतरी उद्योगांनी आपले अस्तित्व प्रस्थापित केले आहे.

**संदर्भसूची :**


१) धारकर प्रभाकर आणि आणि धारकर शिशिरदादा (२००९), 'पेण शहराचा इतिहास', आनंद मुद्राणालय, गिरगांव, मुंबई.

२) BBC News (मराठी), १८ ऑक्टोबर २०२०

३) https : / / www.m- timesofindia.com.

४) http : / / www.maharshtratimes.com.


◆


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१०००/ - चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी, २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे १५ सप्टेंबर, २०२३ पर्यंत पाठवाव्यात. दिनांक २, ३ व ४ नोव्हेंबर, २०२३ रोजी वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे, येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# भारतातील सहकारी कृषी पतसंस्था

**आण्णा काका पाटील** †

**पुस्तकाचे नाव :** Agricultural Credit Co-operative in India
**लेखक :** प्रा. डॉ. वसंतराव जुगळे,
प्राचार्या डॉ. योजना जुगळे
**प्रकाशन :** स्टुडेरा प्रेस, नवी दिल्ली
**पृष्ठसंख्या :** २९४
**ISBN :** 978-93-85883-50-7

कृषी अर्थतज्ज्ञ प्राध्यापक डॉ. वसंतराव जुगळे आणि प्राचार्या डॉ. योजना जुगळे यांचे भारतातील कृषी सहकारी पतसंस्था (इंग्रजी) हे स्टुडेरा प्रेस नवी दिल्ली येथून प्रकाशित झालेला कृषी सहकारी पतव्यवस्थेवरील अद्ययावत व सर्वांगाने परिपूर्ण असा संदर्भ ग्रंथ नुकताच वाचून पूर्ण झाला.

या ग्रंथामध्ये लेखकद्वयांनी जगातील सर्वात मोठ्या ग्रामीण वित्तीय पद्धतीवर म्हणजे भारतीय कृषी सहकारी पतसंस्थांवर विविध १८ पैलूंच्या आधारे सविस्तरपणे प्रकाश टाकला आहे. त्यांनी या पुस्तकात आपल्या नेहमीच्या वाचन, चिंतन, मनन व संशोधन यातून कृषी आणि सहकार एकमेकांना पूरक असून ते विभक्त करता येणार नाहीत, उलट ग्रामीण भागात खोलवर रुजलेल्या समस्या सोडविण्यासाठी सहकार हाच पर्याय असल्याचे लेखकांनी नम्रपणे पण आग्रहाने सांगितले आहे.

कृषी आणि सहकार एकमेकांशी जोडलेले आहेत. जगातील बहुतेक कृषिप्रधान देशांमध्ये या दोघांना जुळे असे संबोधले जाते. लेखकांच्या मते, सहकारी प्रतिमान (Model) भिन्न कृषी वातावरणात कार्य करते. यास विकसनशील देशांमध्ये समस्या सोडवण्याची युक्ती म्हटले जाते. शतकानुशतके कृषिक्षेत्र ही एक दोलायमान व्यवस्था आहे. भारतीय शेती मान्सूनवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे शेती करण्यामध्ये वारंवार अनिश्चितता व अपयश आल्यामुळे शेतीकरिता भांडवल म्हणून संस्थात्मक स्त्रोताशिवाय गैर संस्थात्मक उपलब्ध स्त्रोतांकडून कर्ज घेण्यास भाग पाडले जाते. भारतातील ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा अनादी काळापासून आहे. ब्रिटिश राजवटीत ही व्यवस्था अतिशय गुंतागुंतीची व अवघड बनली होती. त्यामुळे सहकारी संस्था अस्तित्वात आल्याचे लेखकांनी संदर्भसह नमूद केले आहे. लेखकद्वयांनी ग्रामीण भागातील समस्या सोडवण्यासाठी १०० वर्षांहून जुन्या असलेल्या कृषी सहकारी संस्था अधिक सुसज्ज असल्याचा संशोधनात्मक विश्वास व हमी दिली आहे.

ग्रंथाच्या प्रारंभीच्या भागांमध्ये लेखकांनी सामूहिक कृती सिद्धांत आणि सहकार यांची अनोखी सांगड घातली आहे. सहकार या शब्दाच्या उगमापासून

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज (स्वायत्त) कराड.
आजीव सभासद क्र. : ११९६, भ्रमणध्वनी : ९८२२२४९०८२, ई-मेल : akpatilpune@gmail.com

सहकारी संस्था स्थापनेचा हेतू, सामूहिक कृतीचा पारंपारिक दृष्टिकोन अतिशय समर्पकपणे सोदाहरणासह वाचकांपुढे मांडला आहे. येथे भारतीय सहकारी चळवळीची सैद्धांतिक पार्श्वभूमी मांडून लेखकांनी पुढे सामूहिकता हा समाजाच्या भूतकाळाचा तसेच मानवतेच्या वर्तमान जीवनाचा आग्रह होता. सहकारी संस्थांचे समांतर संस्थांशी तसेच वरच्या पातळीवरील संस्थांशी दुवे असतात. भारतातील सहकार हा सामान्य मानवतेच्या विविध प्रकारच्या आर्थिक क्रियांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे, म्हणून लेखकांनी पहिल्या घटकाच्या निष्कर्षामध्ये असे नमूद केले आहे की, सामाजिक आर्थिक संस्थांचे विकासातील योगदान आधुनिक काळातही कमी लेखता येणार नाही.

या ग्रंथामध्ये वेद, इस्लाम धर्म, बायबल मधील व्यावसायिक उपक्रमांमध्ये सहकाराचा स्पष्ट उल्लेख असल्याचे संदर्भासह स्पष्ट करून सहकाराचा आत्मा खरंतर मानवी परस्पर संवाद आणि आंतरक्रियांच्या आर्थिक तरकाशी संबंधित असल्याचे लेखकांनी ठणकावून प्रतिपादन केले आहे. सहकार हा सामाजिक आहे; कारण व्यक्तीचे एकसंध गट एकत्रितपणे परस्परांना लाभ देण्यासाठी एकत्र येतात कुटुंब, समाज, प्रदेश व राष्ट्र हे सहकाराचे स्वरूप ओळखतात. अशा प्रकारे सहकार हा सैद्धांतिक कट्टरतेपेक्षा एक व्यवहारिक साधन आहे यावर लेखकद्वय विचारांती ठाम आहेत. ब्रिटिश भारतापासून स्वातंत्र्यापर्यंत व त्यानंतरही उदारीकरणापर्यंतच्या कालावधीत कृषी संकट, विविध कायद्यामधील अपुरेपणा, सहकारी चळवळ, सहकारी पतचळवळ, ग्रामीण संस्थांची उभारणी कशा पद्धतीने झाली यावर भिन्न सहकार विषयक समित्यांचा आढावा घेऊन विवेचन झाले आहे. उदारीकरणानंतरच्या कालावधीतील भारतीय सहकारी पतव्यवस्थेचे चित्र लेखकांनी आकडेवारीच्या स्वरूपात या ग्रंथाद्वारे वाचकांच्या डोळ्यांसमोर केले आहे. या ग्रंथाच्या उत्तरार्धात सहकारी संस्थाकरिता नवसंस्थात्मक प्रतिमान वाचनास येते: यामध्ये सहकार विचारांची शाळा (स्कूल ऑफ को-ऑपरेटिव्ह थॉट्स), सहकाराची ओळख मूल्ये व तत्त्वे, सहकारी पतव्यवस्थेची पुनर्रचना करण्याचा आग्रह सामूहिक कृतीद्वारे आर्थिक पुढाकार या बाबींद्वारे प्रतिमान कार्य करीत राहाते.

लेखकांनी सहकाराबाबत राजकीय चिंतन व सामाजिक शूरता यावर भर देत या ग्रंथात सहकारातील नवी क्षितिजे, अचूक निदान शेती, करार शेती, गट शेती व गट विपणन या बाबींची माहिती देऊन वाचकांना वैयक्तिक संगणक, उपग्रह स्थिती प्रणाली, भौगोलिक माहिती प्रणाली, स्वयंचलित मशीन मार्गदर्शन व रिमोट सेन्सिंग उपकरणे इत्यादी वापराने कृषी विकास करण्याचे सुचवले आहे. कृषी पतव्यवस्था, कृषी विपणन, सहकार आदि क्षेत्रांमध्ये जीवनभर संशोधन व चिंतन चालू ठेवले आहे. निवृत्तीनंतरही सरांनी लेखनातून कृतिशील कृषी अर्थतज्ज्ञ असल्याचे दाखवले आहे.

अनेक वाचनीय ग्रंथाचे लेखन मराठी व इंग्रजी भाषेतून स्थानिक पातळीपासून जागतिक स्तरावरच्या प्रश्नाबाबत केल्याचे दिसून येते. हा ग्रंथ कृषी पतव्यवस्थेवरील संदर्भ साहित्यातील मैलाचा दगड ठरणारा आहे. प्रत्येक कृषी अभ्यासकाने प्रस्तुत ग्रंथ आपल्या संग्रही ठेवावा असे आग्रहाने सुचवावे वाटते.

◆

चरखा ही हिंदुस्थानची कामधेनू आहे.

**- महात्मा गांधी**

# मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण

**पुरुषोत्तम विष्णुपंत देशमुख** †

**अर्थ व इतिहास :**

मानवी भांडवल ही अतिशय गुंतागुंतीची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटना आहे. मानवी घटकाची उत्पादन किंवा उपयोगिता निर्मितीतील भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे अनेक विचारवंतांनी सिद्ध केलेले आहे. केवळ उत्पादनाचा एक घटक म्हणून मानवी घटकाकडे न पाहाता मानवी परिप्रेक्ष्यातही या घटकाचा विचार करावा लागतो. उत्पादनाचे घटक कोणते व किती? यावर बराच काळ विचारवंतांमध्ये सखोल चर्चा होत असताना मानवी भांडवलाची भूमिका अधोरेखित होताना दिसते. रानटी अवस्थेपासून ते प्रगत अवस्थेपर्यंत झालेला प्रवास हा मानवाचे वेगळेपण किंवा श्रेष्ठत्व सिद्ध करतो. ॲडम स्मिथ यांनी १७७६ मध्ये 'राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप व तिची कारणमीमांसा' या प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात मानवी क्षमतांचे विश्लेषण केलेले आहे. ॲडम स्मिथने मानवी भांडवल हा शब्द प्रत्यक्ष वापरला नसला, तरी त्यांनी मानवी भांडवलाचा अभ्यास करण्याचा मार्ग मोकळा केला. व्यक्तींनी शिकलेले आणि वापरलेले कौशल्य हे राष्ट्राच्या संपत्तीचे आणि आर्थिक विकासाचे प्राथमिक स्रोत आहेत यावर त्यांनी भर दिला. या ग्रंथात ॲडम स्मिथ यांनी राष्ट्राच्या संपत्तीचे ज्ञान, प्रशिक्षण, प्रतिभा, अनुभव इत्यादींच्या अनुषंगाने विश्लेषण करून उत्पादन किंवा संपत्तीत वाढ करण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षणाची भूमिका विषद केली होती. मूल्यनिर्मिती कोणत्या घटकामुळे होते? या प्रश्नाच्या शोधार्थ अनेकांनी वेगवेगळी मते मांडली. भांडवलरूपी संचित श्रम व प्रचलित श्रम अशा एकूण श्रमामुळे मूल्यनिर्मिती होत असल्याचे कार्ल मार्क्स यांनी सिद्ध केले. नंतर इ.स. १९२० मध्ये आल्फ्रेड मार्शल यांनी 'अर्थशास्त्राची तत्त्वे' या ग्रंथात मानवी भांडवलामधील गुंतवणुकीचे दीर्घकालीन स्वरूप आणि ते बनवण्यात कुटुंबाची भूमिका यांचे वर्णन केले. याव्यतिरिक्त, मार्शल यांनी गैर-मौद्रिक घटक समाविष्ट करण्यासाठी मानवी भांडवलावरील परताव्याच्या संकल्पनेचा विस्तार केलेला दिसून येतो. अलीकडच्या काळात हा शब्द उत्पादित वस्तूंच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या श्रमांचे वर्णन करण्यासाठी वापरला जात असे. परंतु सर्वात आधुनिक सिद्धांताचा वापर गॅरी बेकर आणि थिओडोर शुल्त्झ यांच्यासह अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केला होता. त्यांनी १९६० मध्ये मानवी क्षमतेचे मूल्य प्रतिबिंबित करण्यासाठी या शब्दाचा वापर केला. शुल्त्झ यांच्या मते, उत्पादनाची गुणवत्ता आणि पातळी सुधारण्यासाठी

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
आजीव सभासद क्र. : ९६२, भ्रमणध्वनी : ९४०३७६१६१३, ई-मेल : pudeshmukh.economics@bamu.ac.in

मानवी भांडवल इतर कोणत्याही प्रकारच्या भांडवलाप्रमाणेच आवश्यक असून यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण आणि वर्धित लाभामध्ये गुंतवणूक करणे आवश्यक असते. कारण बौद्धिक आणि मानवी भांडवलाला उत्पादकतेचे अक्षयस्रोत मानले जाते. मानवी भांडवल हा शब्द कामगारांच्या अनुभवाचे आणि कौशल्याचे आर्थिक मूल्य सूचित करतो. मानवी भांडवलामध्ये शिक्षण, प्रशिक्षण, बुद्धिमत्ता, कौशल्ये, आरोग्य आणि नियोक्त्याची निष्ठा आणि वक्तशीरपणा इत्यादींचा समावेश होतो. मानवी भांडवलाची उत्पादनातील महत्त्वाची असलेली भूमिका अधोरेखित होत असताना काही विचारवंतांनी या विश्लेषणावर आक्षेप नोंदविले. मानवी भांडवल थेट उत्पादकता वाढवते यावर काही अर्थशास्त्रज्ञांनी असहमती नोंदविली. इ. स.१९७६ मध्ये, हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञ रिचर्ड फ्रीमन यांनी असा युक्तिवाद केला की, मानवी भांडवल केवळ प्रतिभा आणि क्षमतेचे संकेत म्हणून काम करते, खरी उत्पादकता नंतर प्रशिक्षण, प्रेरणा आणि भांडवली उपकरणे यांद्वारे येते. मानवी भांडवल हा उत्पादनाचा घटक मानू नये, असा निष्कर्ष रिचर्ड फ्रीमन काढला. मार्क्सियन अर्थशास्त्रज्ञ सॅम्युअल बॉवेल्स आणि हर्बर्ट गिंटिस यांनी मानवी भांडवलाच्या सिद्धांताविरुद्ध युक्तिवाद केला. त्यांच्या मते, 'मानवाला म्हणजे कामगाराला भांडवलामध्ये बदलणे म्हणजे मालक -कामगारामधील वर्गसंघर्ष आणि कामगारांच्या अधिकारांना सशक्त करण्याची आवश्यकता' या युक्तिवादाला कमी लेखणे होय.

इ.स.१९८० आणि इ.स १९०० च्या दशकात, वर्तनात्मक अर्थशास्त्राच्या उदयासह, मानवी भांडवलाच्या सिद्धांतावर नवीन भाष्य केले गेले ज्यामध्ये ते मानवी वर्तन तर्कसंगत असते या गृहीतकावर अवलंबून होते. म्हणून, मानवी भांडवल सिद्धांत जेव्हा घटनांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करेल तेव्हा समान दोष आणि मर्यादा अनुभवेल. कारण मानवी हेतू, उद्दिष्ट्ये आणि निर्णयांवरील त्याची मूलभूत गृहीतके वास्तविक ठरत नाहीत. समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञांची आधुनिक टीका मानवी भांडवलाच्या सिद्धांताविरुद्ध तर्क लावते. त्यांच्या मते, या अत्यंत साध्या तत्त्वातून प्रत्येकाच्या वेतनाचे सदैव किंवा वैश्विक मानवी भांडवल, उत्पादकता आणि उत्पन्न यांच्यातील सार्वत्रिक संबंधाचे स्पष्टीकरण मिळते. परंतु जेव्हा संशोधक याकडे सूक्ष्मपणे पाहातात तेव्हा अनेक भागांसाठी व्यक्ती-व्यक्तीच्या उत्पादकतेतील फरक वस्तुनिष्ठपणे मोजला जाऊ शकत नाही.

हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञ क्लॉडिया गोल्डिन (२०१६) यांच्या मते लोकांमधील शिक्षणासारखी गुंतवणूक कामगारांची उत्पादकता आणि कौशल्य वाढवते या गृहीतावर काही विचारवंत मानवी भांडवलाची व्याख्या करतात. या सिद्धांतानुसार व्यक्तीच्या शिक्षणाचा संबंध त्याच्या ज्ञान मिळविण्याच्या इच्छेशी असून त्याच्या मानवी भांडवलात धनात्मक परिणाम होतो. म्हणून हा सिद्धांत ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे. कारण तो सामान्य असल्याचे मानले जाते. कोरेस (२००८) यांनी असा युक्तिवाद केला की, मानवी भांडवलात गुंतवणुकीचा अभाव असल्यास गरीब देशांना श्रीमंत लोकांशी संपर्क साधण्यापासून प्रतिबंधित होतो. शैक्षणिक प्राप्ती आणि शिक्षणावरील सार्वजनिक खर्च यांचा आर्थिक विकासाशी सकारात्मक संबंध आहे. मानवी भांडवलाच्या सिद्धांतातील गृहीतकांचा शोध घेताना मानवी भांडवल सिद्धांत आणि ज्ञान अर्थव्यवस्था यांच्यातील संबंध अधिक स्पष्ट होतो.

ब्लंडेल्ल (१९९९) यांच्या मते, मानवी भांडवल सिद्धांत असे गृहीत धरते की, कौशल्ये आणि प्रशिक्षण मिळविण्यासाठी शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करणे

आवश्यक आहे. कारण त्यातून वैयक्तिक भांडवल वाढते. टॅन (२०१४) यांच्या मते, ज्ञान आणि कौशल्ये कामाच्या ठिकाणी व्यक्तीची उत्पादकता वाढवतात. ही वाढलेली उत्पादकता व्यक्तीच्या वेतनात वाढ करते. कारण आदर्श श्रम बाजारात, व्यक्तीचे वेतन व्यक्तीच्या उत्पादकतेद्वारे निर्धारित केले जाते म्हणून शिक्षणाचे खाजगी लाभ आणि खाजगी खर्च समानता बिंदू मिळेपर्यंत लोक शिक्षणात गुंतवणूक करतील.

जागतिक बँके मानवी भांडवलाच्या संदर्भात सैद्धांतिक योगदान देत असल्याचे दिसते. जागतिक बँकेचे विविध कार्य गट या विषयाच्या अनुषंगाने संशोधन करत आहेत. ऑक्टोबर २०२२ पर्यंत, सर्व उत्पन्न स्तरावरील ८६ देश जागतिक बँक समूहासोबत त्यांच्या मानवी भांडवलाचे परिणाम बदलण्यासाठी धोरणात्मक दृष्टिकोनावर काम करत होते. या जागतिक बँकेच्या अभ्यास गटाने मानव भांडवल निर्देशांक (Human Capital Index) प्रसिद्ध केलेला दिसून येतो.

मानव भांडवल निर्देशांक (ह्युमन कॅपिटल इंडेक्स -HCI) कामगारांच्या पुढच्या पिढीच्या उत्पादकतेमध्ये आरोग्य आणि शिक्षणाचे योगदान मोजतो.

**मानवी भांडवलाचे वर्गीकरण:**

मानवी भांडवल म्हणजे एखाद्या राष्ट्रामधील कौशल्ये, क्षमता, शिक्षण, प्रशिक्षण आणि ज्ञानाचा साठा होय. मानवी संसाधनांमधून अधिक मानवी भांडवल तयार करण्यासाठी राष्ट्राला मानवी भांडवलामध्ये गुंतवणुकीची आवश्यकता अधिक असते. मानवी भांडवल विकास ही एक प्रक्रिया असून यामध्ये व्यक्ती, उद्योग संस्था आणि राज्य इत्यादी ज्ञान, कौशल्ये, क्षमता आणि निरोगी आरोग्य इत्यादींसाठी गुंतवणूक करतात व त्यातून श्रम उत्पादकता वाढ, रोजगार संरचना सुधार, महसूल वाढ आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा असे विविध घटक प्रभावित होतात.

मानवी संपत्ती अमूर्त स्वरूपात असून मानवी संसाधनांत तिची भूमिका महत्त्वपूर्ण असते. मानवी भांडवलाचे विविध पैलू लक्षात घेऊन मानवी भांडवलाचे विविध परिप्रेक्ष्यात वर्गीकरण केले जाते. मानवी भांडवलाचे विश्लेषण क्षेत्र कोणते आहे यावरून मानवी भांडवलाचा विचार केला जातो. मानवी भांडवला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, राजकीय, व्यवस्थापकीय, शैक्षणिक, भावनिक, आध्यात्मिक, बौद्धिक असे विविध पैलू असतात. काही विचारवंतांनी मानवी भांडवलाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

**१) बौद्धिक भांडवल :**

मानवी भांडवलाचा पहिला घटक म्हणजे बौद्धिक भांडवल ज्याची व्याख्या वैयक्तिक स्तरावर तसेच संस्थात्मक स्तरावर करता येते. वैयक्तिक स्तरावर, ते एखाद्या व्यक्तीचे ज्ञान, कौशल्ये आणि कौशल्याचा संदर्भ देते. हे विशेष ज्ञानकौशल्ये, स्पष्ट ज्ञान, संज्ञानात्मक जटिलता आणि शिकण्याची क्षमता या स्वरूपात असू शकते. संस्थात्मक स्तरावर, बौद्धिक भांडवलामध्ये संस्थेच्या सदस्यांकडे एकत्रितपणे असलेले ज्ञान, कौशल्ये, पेटंट, माहिती-तंत्रज्ञानावर आधारित माहिती किंवा कामाच्या विशेष प्रक्रियांसह संस्थेमध्ये अंतर्भूत किंवा मालकीचे असलेले ज्ञान आणि कौशल्य या दोन्हींचा समावेश असतो. 'अलीकडच्या काळात, बौद्धिक भांडवलाच्या या मुद्द्याकडे व्यवस्थापणाने बरेच लक्ष दिले आहे, त्यामुळे पैशाऐवजी ज्ञान हा मुख्य स्पर्धात्मक फरक बनत चालला असल्याचे' महत्त्वाचे निरीक्षण घोषाल यांनी नोंदविले.

**२. सामाजिक भांडवल :**

सामाजिक भांडवल हा मानवी भांडवलाचा दुसरा घटक आहे. हे भांडवल अंतर्गत आणि बाह्य दोन्ही संबंधांच्या रचनेतून प्राप्त होते. संस्थांच्या दृष्टिकोनातून हे सामाजिक भांडवल मानवी श्रृंखलेची रचना, गुणवत्ता आणि लवचिकता यांच्याशी संबंधित आहे. सामाजिक

भांडवलाचा दुसरा पैलू म्हणजे बाह्यशक्तींशी संबंधित असलेला पैलू होय. ग्राहक, पुरवठादार, सरकारी संस्था इत्यादींशी असलेल्या संबंधांतून या सामाजिक भांडवलाची निर्मिती होते.

**३. भावनिक भांडवल :**

भावनिक भांडवलामध्ये आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा, धैर्य, जोखीम घेण्याची क्षमता आणि लवचिकता यांचा समावेश होतो. 'करू शकतो' असा दृष्टिकोन यामध्ये प्रतिबिंबित होते. व्यक्तींना त्यांचे ज्ञान आणि नातेसंबंध प्रभावी कृतींमध्ये रूपांतरित करण्यासाठी आत्म-सन्मान, धैर्य आणि लवचिकता इत्यादींवर आधारित आत्मविश्वास आवश्यक असतो. अलीकडील काळात कंपन्या भावनिक भाग (EQ) विकसित करण्यात गुंतलेल्या दिसून येतात. कारण एखाद्या संस्थेतील व्यक्ती त्यांच्या बुद्धिमत्ता आणि तांत्रिक कौशल्यांपेक्षा परिणामकारकतेसाठी त्यांच्या भावनिक भांडवलावर अधिक अवलंबून असते. भावनिक भांडवल राग, द्वेष, निराशा, गोंधळ, दुःख इत्यादींसारख्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते, जे नोकरीच्या कामगिरीवर दूरगामी परिणाम करू शकते.

**४. आध्यात्मिक भांडवल:**

मानव संसाधन व्यवस्थापनातील अलीकडच्या काळात विकसित झालेली संकल्पना म्हणून आध्यात्मिक भांडवलाचे महत्त्व वाढते. बुद्धिमान भागफल (IQ), भावनिक भागफल (EQ) आधार घेतला जात असताना आता आध्यात्मिक भागफल (SQ) या संकल्पनेला महत्त्व आल्याचे दिसते . म्हणून काही व्यवस्थापकांच्या मते उच्च बुद्धिमान भागफल(IQ)असलेल्या व्यक्तीला कामावर घेतले जाऊ शकते; तर भावनिक भागफल (EQ) असलेल्या व्यक्तीला पदोन्नती मिळू शकते. आध्यात्मिक भांडवल हे बहु-दिशात्मक असते आणि त्यात मूल्ये आणि कामाचा दृष्टिकोन यांचा समावेश होतो. बहुतेक वाढत्या संघटनांचे असे मत आहे की, लोकांना शिकायला लावता येईल, त्यांची कौशल्ये विकसित करता येतील; परंतु जेव्हा मूल्ये, अहंकार आणि कामाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन येतो तेव्हा ते बदलले जाणे कठीण बनते. म्हणून, ज्यांची मनोवृत्ती, काम करण्याचा दृष्टिकोन संस्थेशी जुळतो त्यांना नियुक्त करणे इष्ट असते.

**मानवी भांडवलाचे मूल्य निर्धारण**

मानवी भांडवलाचे मूल्यांकन करण्यासाठी विविध पद्धती प्रचलित आहेत. संशोधनाचा हेतू काय आहे यावरून कोणती पद्धती वापरायची हे निश्चित करता येये. मानवी भांडवलाकडे कोणत्या परिप्रेक्ष्यात पाहिले जाते, यावरून केवळ खालीलच नव्हे तर अन्य पद्धतीने मानवी भांडवलाचे मूल्यांकन केले जाते. मानव संसाधन व्यवस्थापनात खालील प्रतिमानाचा वापर केला जातो.

**मानवी भांडवलाची प्रतिमाने :**

१) संतुलित गुणपत्रक प्रतिमान

२) मर्सरचे मानवी भांडवल चक्र प्रतिमान

३) वॉटसन व्याटचा मानवी भांडवल निर्देशांक

४) मानवी मालमत्ता मूल्य अंदाजक प्रतिमान

**मानवी भांडवलाच्या सैद्धांतिक विश्लेषणाचे संभाव्य पैलू :**

मानवी (मानव) भांडवल ही संकल्पना जटील असून या संकल्पनेकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले जाते यावरून मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषणाचे पैलू निश्चित होतील. प्रचलित असलेल्या सिद्धांतांमध्ये सुधारणा, नवीन सिद्धांत, नवसंकल्पना, गणितीय-अर्थमित्तीय प्रतिमाने, सरकारची धोरणे, जागतिक वित्तीय संस्था, विविध संशोधने, कार्यगटांचे अहवाल इत्यादी बाबींच्या संदर्भात मानवी भांडवलाची बदलती भूमिका व स्वरूप लक्षात घेऊन संशोधक मानवी भांडवलाच्या सैद्धांतिक विश्लेषणात योगदान देऊ शकतात.

मानवी भांडवल संकल्पनेचा उगम, विकास व सद्यस्थिती.

- जागतिक बँकेच्या प्रसिद्ध झालेल्या विविध अहवालांच्या आधारे मानवी भांडवलाचे विश्लेषण.
- मानवी भांडवलाचे ॲडम स्मिथ, मार्शल, कार्ल मार्क्स अशा विविध अर्थशास्त्रज्ञांपासून आजपर्यंत अनेक अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या विचारांची प्रसंगिकता तपासणे.
- मानवी भांडवल व मानव विकास निर्देशांकामधील संबंध.
- मानवी भांडवलासंबंधी असलेली विविध सरकारांची धोरणे व योजना.
- मानवी भांडवल विकासाची आंतरराष्ट्रीय तुलना.
- भारतातील मानव भांडवलाचे स्वरूप व वैशिष्ट्ये.
- मानव भांडवल निर्धेशांकाचे गणितीय प्रतिमान.
- मानव भांडवल निर्देशांकाचे संख्याशास्त्रीय प्रतिमान.
- मानव भांडवल निर्देशांकाचे अर्थमित्तीय प्रतिमान.
- मानवी भांडवलाचे विविध पैलू व त्यांचा कालनिहाय आणि राष्ट्र-राज्यनिहाय वेध.
- मानवी भांडवल, उत्पादकता आणि उत्पन्न यामधील संबंध.
- समाजवादी अर्थव्यवस्थेतील मानव भांडवलाचे स्वरूप, रचना व वैशिष्ट्ये.
- भांडवलशाही आणि मिश्र अर्थव्यवस्थेतील मानवी भांडवलाचे स्वरूप, रचना व वैशिष्ट्ये.
- मानव संसाधन विकास मंत्रालयाची मानवी भांडवलातील भूमिका.
- मानवी भांडवलाच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय पातळीवरील तुलना.
- मानव विकास निर्देशांकातील किंवा मानव विकास अहवालातील मानवी भांडवलाचे प्रतिबिंब.
- मानवी भांडवलातील संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका व संयुक्त राष्ट्रसंघाने विकसित केलेल्या प्रारूपांची प्रसंगिकता मानवी भांडवलाचे निर्धारक.
- मानवी भांडवलाची कालनीय व आंतरराष्ट्रीय तुलना.
- संशोधन विकास गुंतवणूक आणि मानवी भांडवलाचा संबंध.
- राष्ट्रीय (नवीन) शैक्षणिक धोरण व भारतीय मानवी भांडवलाचे भवितव्य.
- व्यवसाय संस्था, उद्योगांमधील मानवी भांडवलाची भूमिका.
- सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक व मानवी भांडवल यामधील संबंध.
- शिक्षण, आरोग्य यामधील गुंतवणूक व मानवी भांडवल.
- कामगार कायद्यांची मानवी भांडवलातील भूमिका. तांत्रिक प्रगती आणि मानवी भांडवल यामधील संबंध.
- सरकारी हस्तक्षेपाचे मानवी भांडवलावरील परिणाम.
- आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती व मानवी भांडवल यामधील परस्परावलंबन.
- मानवी भांडवल सिद्धांतांचे टीकात्मक परीक्षण.
- मानव भांडवल निर्देशांक आणि मानव विकास निर्देशांक यामधील संबंध.
- मानवी भांडवलाचे व्यवसायाच्या कार्यभागातील योगदानाचे मूल्यमापन.
- मानवी भांडवलाचे आर्थिक वाढ, उत्पादकता आणि नफा यांच्याशी संबंध असलेल्या संबंधाचे विश्लेषण मानवी भांडवलाचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, भावनिक, नैतिक, व्यासायिक, तांत्रिक पैलू.
- मानवी भांडवलाचे बदलते स्वरूप व आर्थिक - सामाजिक विकास यामधील संबंध.
- सार्वजनिक आधारभूत संरचना व मानवी भांडवल यामधील संबंध.

## संदर्भसूची


१. David Levhari, Yoram Weiss-The Effect of Risk on the Investment in Human Capital,The American Economic Review, Vol. 64, No. 6 (Dec., 1974), pp. 950-963 (Journal Article)

२. David Lamotte- Human Capital - A Driving Force for Business Growth, https://www.ilo.org/wcmsp5/groups/publi

३. Gary S. Becker -Human Capital and the Economy, Proceedings of the American Philosophical Society, Vol. 136, No. 1 (Mar., 1992), pp. 85-92 (Journal Article)

४. Harry G. Shaffer-Investment in Human Capital: Comment, The American Economic Review, Vol. 51, No. 5 (Dec., 1961), pp. 1026-1035 (Journal Article)

५. Hansson, Bo- Employers' Perspectives on the Roles of Human Capital Development and Management in Creating Value, https://labordoc.ilo.org/

६. Hartog, Joop, Maassen van den Brink, Henritte- Human Capital: Advances in Theory and Evidence eBook Amazon.in: Kindle Store.

७. International Labour Organization - R195- Human Resources Development Recommendation, 2004 (No.195), https://www.ilo.org/

८. Jacob Mincer- Investment in Human Capital and Personal Income Distribution, Journal of Political Economy, Vol. 66, No. 4 (Aug., 1958), pp. 281-302, (Journal Article)

९. Mark Blaug -Human capital theory, Published online by Cambridge University Press: 10 December 2009

१०. Min, W.: Economics of Education international encyclopedia, 2nd edn. Higher Education Press, Beijing (2000)

११. Melton R. B. - Schultz's Theory of Human Capital, The Southwestern Social Science Quarterly, Vol. 46, No. 3 (DECEMBER 1965), pp. 264-272 (Journal Article)

१२. Sandra E. Black, Lisa M. Lynch- Human-Capital Investments and Productivity, The American Economic Review, Vol. 86, No. 2, Papers and Proceedings of the Hundredth and Eighth Annual Meeting of the American Economic Association San Francisco, CA, January 5-7, 1996 (May, 1996), pp. 263-267

१३. Scott R. Sweetland -Human Capital Theory: Foundations of a Field of Inquiry, Review of Educational Research, Vol. 66, No. 3 (Autumn, 1996), pp. 341-359

१४. Theodore W. Schultz- Capital Formation by Education, Journal of Political Economy, Vol. 68, No. 6 (Dec., 1960), pp. 571-583(Journal Article)

१५. Theodore W. Schultz- Investment in Human Capital, The American Economic Review, Vol. 51, No. 1

(Mar., 1961), pp. 1-17 (Journal Article)

१६. World Bank - Human Capital Project, https://www.worldbank.org/en/publication/human-capital/brief/about-

१७. World Bank- Human Capital Project Case Studies, Series https://www.worldbank.org/

१८. United Nations Development Program - Human Development Reports, https://hdr.undp.org/

१९. Economic Survey of India- Directorate Economics Statistics Planning Department, Government of India -https://www.indiabudget.gov.in/

२०. Economic Survey of Maharashtra , Directorate Economics Statistics Planning Department, Maharashtra Government, https://mahades.maharashtra.gov.in

२१. RBI- Various Publications, https://rbi.org.in/Scripts/publications.aspx

◆

## डॉ. सौ. अरुणा रारावीकर आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्यपातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे, हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील.

एक सदस्य जास्तीतजास्त आपले तीन लेख (चार प्रती) पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तपत्रांचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करून १५ सप्टेंबर, २०२३ पूर्वी कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याकडे पाठवावेत. दिनांक २, ३ व ४ नोव्हेंबर, २०२३ रोजी वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता.पुरंदर, जि. पुणे, येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती

**श्रीनिवास खांदेवाले** †

१. केंद्र सरकारच्या कृषी व ग्रामीण विकासाशी जोडलेल्या ज्या योजना आहेत त्यांचा एकूण शेतीविकासावर काय परिणाम झाला आहे, याचा अभ्यास या शीर्षकाखाली अपेक्षित आहे. त्यातील गृहीत तत्त्व असे आहे की शेतीविकास व ग्रामीण विकास कार्यक्रम हे बऱ्याचअंशी एकमेकांस पूरक असतात. उदाहरणार्थ, ग्रामीण रस्ते सुधारले तर शेतीविकासाचे घटक व उत्पादित शेतीमालाच्या वाहतुकीची उत्पादकता वाढून कृषिविकासास मदत होते आणि शेतीत ओलित आले तर संपूर्ण गावाचाच विकास होतो. तो तसा झाला की नाही, कोणत्या योजनांमुळे कमी-जास्त झाला, अनुकूल झाला की प्रतिकूल हेही तपासता येईल.

२. केंद्र सरकारच्या कृषि-ग्रामीण विकास योजनांचे दोन भाग पडतात : (पाहा : Budget At a Glance, 2023-24, Ministry of Finance, Government of India, PP. 15-22). एक भाग केंद्रीय क्षेत्राच्या (सेंट्रल सेक्टर) योजना आणि दोन: केंद्र पुरस्कृत योजना (सेंट्रली स्पॉन्सर्ड). केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये (अ) अतिमहत्त्वपूर्ण (कोअर ऑफ दि कोअर) ६ योजना आणि (ब) महत्त्वपूर्ण (कोअर) ३२, अशा एकूण ३८ योजना आहेत. त्या यादीत ३-४ कृषिशी संबंध नसलेल्या योजना आहेत.

केंद्रीय क्षेत्र (सेंट्रल सेक्टर) यादीतील १४७ योजनांपैकी सुमारे २८ योजना शेतीविकासाशी संबंधित आहेत. वरील आढाव्यावरून लक्षात येईल की, यंदाच्या चर्चेचा भर अतिमहत्त्वपूर्ण व महत्त्वपूर्ण अशा ३८ योजनांवर आहे त्या वेगवेगळ्या योजनांचे दीर्घकाळातील यशापयश, त्यांचे एकमेकांवर अवलंबून असलेले यशापयश तपासून पाहाता येईल.

३. त्या ३८ योजनांचे नियोजन व परिचालन कसे होते, ते संशोधकाच्या सोयीनुसार राज्याच्या, जिल्ह्याच्या किंवा ग्रामपातळीवर तपासून पाहाता येईल.

४. भारतात शेतीविषयक प्रादेशिक भिन्नता भरपूर आहेत. त्यामुळे केंद्र पुरस्कृत योजना जशाच्या तशा एखाद्या राज्यातील किंवा प्रदेशातील शेतीविकासाला तंतोतंत लाभदायी होतीलच असे नाही. अशा स्थितीत विशिष्ट योजनांचा अभ्यास करताना विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत, पीकरचनेत अभ्यासासाठी घेतलेल्या योजनेत/योजनांमध्ये कोणते बदल आवश्यक वाटतात ते दर्शविणे हे शोधवृत्तीचे द्योतक राहील.

५. २०२३-२४ च्या बजेट संक्षेपानुसार केंद्र पुरस्कृत ६ अतिमहत्त्वाच्या (Core of the Core)

† माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : १०९, भ्रमणध्वनी : ७४४७५६१५४४, ई-मेल : shreenivaskhandewale12@gmail.com

आणि ३२ महत्त्वाच्या (Core) योजनांची यादी पुढीलप्रमाणे आहे:

अतिमहत्त्वाच्या सहा योजना : (काही योजना शेतीशी संबंधित नाहीत; पण मूळ क्रमवारी बिघडू नये म्हणून यादीत ठेवल्या आहेत.) (i) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रम (ii) राष्ट्रीय सामाजिक साहाय्यता कार्यक्रम (iii) अल्पसंख्यांक विकास अम्ब्रेला कार्यक्रम (iv) अन्य वंचित समूह विकास योजना. (v) अनुसूचित जनजाती विकास अम्ब्रेला योजना. (vi) अनुसूचित जाती विकास अम्ब्रेला योजना.

महत्त्वपूर्ण (core) योजना: क्रमांक पुढे चालू: (viii) आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (ix) नील क्रान्ती (x) सीमाक्षेत्र विकास कार्यक्रम (xi) पर्यावरण, वानिकी आणि वन्यजीव विकास (xii) हरित क्रांती (xiii) न्यायपालिकांसाठी संरचनात्मक सुविधा (xiv) जलजीवन मिशन (xv) पोलीस दल आधुनिकीकरण (xvi) राष्ट्रीय शिक्षा मिशन (xvii) राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन (xviii) राष्ट्रीय आजीविका मिशन (xix) प्रधानमंत्री आवास योजना (xx) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (xxi) प्रधानमंत्री कृषिसिंचन योजना (xxii) राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान (xxiii) स्वच्छ भारत मिशन (xxiv) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (xxv) शहरी पुनरुज्जीवन मिशन (xxvi) खाद्यान्न आंतरराज्यीय परिवहन (xxvii) प्राथमिक कृषि सहकारी समिती संगणकीकरण (xxviii) विकास कार्यक्रम (xxiv) कृषि उन्नती योजना (xxx) महिला सुरक्षा आणि सशक्तीकरण मिशन (xxxi) बालसुरक्षा व कल्याण सेवा (xxxii) प्रधानमंत्री शाळा (xxxiii) स्वास्थ्य पायाभूत-सुविधा योजना (xxxiv) पोषणशक्ती निर्माण योजना (xxxv) सूक्ष्म खाद्य प्रसंस्करण योजना (xxxvi) राष्ट्रीय कृषिविकास योजना (xxxvii) सक्षम अंगणवाडी व पोषण योजना (xxxviii) शिक्षण व ज्ञानार्जन योजना, नदीजोड प्रकल्प.

६. वरील सर्व कार्यक्रमांच्या संकल्पना, त्यांचे अंतःसंबंध, शेतीविकासाला झालेले फायदे, संकल्पना व अंमलबजावणीतील त्रुटी, वित्तप्रबंधन यांचा टीकात्मक अभ्यास अपेक्षित आहे.

७. राज्य सरकारच्या संबंधित विभागांची आंतरजालावरील सांख्यकीय माहिती, जिल्हा परिषदांचे अहवाल आणि लाभार्थी व्यक्ती व संस्थांना भेटी हे माहितीचे काही स्त्रोत आहेत.

◆

आर्थिक समता याचा अर्थ सर्वांना धनाची काटेकोरपणे सारखी वाटणी करणे असा मी करत नाही. प्रत्येकाला त्याच्या किंवा तिच्या गरजेप्रमाणे मिळावे इतकाच आर्थिक समतेचा साधा अर्थ होऊ शकेल.

**- महात्मा गांधी**

शोधनिबंध विषयक रूपरेषा :

# महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र

**संतोष दास्ताने** †

१. सैद्धांतिक बैठक : या भागातील विवेचन 'परिवहनाचे अर्थशास्त्र' या सैद्धांतिक शाखेवर आधारित असेल. या विद्याशाखेमध्ये कोणकोणत्या मुद्द्यांचा समावेश होतो ते प्रथम स्पष्ट करता येईल. उदा. परिवहन सेवेने स्थल उपयोगिता आणि काल उपयोगिता यांचा पाठपुरावा होतो, नवनवीन बाजारपेठांचा विकास होतो, पुरवठा साखळी प्रस्थापित होते, नागरी वस्त्या तयार होतात, कच्च्या मालाची आणि पक्क्या मालाची ने-आण शक्य होते. जसे, कोळसा, खनिजे, कच्चे तेल, पेट्रोल-डिझेल-नैसर्गिक वायू, तयार वस्तू यांची वाहतूक, लोकसंख्येच्या स्थलांतरास चालना मिळते... इ.

२. नागरीकरण आणि उपनगरीकरण यांना वेग येतो. जसे, मुंबई किंवा पुणे या महानगरांच्या विस्तारास परिवहन सेवा कशा कारणीभूत आहेत तो विशिष्टाभ्यास केस स्टडी मांडता येईल.

३. परिवहनाचा विचार करताना खर्च : लाभ तत्त्वांचा कसा वापर होतो ते उदाहरण घेऊन मांडता येईल. परिवहन सेवेत होणाऱ्या गुंतवणुकीवरील परतावा कसा मोजतात त्या सूत्रांचे टीकात्मक विश्लेषण मांडता येईल. परिवहन सेवा पुरवताना अवाढव्य गुंतवणूक आणि दीर्घकालीन नियोजन-व्यवस्थापन करावे लागते हा मुद्दा अधोरेखित व्हावा.

४. परिवहन सेवेमध्ये दर टनामागे / किलोमीटरमागे / व्यक्तीमागे किती खर्च येतो त्याचे मापन करून विवेचन होऊ शकेल. त्याची तुलना करणारा निबंधही लिहिता येईल. उदा. रेल्वे किंवा रस्त्यावरील माल वाहतूक यात स्वस्त काय आहे, का आहे, त्यामागील कारक घटक कोणते इ. यावर पूर्वी काही अभ्यास झाले असतील तर त्यांची दखल घेणे, तुलनात्मक अभ्यास मांडणे इ.

या विभागातील सर्व विवेचन महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात करून तशी मांडणी करणे अपेक्षित आहे.

II . I महाराष्ट्रातील परिवहन सोयींचा विकास कसकसा झाला ते मांडता येईल. जसे, बंदरे, विमानतळ, रस्ते राष्ट्रीय महामार्ग, द्रुतगती महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते इ. रेल्वे इ. त्या सेवांचा विस्तार, विकास, विविधीकरण, त्यातील टप्पे, त्यातील काही खास वैशिष्ट्ये हे स्पष्ट करता येईल. सन १९६० नंतर विविध पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून राज्यात परिवहन सेवा कशा विकसित होत गेल्या त्याचा व्यापक आढावा घेता येईल. सन १९९१ नंतरच्या खा-उ-जा धोरणाने परिवहन क्षेत्रात काय बदल होत गेले ते मांडता

† माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त, महाराष्ट्र अर्थशास्त्र परिषद
आजीव सभासद क्र. : ६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

येईल. एकूण परिवहन सेवांचे राज्याच्या रोजगारातील स्थान, गुंतवणुकीतील वाटा, त्यातील बदलता कल, अपेक्षित बदल, परिवहन क्षेत्रातील संख्यात्मक मनुष्यबळ, त्याची गुणवत्ता, या क्षेत्रातील वाढीव रोजगारास वाव यावर शोधनिबंध होऊ शकेल. राज्यातील औद्योगिक स्थान निश्चिती आणि परिवहनाच्या सोयी यांच्यातील परस्परसंबंध विशद करणे आवश्यक आहे. शहरांतर्गत परिवहन सेवेचा वेगळा विचार करून निबंध लिहिता येईल. उदा. मुंबईतील 'बेस्ट', तेथील उपनगरी रेल्वे वाहतूक किंवा पुण्यातील 'महानगर परिवहन महामंडळ', मेट्रो सेवा इ. विकास आणि विस्तारास जबाबदार असणाऱ्या घटकांचे मूल्यमापन करता येईल. लोकसंख्या वाढ, नागरीकरण, उत्पन्नातील वाढ, औद्योगिक विकास, प्रादेशिक विकास आणि परिवहन सेवांचा विकास यांचा सहसंबंध दाखवणारा निबंध लिहिता येईल.

II.2 सध्याचा अनुभव पाहाता पुढील काही वर्षांत महाराष्ट्रात, शहरांमध्ये, खेड्यांमध्ये परिवहन सेवा कशी विकसित होत जाईल, त्यात कशी व किती गुंतवणूक अपेक्षित आहे, त्यात कसा व किती रोजगार निर्माण होऊ शकेल त्याचे संकल्पचित्र - त्याचा पूर्वअंदाज मांडता येईल.

II.3 राज्यातील परिवहन सेवांचा विकास विशद करताना काही विशिष्ट घडामोडींचा स्वतंत्र अभ्यास मांडता येईल. जसे, महाराष्ट्रातील एस. टी. वाहतूक, कोकण रेल्वे, ज. ने. पोर्ट ट्रस्टची कामगिरी, कंटेनर क्रांतीचे राज्यातील वाहतुकीवर झालेले परिणाम, RTOच्या कामकाजाचे परीक्षण, परिवहन सेवांची सुरक्षितता इ.

II.4 बदलते तंत्रज्ञान आणि राज्यातील विविध वाहतूक सेवा यांचा आढावा घेता येईल. उदा. रेल्वे, रस्ते बांधणी, हवाई वाहतूक यातील नव्या तंत्रज्ञानाने परिवहन सेवांचा पुरवठा, त्यांची गुणवत्ता, त्यात होत असलेले बदल, होऊ घातलेले बदल यांचे विश्लेषण व मूल्यमापन करता येईल.

II.5 वाहतूक सेवेसंबंधीच्या केंद्र - राज्य सरकार - स्थानिक सरकारे यांच्या कायद्यांचा टीकात्मक आढावा घेता येईल. कायद्यातील अपेक्षित बदल, त्यांची गरज, त्यांचे परिणाम, कायद्यांचा अपुरेपणा, त्यातील पळवाटा, त्यांची अंमलबजावणी, संविधानातील तरतुदी यांची चर्चा शोधनिबंधात होऊ शकते.

II.6 राज्यातील वाहतूक सेवांसंबंधीचे राज्याचे धोरण, त्या धोरणाचे टीकात्मक मूल्यमापन, त्या धोरणाची उत्क्रांती, अपेक्षित बदल, देशाच्या व राज्याच्या परिवहन धोरणाची तुलना, या धोरणासंबंधी ज्या समित्या केंद्र-राज्य सरकारने आतापर्यंत नेमल्या त्यांचा टीकात्मक आढावा असा अभ्यास होऊ शकेल. राज्य तसेच केंद्र सरकारच्या परिवहनावरील अर्थसंकल्पीय तरतुदी यांचा आढावा घेऊन त्यावर भाष्य करता येईल.

III.1 महाराष्ट्र राज्यातील परिवहन सेवेसंबंधी एखादी समस्या घेऊन त्यावर विवेचन करता येईल. उदा. राज्यातील परिवहन सेवांच्या विकासातील असमतोल, अपुरा व विलंबित विकास, निधीची अडचण, खासगी क्षेत्राची या संदर्भातील भूमिका, केंद्र आणि राज्य सरकार यातील समन्वयाची गरज, वाहतूक सेवा पुरवत असताना स्पर्धेऐवजी पूरकत्व व समन्वय अशा उद्दिष्टांचा पाठपुरावा, राज्यातील परिवहन विकासासंबंधी केंद्र सरकारकडून राज्यावर अन्याय / दुर्लक्ष / दुजाभाव होतो किंवा कसे असे अभ्यास साधार मांडता येतील. प्रादेशिक पातळीवरील तुलनाही येथे करता येईल. उदा. मराठवाड्यातील परिवहन विकास आणि पश्चिम महाराष्ट्रातील परिवहन विकास यांची तुलना इ. दांडेकर समिती, केळकर समिती यांच्या या विषयावरील भूमिका, त्यांनी मोजलेला अनुशेष यांवर भाष्य करता येईल. राज्यातील परिवहन धोरणासंबंधीचे भविष्यातील अपेक्षित बदल यासंबंधी लिहिता येईल.

देशातील इतर एखाद्या राज्याचे परिवहन धोरण आणि महाराष्ट्राचे धोरण यांची तुलनाही करता येईल. राज्यातील नव्या परिवहन धोरणाचा मसुदा सुचवणारे विवेचन करता येईल.

IV.1 सर्वसाधारण सूचना : **[H$]** शोधनिबंध लिहिताना कोणत्याही प्रकारचे वाङ्मयचौर्य होणार नाही याची काळजी घेतली जावी. इतर स्रोतातून घेतलेल्या मजकुराचे उगम आणि त्यांचे संदर्भ शास्त्रशुद्ध रीतीने दिले जाणे अपेक्षित आहे. [I] सध्या सर्वत्र उपलब्ध असलेली क्रमिक पुस्तके, गूगल, विकिपीडिया यातील मजकूर कट-पेस्ट रीतीने वापरला जाऊ नये. तो मजकूर रिपीट करण्याचे कारण नाही. त्या मजकुराची सत्यता पडताळणी तसेच त्याचे संपादन-प्रमाणीकरण झालेले नसते हे ध्यानात घ्यावे. [J] निबंधाची मांडणी मुद्देसूद, तर्कशुद्ध तसेच शुद्धलेखनाचे नियम पाळून केली जावी. तक्ते, आलेख, आकृत्या, सांख्यिकी माहिती यांचा जरूर वापर करावा. गरज असेल तेथे अधिकृत स्रोतांचा संदर्भ द्यावा. [K] शोधनिबंधाची आखणी करताना संबंधित समित्यांचे मूळ अहवाल, आर्थिक पाहणी अहवाल, संबंधित सरकारी खात्यांचे वार्षिक अहवाल, संबंधित संकेत स्थळे यांचा वापर करता येईल. वरील I यातील विषयांसाठी 'परिवहनाचे अर्थशास्त्र' यावरील इंग्रजी-मराठीतील अधिकृत पुस्तकांचा वापर करावा. शोधनिबंध केवळ माहितीवजा असण्याचे कारण नाही. त्यात विश्लेषण, भाष्य, टिप्पणी, मूल्यमापन, साधार शिफारशी, आपल्या मतांचे समर्थन, या विषयावरील काही नव्या आयामांचे स्पष्टीकरण असे अपेक्षित आहे.

◆

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११०००/-, प्रमाणपत्र व मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथांच्या महिला लेखिकेस (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे १५ सप्टेंबर, २०२३ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. दिनांक २,३ व ४ नोव्हेंबर, २०२३ रोजी वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे, येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# ४६ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, सासवड
# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्द्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये. कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक, सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहारकोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दांत गोषवारा द्यावा.

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन, सासवड
## शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४६ वे वार्षिक अधिवेशन वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड , ता.पुरंदर, जि. पुणे येथे दिनांक २, ३ व ४ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित केले जाणार आहे. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान जालना येथील डॉ.दिलीप अर्जुने हे भूषवतील. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. पंडित शेळके आणि स्थानिक-कार्यवाह डॉ. विशाल पावसे (९८९०१७६४७८) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१. मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण.

२. केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती.

३. महाराष्ट्रातील वहातुक व्यवस्थेचे अर्थशास्त्र.

वरील ती विषयाचे शोधनिबंध आपणास मा. अध्यक्षांकडे पाठवता येतील. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत. १५ सप्टेंबर, २०२३ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीतजास्त २००० शब्दात मांडावयाचे असून, निबंधासोबत ३०० शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध युनिकोड या फॉन्टमध्ये PageMaker किंवा MS-Word या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ १४ असावी. शोधनिबंधाची मूळ वर्ड फाईल आणि पीडीएफ फाईल maparishad1977@gmail.com या मेलवर १५ सप्टेंबर, २०२३ पूर्वी मेल करावी. मा. अध्यक्ष यांना फोन करुन मेल व्यवस्थित पोहोचल्याची खात्री करुन घेतल्यास अधिक सुलभ होईल. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आजीव सभासद असावा, निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय / विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**प्रा. डॉ. दिलीप सोपानराव अर्जुने**

'राही सदन' नेवासेकर नगर, मंठा रोड, जालना ४३१२०३

मो. : ९४२२२१९७२३  ई-मेल : maparishad1977@gmail.com

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार,

मराठी अर्थशास्त्र परिषद,

मो. ९४२३९९३१३७

# नवीन आजीव सभासदांची यादी

## (१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३)

| अ.क्र. | आजीव सभासदांचे नाव | आजीव सभासद क्र. | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | पतंगे नागेश रामदास | १८७८ | ६२ | ३१००/- |
| २. | मनसरे अभय विष्णू | १८७९ | ६३ | ३१००/- |
| ३. | इंगळे शिवानी मच्छिंद्र | १८८० | ६४ | ३१००/- |
| ४. | डॉ. मगर दत्ता कोंडबाराव | १८८१ | ६५ | ५१००/- |
| ५. | आहेर अर्चना शांताराम | १८८२ | ६६ | ५१००/- |
| ६. | डॉ. पवार विष्ण बु. | १८८३ | ६७ | ५१००/- |
| ७. | डॉ. सूर्यवंशी नासिकेत गोविंदराव | १८८४ | ६८ | ५१००/- |
| ८. | प्रा.पवार गोविंद पुंडलिक | १८८५ | ६९ | ५१००/- |
| ९. | प्रा. वाकोडे विजय कुंडलिक | १८८६ | ७० | ५१००/- |
| १०. | डॉ. गंगणे वर्षा मनोहर | १८८७ | ७१ | ५१००/- |
| ११. | डॉ. प्रियंका नारायण खोसे | १८८८ | ७२ | ५१००/- |
| १२. | डॉ. वाघमारे संतोष मारुतीराव | १८८९ | ७३ | ५१००/- |
| १३. | ठोकळे सुनील राजाराम | १८९० | ७४ | ३१००/- |
| १४. | डॉ. मीनाक्षी भास्कर जाधव | १८९१ | ७५ | ५१००/- |
| १५. | सरोदे राजेंद्र महादेवराव | १८९२ | ७६ | ३१००/- |
| १६. | प्रा. कर्णे आनंद बळीराम | १८९३ | ७७ | ३१००/- |
| १७. | डॉ. राठोड बबन गोविंद | १८९४ | ७८ | ३१००/- |
| १८. | प्रा. शेवाळे आनंद तुकाराम | १८९५ | ७९ | ५१००/- |
| १९. | अंधारे अविनाश रुक्माजी | १८९६ | ८० | ३१००/- |
| २०. | देशमुख भगवान शंकरराव | १८९७ | ८१ | ३१००/- |
| २१. | कुंभारकर समीर महादेव | १८९८ | ८२ | ३१००/- |
| २२. | वानखेडे पौर्णिमा सीताराम | १८९९ | ८३ | ५१००/- |
| २३. | गायकवाड सुहासिनी विक्रमादित्य | १९०० | ८४ | ५१००/- |
| २४. | हणमंते धोंडीबा गणपतराव | १९०१ | ८५ | ३१००/- |
| २५. | गायकवाड सूर्यकांत पांडुरंग | १९०२ | ८६ | ३१००/- |
| २६. | शिंदे संदीप बाळासाहेब | १९०३ | ८७ | ३१००/- |
| २७. | डॉ. खेडकर गोवर्धन रावसाहेब | १९०४ | ८८ | ५१००/- |
| २८. | डॉ. साळवे संदीप गोरख | १९०५ | ८९ | ३१००/- |
| २९. | केळे हरिचंद्र विष्णू | १९०६ | ९० | ३१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | डॉ. निंबाळकर अनिल धुराजी | १९०७ | ९१ | ३१००/- |
| ३१. | शायीन यासीन शेख | १९०८ | ९२ | ३१००/- |
| ३२. | राठोड अनंत श्रीराम | १९०९ | ९३ | ३१००/- |
| ३३. | प्रा. रामनाथ बाबुराव सांगुळे | १९१० | ९४ | ५१००/- |
| ३४. | रजनी अजित चौधरी | १९११ | ९५ | ५१००/- |
| ३५. | डॉ. कदम प्रतिमा बाळासाहेब | १९१२ | ९६ | ५१००/- |

सूचना : रुपये ३१००/- आजीव सभासद वर्गणी देणारे सभासद विद्यार्थी किंवा विनाअनुदानित संस्थेमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांचेकडून इमारत निधी घेण्यात आला नाही.

## इमारत निधी

### दिनांक १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३

| अनु.क्र. | आजीव सभासदांचे नाव | आजीव सभासद क्र. | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. मगर दत्ता कोंडबाराव | १८८१ | ६५ | २०००/- |
| २. | डॉ. आहेर अर्चना शांताराम | १८८२ | ६६ | २०००/- |
| ३. | डॉ. पवार विष्णू ब. | १८८३ | ६७ | २०००/- |
| ४. | डॉ. सूर्यवंशी नासिकेत गोविंदराव | १८८४ | ६८ | २०००/- |
| ५. | डॉ. पवार गोविंद पुंडलिक | १८८५ | ६९ | २०००/- |
| ६. | प्रा. वाकोडे विजय कुंडलिक | १८८६ | ७० | २०००/- |
| ७. | डॉ. गंगणे वर्षा मनोहर | १८८७ | ७१ | २०००/- |
| ८. | डॉ. खोसे प्रियंका नारायण | १८८८ | ७२ | २०००/- |
| ९. | डॉ. वाघमारे संतोष मारुतीराव | १८८९ | ७३ | २०००/- |
| १०. | डॉ. जाधव मीनाक्षी भास्कर | १८९१ | ७५ | २०००/- |
| ११. | शेवाळे आनंद तुकाराम | १८९५ | ७९ | २०००/- |
| १२. | डॉ. वानखेडे पौर्णिमा सीताराम | १८९९ | ८३ | २०००/- |
| १३. | गायकवाड सुहासिनी विक्रमादित्य | १९०० | ८४ | २०००/- |
| १४. | डॉ. खेडकर गोवर्धन रावसाहेब | १९०४ | ८८ | २०००/- |
| १५. | डॉ. सांगुळे रामनाथ बाबुराव | १९१० | ९४ | २०००/- |
| १६. | डॉ. चौधरी रजनी अजित | १९११ | ९५ | २०००/- |
| १७. | डॉ. कदम प्रतिमा बाळासाहेब | १९१२ | ९६ | २०००/- |
| १८. | डॉ. घिनमीने विठ्ठल मा. | १५१९ | ३९७ | ५०००/- |
| १९. | डॉ. राखुंडे-कदम माधुरी पंडितराव | | ३९९ | ५०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०. | डॉ. पिस्तुलकर निवृत्ती आत्माराम | ११७२ | ४०० | ५०००/- |
| २१. | सेक्रेटरी, गो.सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट, चांदूरबाजार, जि. अमरावती | --०१ | १०,०००/- | |
| २२. | डॉ. गुर्जर सुभाष | | १४ | १०००/- |
| २३. | डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे | ८०८ | १५ | ५००/- |
| २४. | डॉ. बेलुरे विशाल चंद्रशेखर | १२४७ | १६ | १०००/- |
| २५. | प्रा. हनवंते कमलाकर | ५८० | १७ | ५००/- |
| २६. | डॉ. सरोदे राजेंद्र महादेवराव | १८९२ | १८ | २०००/- |
| २७. | डॉ. नाईक-देशमुख वैशाली | | १९ | १०००/- |
| २८. | डॉ. भोसले सुभाष रामचंद्र | १८४९ | २० | १०००/- |
| २९. | डॉ. काळमेघ (चौधरी) प्रतिभा संजय | १५६० | ४८७ | ५०००/- |
| ३०. | डॉ. सोरे नागोराव कोंडबाजी | १६६४ | ४८८ | ५०००/- |
| ३१. | प्रा. ढाले मिलिंद हरिभाऊ | | ४८९ | ५०००/- |

गोरगरिबांना दारिद्र्याच्या खाईतून बाहेर काढून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा मार्ग म्हणजे सूत-कताई.

**- महात्मा गांधी**

भारत हा शहरात नसून खेडेगावात आहे

**- महात्मा गांधी**

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in

**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३११०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

# वाघीरे कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

सासवड ता.पुरंदर, जि. पुणे - ४१२३०१ फोन : ०२११५-२२२५२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न





NAAC मुल्यांकन B++, DBT स्टार कॉलेज मानांकन




## अभ्यासक्रम : पदवी (UG)

B.A, B.Com, B.Sc

## अभ्यासक्रम : पदव्युत्तर (PG)

MA (Marathi, Hindi, English, Economics, Geography, Political Science)

M.Com (Costing, Business Administration, Banking & Finance)

M.Sc (Analytical, Organic Chemistry, Microbiology, Botany)

## Research Center Ph.D.

English
Commerce & Management
Chemistry

## Professional Courses (UG)

BBA (CA) / BCA / BBA

B.Sc ( Computer Science)

B. Voc ( Tourism & Hospitality Management, Retail Management, Food Processing & Technology, Computer Software Development)

Community College
( Diploma In Agro Tourism, GST & Tally)

## Professional Courses (PG)

M.Sc (Computer Science)

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
- सुसज्य ग्रंथालय इंटरनेटसह
- सुसज्य प्रयोगशाळा
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक
- NSS, NCC विभाग
- विद्यार्थिनी वसतीगृह
- अद्यावत संगणक प्रयोगशाळा
- Campus Placement
- व्यवसाय व रोजगारभिमुक अभ्यासक्रम
- सुसज्य क्रीडांगण
- शिष्यवृत्ती योजना
- कमवा व शिका योजना
- करिअर कट्टा

ॲडमिशन वेबसाईट
www.pdea-admission.org

कॉलेज वेबसाईट
www.pdeawcsaswad.edu.in

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन

दिनांक २, ३, ४ नोव्हेंबर २०२३

स्थळ

वाघीरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
सासवड ता.पुरंदर, जि.पुणे-४१२३०१

या अधिवेशनास सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती.

डॉ.विशाल पावसे
स्थानिक कार्यवाह

प्राचार्य डॉ.पंडित शेळके ,
स्थानिक कार्याध्यक्ष